सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | शुक्रवार, १९ जून २०२६ | वर्ष ४ थे अंक १०२ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▮ dainiktarunbharat.com ▮ epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन. त्यानिमित्त विनम्र अभिवादन.

कोणत्याही भीषण परिस्थितीत किंचितही विचलित न होणे आणि कोणत्याही प्रकारच्या भीषणातल्या भीषण संकटातसुद्धा आपल्या अंतःकरणाला निराशा अथवा भीतीचा स्पर्शही होऊ न देणे, ही छत्रपती शिवाजी महाराजांची अनुकरणीय विशेषता होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आपण समोर ठेवला पाहिजे.

**- स्व. श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# युद्धात जिंकले; तहात हारले

**| अमेरिका-इराणमध्ये शांतता करार; इराणच्या बहुतांश अटी मान्य**
**| जगाला वेठीस धरणारे मध्यपूर्वेतील संकट समाप्त | होर्मुझ सामुद्रधुनी खुली होणार**

**पॅरिस, १८ जून**

अमेरिका-इराणच्या युद्धामुळे निर्माण झालेले आणि जगाला वेठीस धरणारे मध्यपूर्वेतील संकट आता संपले आहे. अमेरिका आणि इराणने फ्रान्समधील व्हर्साय येथे गुरुवारी युद्धबंदी करारावर स्वाक्षरी केली. मागील ६० दिवसांपासून दोन्ही देशांत सुरू असलेल्या वाटाघाटी अखेर करारात बदलल्या. मात्र, या करारातील कलमांकडे पाहता अमेरिकेची स्थिती युद्धात 'जिंकले पण, तहात हारले' अशी झाली आहे.

अमेरिकेकडून डोनाल्ड ट्रम्प तर इराणच्या वतीने राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांनी, तर हमीदार म्हणून पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांचीही या सामंजस्य करारावर स्वाक्षरी आहे. स्वित्झर्लंडमधील नियोजित समारंभाच्या एक दिवस आधीच हा करार करून अमेरिका आणि इराणने जगाला आश्चर्याचा धक्का दिला.

जी-७ शिखर परिषदेनंतर 'पॅलेस ऑफ व्हर्साय' येथे फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं यांच्यासोबत स्नेहभोजनादरम्यान या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी आज रात्री इराण-अमेरिका यांच्यातील करारावर स्वाक्षरी केली. हा करार शाश्वत शांततेचा मार्ग मोकळा करतो आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करणार आहे. आपल्या देशवासीयांसाठी योग्य दिशेने टाकलेले हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे लवकरच ऊर्जेच्या किमती कमी होण्यास मदत मिळेल, असे मॅक्रॉं यांनी करारानंतर 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.



व्हर्सायच्या ऐतिहासिक राजवाड्यात युद्धबंदी करारावर स्वाक्षरी करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प बाजूला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं

या करारावर स्वाक्षरी केली असल्याचा दुजोरा इराणने दिला आहे. इस्लामाबाद सामंजस्य कराराचा मसुदा दोन्ही राष्ट्राध्यक्षांच्या स्वाक्षरीने अंतिम करण्यात आला. आता कराराच्या अंमलबजावणीची चाचणी घेण्याची वेळ आली आहे, अशी प्रतिक्रिया इराणी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी व्यक्त केल्याचे वृत्त इराणची सरकारी वृत्तसंस्था 'आयआरएनए'ने दिले. या करारावर अधिकृत स्वाक्षरी मूळतः शुक्रवारी स्वित्झर्लंडमध्ये होणार होती. तथापि, जीनिव्हा येथील बैठक नियोजित वेळापत्रकानुसारच होत असल्याचे इराणने म्हटले आहे. आता दस्तावेजावर स्वाक्षरी झाल्यामुळे अंतिम कराराच्या वाटाघाटी करण्यासाठी अमेरिका-इराणकडे ६० दिवसांचा कालावधी असेल. या करारावर स्वाक्षरी झाल्यामुळे २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर सर्वप्रथम हल्ले केल्यापासून सुरू असलेले ११० दिवसांचे युद्ध संपुष्टात आले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### अमेरिकी अधिकाऱ्यांनी जारी केला कराराचा मसुदा

अमेरिकन अधिकाऱ्यांनी एका कॉन्फरन्स कॉलदरम्यान या कराराच्या दस्तवेजातील मजकूर वाचून दाखवला. ट्रम्प यांनी रविवारी सर्वप्रथम जाहीर केलेल्या या कराराच्या पारदर्शकतेच्या अभावावरून लोकांच्या वाढत्या दबावानंतर हे पाऊल उचलण्यात आले. ■

### लष्करी कारवाया थांबवा

'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि इस्लामिक प्रजासत्ताक इराण यांच्यातील सामंजस्य करार' असे शीर्षक असलेल्या या दस्तावेजात लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील लष्करी कारवाया त्वरित आणि कायमस्वरूपी थांबवण्याच आवाहन करण्यात आले. ■

### अमेरिका ३० दिवसांत हटविणार नाकेबंदी

या करारानुसार अमेरिकेने ३० दिवसांच्या आत इराणवरील नौदल नाकेबंदी उठविण्याचे मान्य केले आहे. तसेच अंतिम करार झाल्यावर ३० दिवसांच्या आत अमेरिका इराणच्या परिसरातून आपले सैन्यदल मागे घेईल. इराण ६० दिवसांच्या कालावधीसाठी व्यापारी जहाजांच्या सुरक्षित प्रवासाची व्यवस्था करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल आणि त्यासाठी कोणतेही शुल्क आकारणार नाही, असे करारात म्हटले. ■

# विधान परिषदेसाठी बम्पर मतदान



**२२ जूनला मतमोजणी**

**उमेदवारांची धाकधूक वाढली**

**मुंबई, १८ जून**

राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील ११ जागांसाठी गुरुवारी मतदान पार पडले. मतमोजणी २२ जूनला होणार असून, उमेवारांची धाकधूक वाढली आहे. १७ पैकी ६ जागांवर महायुतीने मतदानापूर्वीच बिनविरोध विजयाचा गुलाल उधळला आहे.

११ जागांसाठी विदर्भासह उर्वरित राज्यात शांततेत मतदानाची प्रक्रिया पार पडली. यात संपूर्ण राज्याचे लक्ष छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघाकडे लागले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

| | मतदारसंघ | एकूण मतदार | मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | सोलापूर | ६१६ | ६१४ | ९९.६८ |
| २) | जळगाव | ६३० | ६१६ | ९९.७८ |
| ३) | सांगली-सातारा | ८९५ | ८९४ | ९९.८९ |
| ४) | नांदेड | ४५२ | ४५१ | ९९.७८ |
| ५) | भंडारा-गोंदिया | ४५७ | ४५७ | १००.०० |
| ६) | नाशिक | ६१९ | ६१८ | ९९.८४ |
| ७) | अमरावती | ४५१ | ४२७ | ९४.६८ |
| ८) | उस्मानाबाद-लातूर-बीड | ९८८ | ९८३ | ९९.४९ |
| ९) | परभणी-हिंगोली | ४६६ | ४६५ | ९९.७९ |
| १०) | औरंगाबाद-जालना | ६३७ | ६३० | ९८.९० |
| ११) | नागपूर | ८३६ | ८२३ | ९८.४४ |
| | एकूण | ७०४७ | ६९७८ | ९९.०२ |

## महत्त्वाचे

### शेअर बाजारांची घोडदौड सुरूच

**मुंबई** : गुरुवारी चढ-उतारांच्या सत्रात भारतीय शेअर बाजारांचे दोन्ही प्रमुख निर्देशांक वाढीसह बंद झाले. यामध्ये निफ्टीने २४,२०० च्या पातळीच्या जवळ मजल मारली. कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमती आणि जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतांमुळे गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या कठोर धोरणात्मक भूमिकेनंतरही बाजारात ही तेजी पाहायला मिळाली. बाजार बंद होताना सेन्सेक्स २५४ अंकांनी वधारून ७७,४०९.९८ वर पोहोचला, तर निफ्टी ८२ अंकांनी वाढून २४,१६८ पातळीवर बंद झाला. व्यापक बाजाराने देखील मुख्य निर्देशांकांच्या पावलावर पाऊल ठेवत चांगली कामगिरी केली. यादरम्यान निफ्टी मिडकॅप १०० आणि स्मॉलकॅप १०० या दोन्ही निर्देशांकांमध्ये प्रत्येकी ०.४ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. गुरुवारी बाजाराने आपली सकारात्मक गती कायम ठेवली. क्षेत्रीय कामगिरीचा विचार केला तर पर्यटन निर्देशांक १.५५ टक्क्यांच्या वाढीसह आघाडीवर राहिला तर, आयटी निर्देशांकात सर्वाधिक १.२४ टक्क्यांची घसरण झाली. विश्लेषणाचा विचार करता, संथ सुरुवातीनंतर बाजाराने संपूर्ण सत्रात आपली सकारात्मक पकड मजबूत ठेवली. ■

# बंडखोर खासदारांनी व्हीप धुडकावला

**| 'उबाठा'तील फुटीवर शिक्कामोर्तब; | कारणे दाखवा नोटीस बजावली**

**नवी दिल्ली, १८ जून**

शिवसेना सांसदीय पक्षाच्या गुरुवारी दिल्लीत झालेल्या बैठकीला पक्षाचे नऊपैकी फक्त तीन खासदार उपस्थित राहिल्यामुळे शिवसेनेतील (उबाठा) फुटीवर अधिकृतपणे शिक्कामोर्तब झाले आहे. पक्षादेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना सहा खासदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली आहे.

शिवसेनेतील सहा खासदारांनी बुधवारी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांना पत्र देत वेगळा गट म्हणून आपल्याला मान्यता देण्याची मागणी केल्याची चर्चा होती. मात्र, या वृत्ताला या गटाने वा लोकसभा सचिवालयाने दुजोरा दिला नव्हता. मात्र यामुळे शिवसेना सांसदीय पक्षात फूट पडल्याची चर्चा सुरू झाली होती. जुन्या संसदभवनातील शिवसेना सांसदीय पक्षाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला पक्षादेशाचे उल्लंघन करत नऊपैकी सहा खासदार अनुपस्थित राहिले.



ओमराजे निंबाळकर | संजय देशमुख | भाऊसाहेब वाकचौरे | नागेश पाटील | संजय जाधव | संजय दिना पाटील

अनुपस्थित राहणाऱ्या खासदारांत संजय देशमुख, संजय जाधव, संजय दिना पाटील, नागेश आष्टीकर पाटील, ओमराजे निंबाळकर आणि भाऊसाहेब वाकचौरे यांचा समावेश होता. त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली असल्याचे समजते. बैठकीला आपण अनुपस्थित का होतो, याबाबतचा खुलासा सात दिवसात करण्याचे त्यांना सांगण्यात आले आहे. सांसदीय पक्षाच्या बैठकीला संजय राऊत वगळता अरविंद सावंत, अनिल देसाई आणि राजाभाऊ वाजे हे तीनच खासदार उपस्थित होते.

**संजय जाधव होणार गटनेते ?**

बंडखोर सहा खासदारांच्या गटाचे नेता म्हणून परभणीचे खासदार संजय जाधव यांची निवड होणार असल्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या सहा खासदारांच्या गटातर्फेही आज कोणीही माध्यमांशी बोलले नाही. वेगळा गट म्हणून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मान्यता दिल्यानंतर हा गट शिवसेना एकनाथ शिंदे गटात विलीन होणार असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे या वादळी राजकीय घडामोडींवर शिवसेनेने प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. ◂ (तभा वृत्तसेवा)

### 'ऑपरेशन तुडवा सुरू करतील'

या सहा खासदारांना देण्यात आलेली सुरक्षा मागे घेण्याची मागणी करत या सहा खासदारांना शिवसैनिक त्यांच्या मतदारसंघात फिरू देणार नाही. शिवसैनिक, असा इशाराही संजय राऊत यांनी दिला. या बंडखोर खासदारांना आर्थिक आमिष दाखवण्यात आले तसेच त्यांना राजस्थानातील एका सुरक्षित स्थळी हलवण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. ■

### अनुपस्थितांवर कायदेशीर कारवाई करू : संजय राऊत

जे खासदार बैठकीला उपस्थित राहिले नाही, त्यांच्याविरुद्ध आम्ही कारवाई सुरु केली आहे,असे शिवसेना सांसदीय पक्षाचे नेते संजय राऊत यांनी सांगितले. सहा खासदारांनी पक्षादेशाचे(व्हीप) उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर कारणे दाखवा नोटिस बजावण्यात आली आहे. त्यांचे उत्तर आपल्यानंतर त्यांना अपात्र ठरवण्यावर आम्ही विचार करू. बंडखोर सहा खासदारांनी ओम बिर्ला यांची भेट घेतली असेल तर त्यांनी त्याचे छायाचित्र जारी करावे. याला रणनीती नाही तर गद्दारी म्हणतात, असे राऊत म्हणाले. राऊत यांनी बंडखोर खासदारांसाठी अपशब्दाचा वापर केला, त्यांना शिविगाळ केली. सर्वोच्च न्यायालयावरही त्यांनी आगपाखड केली. ■

# नागपूर 'ब्रह्मोस'चे माहेरघर

**नागपूर, १८ जून**

पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर अचूक प्रहार करून शत्रूच्या काळजाचा ठाव घेणाऱ्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रासाठी लागणाऱ्या बूस्टर प्रणालीच्या निर्मितीत नागपूरने ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. सोलार इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडने तयार केलेल्या १०० व्या स्वदेशी बूस्टरला गुरुवारी ब्रह्मोस एरोस्पेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जैतीर्थ जोशी यांच्या हस्ते ध्वज दाखवून रवाना करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. जैतीर्थ जोशी म्हणाले, यापूर्वी ब्रह्मोस





क्षेपणास्त्रांसाठी लागणारे बूस्टर रशियातून आयात करावे लागत होते. २०१८ मध्ये तंत्रज्ञान हस्तांतरणानंतर सोलार समूहाने स्वदेशी उत्पादनाला सुरुवात केली. सुरुवातीला दरमहा केवळ एक बूस्टर तयार होत होते. मात्र, आज उत्पादन क्षमता वाढून दरमहा सहा बूस्टरपर्यंत मजल पोहोचली आहे. हा आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेला महत्त्वाचा टप्पा आहे.

ब्रह्मोस एरोस्पेस प्रायव्हेट लिमिटेडला गेल्या दोन वर्षांपासून सोलार समूहाकडून बूस्टर प्रणालीचा नियमित पुरवठा केला जात आहे. २०२२ मध्ये पहिली स्वदेशी बॅच सुपूर्द केल्यानंतर कंपनीला सातत्याने नवीन ऑर्डर मिळत आहेत. क्षेपणास्त्राच्या तळाशी बसवली जाणारी बूस्टर प्रणाली त्याला प्रारंभीचा वेग व उंची देते. ब्रह्मोसच्या अचूकतेसाठी आणि वेगासाठी ही प्रणाली कणा मानली जाते. ◂ (तभा वृत्तसेवा)

### ईपीएफ ठेवींवरील व्याजदर ८.२५ टक्के

**नवी दिल्ली** : सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी कर्मचारी भविष्य निधी (ईपीएफ) ठेवींवरील ८.२५ टक्के व्याजदराला मंजुरी दिली असून, व्याजाची रक्कम या महिन्यात सात कोटींहून अधिक योगदान देणाऱ्या सदस्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. कर्मचारी भविष्य निधी संघटनेची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था असलेल्या केंद्रीय विश्वस्त मंडळाने (सीबीटी) निश्चित केलेल्या ८.२५ टक्के व्याजदराला अर्थ मंत्रालयाने संमती दिली. ■

# सीबीएसई त्रिभाषा धोरणाला स्थगिती नाही

**नवी दिल्ली, १८ जून**

सीबीएसईने इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या त्रिभाषा धोरणाला स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळून लावत कोणताही अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला. हे नवीन शैक्षणिक धोरण वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थ्यांसाठी लागू केले जाणार आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. व्ही. मोहन यांच्या न्यायासनाने हे प्रकरण यापूर्वीच प्रलंबित असलेल्या अशाच इतर याचिकांसोबत जोडले आहे. सुनावणीदरम्यान न्यायासनाने स्पष्ट केले की, या विषयावर यापूर्वीच सविस्तर चर्चा झाली आहे, त्यामुळे सध्यातरी कोणत्याही प्रकारची अंतरिम स्थगिती किंवा संरक्षणात्मक आदेश दिला जाऊ शकत नाही. 'फ्रेंड्स ऑफ पीपल फॉर ॲक्टिव्ह डेमोक्रसी' नावाच्या स्वयंसेवी संस्थेने ही याचिका दाखल केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# धार्मिक स्थळे होती लक्ष्य

**इस्लामाबादच्या कॉल सेंटरमधून मिळत होत्या सूचना; चौकशीतून खुलासा**

**नवी दिल्ली, १८ जून**

दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने अटक केलेल्या आयएसआयएस आणि शहजाद भट्टीशी संबंधित १२ सदस्यीय दहशतवादी मॉड्यूलला पाकिस्तानच्या इस्लामाबादमध्ये कार्यरत कॉल सेंटरमधून सूचना मिळत होत्या, भारतात दहशत पसरविणे आणि धार्मिक स्थळांना लक्ष्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तरुणांची भरती करून हिंसा भडकविण्यासाठी प्रवृत्त करण्याची जबाबदारी दहशतवादी मॉड्यूलला दिल्याची माहिती चौकशीतून समोर आली.

राजधानी पाकिस्तानची इस्लामाबादमध्ये एक कथित दहशतवादी कॉल सेंटर कार्यरत होते. या नेटवर्कद्वारे भारतात दहशत पसरवण्याची योजना आखली जात होती. समाज माध्यम ॲप्सद्वारे भारतीय तरुणांशी संपर्क साधून त्यांना आपल्या जाळ्यात ओढले जात होते, अशी माहिती चौकशीतून उघड झाल्याचे एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली. अटक केलेल्या मॉड्यूलला दिल्ली आणि आसपासच्या राज्यांमधील पोलिस कर्मचाऱ्यांना लक्ष्य करण्याचे काम सोपवण्यात आले होते. पोलिसांच्या हत्येद्वारे भीती आणि अस्थिरता निर्माण करण्याची योजना होती. आरोपींना आयएसआय समर्थित संघटना असलेल्या तहरीक-ए-तालिबान हिंदुस्तान (टीटीएच) चा प्रचार करण्याचे कामही सोपवण्यात आले होते. या गटातील सदस्यांना धार्मिक नेते आणि धार्मिक स्थळांना लक्ष्य करण्याचे निर्देशही देण्यात आले होते. जातीय तणाव आणि अशांतता भडकवण्याच्या कटाचा हा एक भाग होता.

**हँडलर्सला पाठवायचे चित्रफीत**

पोलिसांची पाळत आणि धमक्या देणाऱ्या चित्रफीत पाकिस्तानस्थित हँडलर्सना पाठवले जात होते, यावरून या मॉड्यूलची कार्यक्षमता आणि गांभीर्य उघड होते. फरिदाबादचा रहिवासी आरोपी सोहेल टीटीएचच्या समर्थनार्थ ग्राफिटी तयार करत असे. तो ही चित्रफीत पाकिस्तानस्थित हँडलर्सला पाठवत होता. त्याबदल्यात आठवड्याला पाच हजार रुपये त्याला प्रत्येक मिळायचे. घिटोर्नीचा रहिवासी असलेला सोनू मीना, या नेटवर्कसाठी शस्त्रे आणि निधी पुरवण्याची जबाबदारी सांभाळत होता.

# विधानपरिषद निवडणुकीत सोलापुरात ९९.६८ टक्के मतदान

**▮ 'महायुती'कडून विजयाचा दावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी कुर्डुवाडी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, अकलूज या ६ मतदान केंद्रांवर गुरुवार, दि.१८ जून २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली. एकूण ९९.६८ टक्के मतदान झाले.

'महायुती'कडून माजी आमदार राजेंद्र राऊत तर 'महाविकास आघाडी'कडून वसंतराव देशमुख यांच्यात सरळ लढत झाली. सोमवार, दि.२२ जून २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. चुरशीने झालेले मतदान लक्षात घेता, राजेंद्र राऊत यांचा विजय निश्चित असल्याचा दावा 'महायुती'कडून करण्यात आला.



भारतीय जनता पार्टीच्या १११ पैकी १०९ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. एमआयएमचे ९, शिवसेनेचे ४, काँग्रेसचे २ आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे १ नगरसेवक यांनीही मतदान केले. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या राजकीय घडामोडी आणि आजचे मतदान याबाबत चर्चा रंगली होती.

'महायुती'चे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या विजयासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली तर 'महाविकास आघाडी'चे उमेदवार वसंतराव देशमुख यांच्या विजयासाठी त्या-त्या पक्षसंघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी जोरदार फिल्डिंग लावली होती.

दरम्यान, लोकशाही व्यवस्थेची ताकद ही मतदारांच्या सहभागावर अवलंबून असते. त्यामुळे त्या-त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून समाजहित आणि विकासाला प्राधान्य देणाऱ्या नेतृत्वाची निवड करण्याचा संदेश या मतदानातून देण्यात आला.

### एकुलत्या एक मुलाची तणनाशक पिऊन आत्महत्या

**सोलापूर, दि.१८ जून-**

एकुलत्या मुलाने विषारी तणनाशक औषध पिऊन आत्महत्या केल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथे घडली. शुभम बापू शिंदे (वय-१९) असे मयत युवकाचे नाव आहे. मंगळवार, दि.१६ जून रोजी शुभमचे वडील बापू शिंदे दुधाची धार काढीत होते तर आई स्वयंपाक करीत होती. त्यावेळी शुभम हा घरातून पाणी आणतो म्हणून आत गेला आणि त्याने तणनाशक पिले. पंढरपूर येथील एका खासगी दवाखान्यात, त्यानंतर दुसऱ्या दिवशी सोलापूरच्या एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. गुरुवार, दि.१८ जून रोजी उपचारादररम्यान त्याचा मृत्यू झाला. मयत शुभम शिंदे याच्या पश्चात आई-वडील व एक विवाहित बहीण आहे. शुभम हा आई-वडिलांना एकुलता एक मुलगा होता. एक वर्षापूर्वीच दहावीपर्यंत शिकून त्याने शाळा सोडली होती. तणनाशक पिले त्यावेळी त्याचा मोबाईल लॉक होता. तो अद्यापही लॉक असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली. मोबाईलचे लॉक उघडल्यावर आत्महत्येचे नेमके कारण समजू शकेल.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...





### सराईत गुन्हेगारांची टोळी सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार

**सोलापूर, दि. १८ जून-**
गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेल्या तीन सराईत गुन्हेगारांच्या टोळीलासोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर यांनी दोन वर्षासाठी तडीपार केले आहे. टोळी प्रमुख नागेश यल्लप्पा मंठाळकर (वय २५ वर्ष), अनिल श्रीनिवास विटकर (वय २२ वर्ष) व शुभम तानाजी धोत्रे (वय २१ वर्ष, तिघे रा. कुचन हायस्कूल शेजारी, रविवार पेठ, सोलापूर) अशी तडीपार केलेल्या तिघांची नावे आहेत. या तिघां गुन्हेगारा विरोधात २०२२ ते २६ दरम्यान टोळीच्या माध्यमातून दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घातक शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. या तिघांच्या विरोधात जोडभावी पेठ पोलिस ठाण्याच्या वतीने तडीपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रितम यावलकर यांनी तिघांना सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

### सराईत गुन्हेगार अप्पू मुगळी सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. १८ जून-**



गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार अप्पाशा उर्फ अप्पू भिमशा मुगळी (वय २४ वर्ष, रा. वसंत नगर. शिंगारे वीटभट्टीमागे, विजापूर रोड, सोलापूर) याला पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर यांनी सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे. अप्पू मुगळी याच्या विरोधात २०२३ ते २६ दरम्यान गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, गोवंशीय कत्तलीच्या उद्देशाने इतरांना मारहाण करणे असे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या विरोधात विजापूर नाका पोलिसांनी पोलिस उपायुक्तांकडे तडीपारीचा प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलिस उपायुक्त प्रितम यावलकर यांनी अप्पू मुगळी याला सोलापूर शहर व जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

### राजशेखर कोळी यांच्या भ्रष्ट कामाचा दीपक भिताडे यांना फटका

**अक्कलकोट, दि. १८ जून -**
अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांची सोलापूर कंट्रोलला तडकाफडकी उचलबांगडी करण्यात आली. यामुळे अक्कलकोट पोलिस खात्यात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिस हवालदार राजशेखर कोळी आणि पोलिस कॉन्स्टेबल लक्ष्मीकांत देडे यांच्यासह एक खाजगी इसम आकाश काडरामे यांच्यावर पोलीस स्टेशन समोरच एसीबीने कारवाई करत गुन्हा दाखल केला. या घटनेची गंभीर दखल घेत ग्रामीण पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी उत्तर पोलीस निरीक्षक भिताडे यांची तडकाफडकी बदली केल्याने पोलीस खात्यात खळबळ माजली आहे. गेल्या काही दिवसापासून अक्कलकोट तालुक्यात पोलिसांच्या कर्तुत्वाबद्दल मोठे किस्से चविष्ठ पणे चर्चिले जात होते. काही दिवसापूर्वीच कलबुर्गी ( कर्नाटक) येथील व्यापाऱ्याने उत्तर पोलीसात फिर्याद दाखल केली होती . या तक्रारीने पोलिसांच्या अत्यंत कार्यक्षम कामगिरीची चर्चा जिल्हाभरात ऐकावयास मिळत होती. या कामगिरीची चर्चा थंडावताच अक्कलकोट उत्तर पोलिसात एका खाजगी इसमासह पोलिसांवरच नव्या कामगिरीबाबत गुन्हा दाखल झाल्याने पोलिसांची प्रतिमा खालावत चालली आहे. अक्कलकोटमध्ये एसीबीने मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत १.२० लाखांची लाच स्वीकारताना दोन पोलिसांसह तिघे जाळ्यात अडकले. मात्र या प्रकरणाचा फटका पोलिस निरीक्षक दीपक भिताडे यांना बसला.

### जखमींचे जीव वाचवणाऱ्या युवकाचा शासकीय सन्मान करा : विकी चौधरी

**अक्कलकोट, दि १८ जून -**
पाच जणांचा जीव वाचवणाऱ्या धाडसी युवक इरफान याचा महाराष्ट्र शासनाने शासकीय पातळीवर सन्मान करावा, अशी मागणी रिपाइं (एकतावादी) चे सोलापूर जिल्हाध्यक्ष तथा रोजगार आघाडी प्रदेशाध्यक्ष विकी चौधरी यांनी केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील तांदुळवाडी येथे यात्रेकरूंना घेऊन जाणारे वाहन विहिरीत कोसळून १४ जणांचा मृत्यू झाला होता. वाहन विहिरीत कोसळल्याचे पाहताच इरफान यांनी गावकऱ्यांना तत्काळ माहिती देत त्यांनी जीवाची पर्वा न करता विहिरीत उडी घेतली. पाच जणांचा जीव वाचवला. त्यांचे धाडस व सेवाभाव प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत शासनाने तात्काळ सन्मान करावा, अशी मागणी केली आहे.

### महापालिकेच्यावतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जून-**



सोलापूर महानगरपालिकेच्यावतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आज धर्मवीर संभाजी महाराज तलाव येथील त्यांच्या पुतळ्यास उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे,विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, मधुसूदन पवार, सूर्यकांत देशमुख, गुरुराज कानडे, बाळासाहेब गोत्सुर्वे, अल्लबक्ष शेख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# बार्शी नगरपरिषदेच्या दृष्टीने नागरिकांच्या जीवाची किंमत शून्य?

- अपघातात जीव गेला, तरी आरोग्य विभागाला जाग नाही? आणखी किती जीव घेणार?
- जिल्हाधिकाऱ्यांनी बार्शी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाची चौकशी करावी; नागरिकांची मागणी
- नगरपरिषदेस नागरिकांच्या सुरक्षेपेक्षा ठेकेदार महत्त्वाचे?

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१८ जून**
बार्शी शहरात मागील आठवड्यात घडलेल्या भीषण अपघातानंतरही नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने कोणताही धडा घेतलेला दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरी व्यक्ती गंभीर जखमी झाली. मात्र या घटनेनंतरही कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

**अपघातानंतरही स्थिती जैसे थे**
१३ जून रोजी बार्शी नगरपरिषदेच्या कचरा वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला पाठीमागून दुचाकीची धडक बसून एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर संबंधित ट्रॅक्टरवर नंबर प्लेट नसणे, रिफ्लेक्टर, इंडिकेटर, पार्किंग लाईट आणि इतर आवश्यक सुरक्षाविषयक साधनांचा अभाव असल्याच्या बाबी समोर आल्या होत्या. त्यामुळे रात्रीच्या या अपघातास बार्शी नगर परिषदेस जबाबदार धरावे अशी संतप्त मागणी नागरिकांनी केली होती.

**सहा दिवस उलटले, पण बदल नाहीच!**
अपघातानंतर नगरपरिषदेचा आरोग्य विभाग अधिक सतर्क होईल, अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र सहा दिवसांहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही शहरात कचरा वाहणारी काही वाहने नियमांचे पालन न करता फिरत असल्याचे चित्र दिसत आहे. अनेक वाहनांवर नंबर प्लेट नसणे, रिफ्लेक्टिव्ह टेप नसणे, इंडिकेटर नसणे, रात्री वाहन ओळखता येण्यासाठी आवश्यक प्रकाशयोजना नसणे अशा बाबी अजूनही कायम असल्याचे निदर्शनास आले आहे.



> **जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावा**
> तांदूळवाडी येथील विहीर दुर्घटनेनंतर जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी धोकादायक विहिरींचा सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे बार्शी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागामार्फत कचरा वाहतुकीत नियम न पाळणाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी आता बार्शीकरांकडून होत आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची अपेक्षा बार्शीकरांकडून व्यक्त केली जात आहे.

**नागरिकांच्या जीवापेक्षा ठेकेदार महत्त्वाचे?**
शहरात कचरा वाहतूक करताना वाहनावरील कचरा झाकून नेणे, रस्त्यावर कचरा पडू न देणे, तसेच वाहतूक नियमांचे पालन करणे बंधनकारक असताना या वाहनांकडून या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसत आहे. यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा ठेकेदारांच्या हिताला प्राधान्य दिले जात असल्याच्या चर्चा नागरिकांमध्ये होत आहेत.

**आरोग्य विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**
या संपूर्ण प्रकरणात नगरपरिषदेचे आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद यांनी ठेकेदारावर तात्काळ कारवाई का केली नाही, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. अपघातास कारणीभूत ठरलेल्या त्रुटींवर अजूनही कठोर पावले का उचलली नाहीत, ठेकेदार व अधिकारी यांच्यात काही अर्थपूर्ण वाटाघाटी आहेत का ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# शेतातील सालगडी दुचाकी घेऊन कुटुंबासह फरार

## पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.१८ जून-**
बार्शी तालुक्यातील पानगांव येथे कामासाठी ठेवलेल्या सालगड्याने मालकाचा विश्वासघात करत मोटारसायकल चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शेतकरी बाबासाहेब मच्छिंद्र डोईफोडे ( पानगाव, ता. बार्शी) यांनी सालगडी विरोधात बार्शी तालुका ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबासाहेब डोईफोडे हे शेती व्यवसाय करतात. त्यांच्या शेतात विनोद गणेश राठोड (रा. सावरगाव मुंढे, ता. लोणार, जि. बुलढाणा) हा सालगडी म्हणून काम करत होता. यापूर्वीही तो सुमारे सात महिने त्यांच्या शेतात काम करून गेला होता. चांगले काम केल्यामुळे त्याच्यावर डोईफोडे कुटुंबाचा विश्वास होता.

काही दिवसांपूर्वी विनोद राठोड हा पत्नी व मुलासह पुन्हा कामासाठी पानगांव येथे आला होता. राहण्यासाठी शेतातील खोली देण्यात आली होती. तसेच शेतातील कामे करण्यासाठी डोईफोडे यांनी त्याला स्वतःची मोटारसायकल वापरण्यास दिली होती. त्यामुळे मोटारसायकलची चावीही त्याच्याकडेच राहत होती.

दरम्यान, १० जून रोजी रात्री सर्व काही सुरळीत असल्याची खात्री करून डोईफोडे झोपले. मात्र दुसऱ्या दिवशी ११ जून रोजी सकाळी नेहमीप्रमाणे शेत परिसरात फेरफटका मारण्यासाठी गेले असता, सालगडीला राहण्यासाठी दिलेली खोली उघडी आढळली. तसेच घरासमोर उभी असलेली मोटारसायकलही गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

यावेळी विनोद राठोड याला हाक मारूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. खोलीत जाऊन पाहणी केली असता तो, त्याची पत्नी, मुलगा तसेच त्यांचे सर्व साहित्य तेथून निघून गेले असल्याचे दिसून आले. त्याच्याशी मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा मोबाईल बंद असल्याचे आढळले. काही दिवस त्याच्या परत येण्याची वाट पाहिल्यानंतर आणि संपर्क साधण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर डोईफोडे यांनी पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. चोरून नेण्यात आलेली दुचाकी ही होंडा युनिकॉर्न कंपनीची काळ्या रंगाची (क्र. -१३/-६२४३) असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. सदर मोटारसायकल विनोद गणेश राठोड याने विश्वासाचा गैरफायदा घेत परस्पर लबाडीने चोरून नेल्याचा आरोप करण्यात आला असून, पोलिसांनी तक्रारीची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.



## श्री वीरतपस्वी स्कूलमध्ये प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**
श्री वीरतपस्वी इंग्लिश मीडियम स्कूल एमआयडीसी येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव शांतय्या स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे व मुख्याध्यापिका लक्ष्मी कंदीकटला यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन व गोड खाऊचे वाटप करून जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी शांतय्या स्वामी यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिस्त, परिश्रम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले. मुख्याध्यापिका लक्ष्मी कंदीकटला यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी व उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुसज्ज करण्यात आलेल्या ॲक्टिव्हिटी रूमचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुतिका कुदरे यांनी तर रेणुका बदलापुरे यांनी आभार मानले.

## गादेगाव ते गव्हाणे वस्ती रस्त्याच्या दुरुस्तीची राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८ जून -**
पंढरपूर तालुक्यातील गादेगाव ते गव्हाणे वस्ती (ग्रा.मा. १०७) या सहा किलोमीटरच्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे केली आहे.



गादेगावची लोकसंख्या सुमारे १२ हजार इतकी आहे. दहा वर्षांपूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत बांधण्यात आलेला हा रस्ता सध्या अत्यंत खराब झाला असून त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून शालेय विद्यार्थी, नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनधारकांना रस्ता समजणे कठीण होते, ज्यामुळे अनेकदा छोटे-मोठे अपघात झाले आहेत. ग्रामस्थांची होणारी गैरसोय लक्षात घेता, खासदार निधीतून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी मंजूर करावा, अशी आग्रही मागणी नागेश फाटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



# सोलापूरचा गारमेंट उद्योग जागतिक नकाशावर येण्यासाठी सज्ज

## गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे खजिनदार श्रीकांत अंबुरे यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**
व्हीएतनाम दौरा हा फक्त फॅक्टरी विजिट नव्हता तर सोलापूरच्या गारमेंट उद्योजकाच्या डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनची ती सुरुवात होती. स्मार्ट लिंक एआयच्या लॉन्चपर्यंत हा कार्यक्रम पार पडला. यामुळे सोलापूर आता जागतिक नकाशावर येण्यासाठी सज्ज झाले असल्याचे मत सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे खजिनदार श्रीकांत अंबुरे यांनी व्यक्त केले.

जागतिक स्पर्धेत युनिफॉर्म उत्पादन त्याचे गुणवत्ता उत्पादन क्षमता या स्पर्धात्मक युगात ए आय स्मार्ट लिंक तंत्रज्ञानाची माहिती अशा विविध उद्देशाने १३ जून ते १७ जून या कालावधीत व्हिएतनाम दौरा शिवण यंत्र उत्पादक कंपन्यांमध्ये अग्रगण्य असलेल्या जॅक या शिलाई मशीन कंपनीने हा दौरा गणेश सुत्रावे यांच्या माध्यमातून आयोजित केले होते.

तो यशस्वीपणे पूर्ण झाला.या यशस्वी व्हिएतनाम दौऱ्यामध्ये सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पवार, उपाध्यक्ष रमेश डाकलिया, खजिनदार श्रीकांत अंबुरे, डायरेक्टर आनंद झाड, सदस्य प्रशांत राठी तसेच सीएमएआय वेस्टर्न रिजनचे डायरेक्टर अमित कुमार जैन, असोसिएटेड गारमेंट क्लस्टर फाउंडेशनचे डायरेक्टर अजय रंगरेज यांचा समावेश होता. या शिष्ट मंडळाने जॅक कंपनीचे आभार मानले. यावेळी जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाची ओळख करून दिलेल्या लिओ यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

श्री. अंबुरे म्हणाले, जॅक या कंपनीने नव्याने विकसित केलेले स्मार्ट लिंक ए.आय. तंत्रज्ञानाचे सादरीकरण म्हणजे संपूर्ण गारमेंट उत्पादन क्षेत्र पूर्णपणे बदलून टाकणारे आहे. कारण ए.आय.मुळे उत्पादकता ४० ते ५० टक्क्यापर्यंत वाढण्याची शक्यता आहे. तसेच क्वालिटी कंट्रोल मध्ये रियल टाईम मध्ये म्हणजे अगदी वेळेवर दोष ओळखून या मध्ये वाया जाणारे कापड वाचवता येणार आहे. महत्त्वाचे म्हणजे सोलापूरच्या गरजेनुसार खास डिझाईन केलेल्या दोन अत्याधुनिक मशीन्स या वेळी लॉन्च करण्यात आल्या. त्यामुळे सोलापूरचा गारमेंट उद्योग उत्पादकता मध्ये नेक्स्ट लेवल गाठू शकेल. ए.आय मुळे उत्पादकता क्वालिटी कंट्रोल तसेच ऑटोमेशन चेंज सिस्टीम पेक्षा पुढची पायरी असलेले मशीन स्वतःच सेटिंग बदलून घेऊन उत्पादन वाढविण्यासाठी मदत करेल. यामुळे वेळेची बचत होईल आणि उत्पादने वाढलेले असेल.

असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पवार म्हणाले, या परिषदेत मोरोक्को, श्रीलंका, रशिया, उझबेकिस्तान, चीन, व्हिएतनाम येथील आघाडीच्या उत्पादकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. जागतिक ट्रेंड्स आणि बेस्ट प्रॅक्टिसेस समजून घेता आल्या.

### बालविवाह प्रकरणी पती व विवाह जमणाऱ्या दोन महिलांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जून-**



अल्पवयीन मुलीसोबत विवाह करणाऱ्या पतीसह विवाह जमवणाऱ्या दोन महिलांविरुद्ध जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका अशा सेविकेने फिर्याद दिली आहे. हा प्रकार २८ जानेवारी २०२४ रोजी घडला. मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तरूणाने तिच्यासोबत लग्न केले. शिवाय हे लग्न जमवण्यासाठी दोन महिलांनी महत्वाची भूमिका निभावली. हा प्रकार लक्षात आल्यानंतर एका अंगणवाडी सेविकेने या बाबत जेलरोड पोलिसांना माहिती दिली. महिला पोलिस हवालदार गुत्तीकोंडा या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .

---

### शाळेजवळून अल्पवयीन मुलीस नेले पळवून

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जून-**




अज्ञात इसमाने शहरातील एका शाळेजवळून एका अल्पवयीन मुलीला आमिष दाखवून फूस लावून बुधवारी सकाळी पळवून नेल्याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत संबंधित मुलीच्या वडीलांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीने नेहमीप्रमाणे त्यांच्या मुलीला बुधवारी सकाळी शाळेच्या गेटवर सोडले होते. मात्र, ९.३० वाजण्याच्या सुमारास शाळेतील एका शिक्षकाला अज्ञात व्यक्तीने फोन केला व त्याने मुलीचे वडील असल्याचे सांगून घेऊन जाण्याची विनंती केली. मुलगी शाळेच्या बाहेर आली व ती अज्ञात इसमाच्या गाडीवर बसुन निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार आवताडे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# युक्रेनच्या हल्ल्याने रशिया हादरला

## मॉस्कोमधील तेल शुद्धीकरण प्रकल्पावर ड्रोनचा मारा; चार वर्षांतील सर्वांत मोठा प्रहार

**कीव्ह, १८ जून**

युक्रेनच्या सैन्याने रशियाची राजधानी मॉस्कोला लक्ष्य करीत पाचशेपेक्षा अधिक लांब पल्ल्याच्या ड्रोनचा मारा केला. यात रशियातील सर्वात मोठ्या दुसऱ्या कपोतन्या या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला आग लागली. हल्ल्यात प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले. याशिवाय निवासी इमारतीवर ड्रोनचा मारा करण्यात आला, यात अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या.



रशियाच्या संरक्षण विभागाने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, मॉस्कोमधील एका महत्त्वाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला लक्ष्य करत युक्रेनी सैन्याने ड्रोनचा मारा केला. या हल्ल्यात प्रकल्पाला आग लागल्याने मोठे नुकसान झाले. सुरक्षात्मक उपाय म्हणून राजधानीतील विमानतळावरील विमानांच्या उड्डाणे तात्पूरती थांबवण्यात आली. या हल्ल्यात निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत. हवाई संरक्षण प्रणालीने पाचशेपेक्षा अधिक ड्रोन हवेतच नष्ट केले. तथापि या हल्ल्यात जीवितहानीची माहिती देण्यात आलेली नाही. क्रेमलिनपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मॉस्को तेल शुद्धीकरण कारखान्यावर ड्रोनचा मारा करण्यात आला. हा रशियातील सर्वात मोठ्या प्रकल्पांपैकी एक आहे. तेल उत्पादनाचा पुरवठा बाधित करून रशियाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान पोहोचवणे हा या हल्ल्याचा उद्देश असल्याचे युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे.

**रशियाचे प्रत्युत्तर, अनेक भागांना केले लक्ष्य**

मॉस्कोच्या आग्नेय दिशेला असलेल्या कपोतन्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला लक्ष्य केले. याच प्रकल्पावर दोन दिवसांपूर्वीही हल्ला झाला होता. याशिवाय रोस्तोव प्रदेशातील एका तेल डेपोवरही हल्ला झाला. युक्रेनच्या हल्ल्यानंतर काही तासांतच रशियानेही प्रत्युत्तर दिले. युक्रेनियन वायुदलाच्या माहितीनुसार, रशियाने सात क्षेपणास्त्रे आणि २३९ ड्रोन डागले. या हल्ल्यांमध्ये कीव्ह आणि पोल्टावा प्रदेशातील एक खाजगी घर, एक वीज प्रकल्प, एक हँगर आणि तेल प्रतिष्ठापनांचे नुकसान झाले. ◂ (वृत्तसंस्था)

### स्फोटाचे आवाज, आगीच्या ज्वाळा

**युक्रेनने मॉस्कोवर केलेला हल्ला गेल्या चार वर्षांतील सर्वात मोठा ड्रोन हल्ला आहे. रशियन संरक्षण मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, देशभरात ५५५ युक्रेनियन ड्रोन पाडण्यात आले, त्यापैकी १९४ एकट्या राजधानी मॉस्कोच्या दिशेने जात होते. या हल्ल्यानंतर अनेक ठिकाणी आग लागली, तेल शुद्धीकरण कारखान्यात स्फोट झाले आणि मॉस्कोमधील सर्व प्रमुख विमानतळ तात्पुरते बंद करण्यात आले.**

# सोने, चांदी, हिऱ्यांच्या १,२५० श्रीराम शिळा गायब

## राममंदिर देणगी प्रकरण, धर्मसेना संस्थापकाचा नवा दावा

**अयोध्या, १८ जून**

श्रीराम मंदिरासाठीच्या देणग्यांच्या अपहारावरून सुरू असलेल्या गदारोळात आणखी एक मोठा दावा समोर आला आहे. धर्मसेनाचे संस्थापक आणि श्रीराम मंदिर आंदोलनाचे सदस्य संतोष दुबे यांनी दावा केला आहे की, भारत आणि परदेशात पूजा झाल्यानंतर अयोध्येत आणलेल्या सोने, चांदी, हिरे आणि अष्टधातूच्या १,२५० श्रीराम शिळा गायब झाल्या आहेत. संतोष यांनी ट्रस्टचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अपहाराचा आरोप करत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

संतोष यांच्या म्हणण्यानुसार, या शिला अडीच दशकांपूर्वीपर्यंत कारसेवकपुरम येथे होत्या. त्यांच्यासोबत मातीच्या शिळादेखील ठेवण्यात आल्या होत्या. आता फक्त मातीच्या शिळा शिल्लक राहिल्या आहेत, तर मौल्यवान शिळा नाहीशा झाल्या आहेत. सोने, चांदी, हिरे आणि अष्टधातूच्या शिलांच्या देखभालीची जबाबदारी ट्रस्टच्या सरचिटणीसांवर होती. ही जबाबदारी सोपवल्यानंतरही त्या शिळा कुठे गायब झाल्यात असा प्रश्न उपस्थित होत आहे. १९८९ मध्ये श्रीराम मंदिर आंदोलनादरम्यान देणगी गोळा करण्यासाठी घरोघरी जाऊन मोहीम राबवण्यात आली होती. त्यांनी मंदिराच्या बांधकामात वापरण्यात येणाऱ्या पवित्र दगडांचीही मागणी केली होती. त्यांच्यावर हिरे, सोने, चांदी आणि अष्टधातूच्या दगडांचा हिशोब तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. या कामात आरएसएसचे अनेक पदाधिकारीही सहभागी होते. सर्वात मौल्यवान दगड मॉरिशसमधून आला होता.



**टिन्नूच्या घरातून कोट्यवधींचे सोने जप्त**

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्थापन केलेले विशेष तपास पथक (एसआयटी) १५ जूनला अयोध्येत दाखल झाले. या पथकाने श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांची सहा तास चौकशी केली आणि डिजिटल पुराव्यांची तपासणी केली. या कारवाईपूर्वी पाच प्रमुख संशयितांकडून सुमारे २ कोटी रुपये रोख, एक आलिशान कार आणि तीन आयफोन जप्त करण्यात आले. या घोटाळ्यात ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांचे जवळचे सहकारी रामशंकर यादव उर्फ टिन्नू यांचे नाव समोर आले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पहिले महायुद्ध संपविणाऱ्या व्हर्सायमध्येच करार

**पॅरिस, १८ जून**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतच्या शांतता करारावर फ्रान्सच्या व्हर्साय शहरातील व्हर्साय पॅलेसमध्ये स्वाक्षरी केली. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान आभासी पद्धतीने उपस्थित होते. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत झालेल्या एका विशेष डिनर दरम्यान ट्रम्प यांनी या करारावर स्वाक्षरी केली. जर्मनीच्या पराभवानंतर युद्ध संपुष्टात आणणारा तह जिथे करण्यात आला होता त्या व्हर्साय पॅलेसममध्ये करारावर स्वाक्षरी झाली.



ज्या व्हर्साय पॅलेसमध्ये हा करार झाला, त्याला मोठा ऐतिहासिक वारसा आहे. इतिहासात अनेक मोठे वाद आणि युद्धे संपवण्यासाठी याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे करार झाले आहेत. यातील सर्वात प्रसिद्ध करार म्हणजे १९१९ चा 'व्हर्सायचा तह', ज्यामुळे पहिल्या महायुद्धाचा अधिकृत शेवट केला होता. आता याच भूमीवर अमेरिका-इराण शांतता करार झाल्याने जागतिक राजकारणाला एक नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. या कराराला अधिकृतपणे 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण यांच्यातील इस्लामाबाद सामंजस्य करार' असे नाव देण्यात आले आहे. अमेरिका, इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष थांबवून तातडीने युद्धबंदी लागू करणे. इराणवर लादलेले आर्थिक निर्बंध शिथिल करणे आणि दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्य वाढवणे. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत भविष्यातील चर्चेची रूपरेषा निश्चित करणे. जागतिक व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली हॉर्मुझची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी पुन्हा खुली केली जाईल, असे या करारातील मुख्य मुद्दे आहेत.

**पडद्यामागे घडल्या घडामोडी**

स्वाक्षरीच्या वेळी अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबिओ यांनी हा करार ट्रम्प यांच्याकडे सुपूर्द केला. त्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ट्रम्प यांनी हे काम अजिबात सोपे नव्हते, असे सांगत पडद्यामागील कठीण वाटाघाटींचे संकेत दिले. स्वाक्षरी झाल्यानंतर ट्रम्प यांनी कराराची प्रत सर्वांना दाखविली.

**काही प्रश्न अजूनही अनुत्तरीत**

या ऐतिहासिक स्वाक्षरीनंतरही काही तांत्रिक प्रश्न अजूनही कायम आहेत. या स्वाक्षरीमुळे अंतिम करारासाठी आवश्यक असणारा ६० दिवसांचा वाटाघाटींचा कालावधी सुरू झाला आहे का, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. तसेच, गेल्या रविवारी ट्रम्प यांनी याच कराराला डिजिटल मंजुरी दिली होती, मग आता व्हर्सायमधील प्रत्यक्ष स्वाक्षरीचे स्वरूप त्यापेक्षा कसे वेगळे आहे, यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# असीम मुनीर-शाहबाज पडले तोंडघशी

**पॅरिस, १८ जून**

अमेरिका-इराण यांच्यातील १०७ दिवसांचे युद्ध फ्रान्समध्ये झालेल्या शांतता कराराने संपुष्टात आले. करारावर स्वाक्षरी करताना पाकिस्तानला बाजूला ठेवण्यात आल्याने पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर चांगलेच तोंडघशी पडले. शरीफ यांनी गाजावाजा केलेल्या भव्य जीनेव्हा समारंभाला जाण्याचे इराणने नाकारल्याने त्यांना जागतिक नामुष्कीला सामोरे जावे लागले.

इराण-अमेरिकेत करार घडविण्याचे श्रेय शाहबाज यांनी घेतले. जीनेव्हा येथे जाण्याच्या तयारी असलेल्या पाकिस्तानच्या पंतप्रधानांना ट्रम्प आणि इराणी नेत्यांनी चांगलीच चपराक देत परस्पर करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे मध्यस्थीच्या भूमिकेत असलेल्या शाहबाज यांची नामुष्की झाली. बुधवारी रात्री अचानक झालेल्या घटनाक्रमामुळे शरीफ आणि मुनीर यांच्या प्रसिद्धी मोहिमेची हवाच निघून गेली आहे. पाकिस्तानने या शांतता चर्चेला एक मोठे राजनैतिक यश म्हणून सादर करण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. शरीफ यांनी राष्ट्रीय सभेत अधिकृतपणे घोषणा केली की, अमेरिका-इराण शांतता करारावर स्वाक्षरी झाल्याच्या निमित्ताने १९ जून रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे एक भव्य समारंभ आयोजित केला जाईल आणि पाकिस्तान त्याचे आयोजन करेल. मात्र घोषणा केल्याच्या काही तासातच करार झाला.

**इराणचा प्रतिहल्ला, पाकिस्तानची नामुष्की**

पाकिस्तानची खरी नामुष्की तेव्हा झाली, जेव्हा इराणने अधिकृतपणे स्पष्ट केले की जिनिव्हामध्ये असा कोणताही औपचारिक समारंभ आयोजित केला जात नाही. कोणत्याही देशासाठी यापेक्षा मोठी राजनैतिक नामुष्की असू शकत नाही. शरीफ यांनी कराराचे संपूर्ण मुनीर यांच्या प्रयत्नांना दिले होते. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता


### अदा शर्माच्या मराठी चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित

**मुंबई** : 'झिगझॅग प्रॉडक्शन' आणि 'गणराज स्टुडिओज' यांनी आपल्या नव्या मराठी चित्रपटाची घोषणा केली आहे. 'गजरा' असे या चित्रपटाचे नाव असून, नुकतेच या चित्रपटाचे पहिले पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. या चित्रपटात बॉलिवूड अभिनेत्री अदा शर्मा झळकणार आहे. पोस्टरमध्ये अदा शर्माचा अत्यंत रौद्र, भीतीदायक आणि रक्ताने माखलेला चेहरा दाखवण्यात आला आहे. तिच्या डोळ्यांमधील तीव्र भाव, कपाळावर लावलेले कुंकू आणि नाकातील पारंपरिक नथ हा लूक लक्षवेधी ठरतो आहे. 'गजरा'ची कथा समाजातील सत्य घटनांवर आधारित आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन श्रेयस जाधव करत आहेत. देवदत्त मनीषा यांचे संगीत असून निर्मिती अमोल बोरकर यांनी केली आहे.




### आमिर आणतोय् 'बटवारा १९४७'

**मुंबई** : फाळणीच्या काळातील वेदना, संघर्ष आणि मानवतेचा प्रवास मोठ्या पडद्यावर मांडणारा बहुप्रतिक्षित 'बटवारा १९४७' हा चित्रपट आता प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. आमिर खान प्रोडक्शन्सने या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित केली आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी पात्रांचे पोस्टर्स प्रदर्शित केले आहेत. ही पात्रे दुःखाच्या भितीच्या छायेत दडलेली दिसताहेत. तर काही ठिकाणी शक्ती, निरागसता दाखवतात. आमिर खान प्रोडक्शन्सने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटच्या माध्यमातून या चित्रपटाबद्दल माहिती दिली आहे. या चित्रपटात मातृभूमीप्रती असलेले धैर्य आणि दृढनिश्चय दाखवणारी कथा मांडण्यात आली. आमिर खान प्रोडक्शनने विस्कळीत झालेल्या जगात, त्यांची कहाणी धैर्याचा एक दाखला होती. हे सर्व अनुभवलेल्या लोकांना भेटा, बटवारा १९४७, १४ ऑगस्टपासून थिएटरमध्ये, असे लिहिले आहे.




### एका रीलसाठी ओरी घेतो ७६ लाख रुपये

**मुंबई** : इन्फ्लुएन्सर ओरी याचे खरे नाव ओरहान अवत्रामणी आहे. तो बऱ्याच काळापासून त्याची कमाई आणि व्यवसायाबद्दल चर्चेत आहे. आता त्याने तो पैसे कसे कमावतो याचा खुलासा केला आहे. ब्रँड एंडोर्समेंट आणि स्पॉन्सर्ड कंटेंट हे त्याच्या कमाईचे मोठे साधन आहे, असे एका पॉडकास्टमध्ये ओरीने सांगितले. त्याने एका रीलसाठी ७६ लाख रुपयांपर्यंत शुल्क घेतल्याचे मान्य केले आहे. त्याने त्याच्या बिझनेस मॉडेल आणि पर्सनल फायनान्स मॅनेजमेंटशी संबंधित अनेक गोष्टी शेअर केल्या. ओरी पहिल्यांदा अंबानी कुटुंबाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन चर्चेत आला होता. कोणीही त्याला खाजगी कार्यक्रमांसाठी बोलवू शकतो. यामध्ये लग्न, वाढदिवस आणि भोजन समारंभ यांसारख्या कार्यक्रमांचा समावेश आहे. कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी तो १५ लाख ते २५ लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारतो.



# सायबर गुन्हेगार परजीवी; समाज-अर्थव्यवस्थेसाठी घातक

## सरन्यायाधीशांची आरोपींविरूद्ध कठोर भूमिका

**नवी दिल्ली, १८ जून**

सायबर गुन्हेगार परजीवी आहेत. ते निष्पाप गुंतवणूकदारांची फसवणूक करतात. त्यांच्यापासून समाज आणि अर्थव्यवस्थेला धोका आहे. त्यामुळे अशा गुन्हेगारांसोबत आपल्याला अत्यंत कठोर भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला. आहे. एका व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना ही टिप्पणी सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने केली. या याचिकेत त्याने वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्याच्याविरुद्ध दाखल झालेल्या अनेक एफआयआर एकत्र करण्याची मागणी केली होती.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले, अशा गुन्ह्यांचे बळी नेहमीच संपूर्ण भारतीय असतात. तुम्ही तामिळनाडूमध्ये कोणाची फसवणूक करा, मग जम्मू आणि काश्मीरला जा आणि त्यानंतर ईशान्येकडे जाणार. त्यांचे हे सुरुच राहणार. त्यामुळे अशा सायबर गुन्हेगारांना तुरुंगात ठेवणे हे समाजाच्या सर्वोत्तम हिताचे असेल, असेही त्यांनी नमूद केले.

**याचिका विचारात घेण्यास दिला नकार**

सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याविरुद्ध वेगवेगळ्या राज्यांमध्ये दाखल झालेल्या अनेक एफआयआर एकत्र करण्याची मागणी करणारी याचिका विचारात घेण्यास नकार दिला. याचिकाकर्ता दिलासा मिळविण्यासाठी संबंधित उच्च न्यायालयात जाऊ शकतो, असे न्यायासनाने स्पष्ट केले.◂ (वृत्तसंस्था)




अमरनाथ यात्रेच्या पृष्ठभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये कडक सुरक्षाबंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पुलवामा जिह्यातील रत्निपोरा रेल्वेस्थानकावर मॉक ड्रील करताना सुरक्षा जवान

# १.६५ लाख कोट्यधीशांनी निवडला परदेश

## अरब-सिंगापूर पहिली पसंती

**वॉशिंग्टन, १८ जून**

हेनली प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन अहवाल २०२६ नुसार, या वर्षी विक्रमी म्हणजेच १.६५ लाख कोट्यधीश त्यांचा देश सोडून दुसऱ्या देशांमध्ये स्थलांतर करणार आहेत. मागील वर्षी सुमारे १.४२ लाख कोट्यधीशांनी देश सोडला होता.

२०२४ मध्ये हा आकडा १.३४ लाख होता, तर २०१३ मध्ये ५१ हजार होता. श्रीमंत कुटुंबे आता केवळ कर सवलतीसाठीच नव्हे, तर स्थिरता, सुरक्षा आणि चांगल्या गुंतवणुकीसाठीही दुसऱ्या देशांमध्ये जात आहेत. यूएई ८५.३ गुणांसह सर्वात पसंतीचे 'वेल्थ हब' आहे. भारताचे गुण ५६.५ आहे. अमेरिकेचा वेल्थ मोबिलिटी स्कोअर केवळ ६२.३ आहे. येथून सर्वाधिक लोक इतर देशांचे नागरिकत्व मागतात. २०२५ मध्ये असे अर्ज दुप्पट झाले आणि ही गती २०२६ मध्येही कायम राहिली. केवळ सात टक्के अर्ज विदेशात स्थायिक झालेल्या अमेरिकन लोकांकडून आले, बाकीचे देशात राहणाऱ्या श्रीमंतांकडून. यापैकी अर्धे युरोपसाठी आणि एक चतुर्थांशपेक्षा जास्त लॅटिन अमेरिका-कॅरिबियनसाठी आहेत.२०२४-२५ मध्ये ब्रिटनच्या पत्त्यावरून अर्ज १५ टक्के वाढले. २०२६ मध्ये तेथून ५३ टक्के अर्ज विदेशी नागरिकांचे होते, म्हणजेच ब्रिटिश नागरिकांचा वाटा जवळपास अर्धा होता. २०१८ मध्ये हा वाटा फक्त आठ टक्के होता. २०१८ मध्ये ब्रिटन २०वे सर्वात मोठे सोर्स मार्केट होते. यूएईचे गुण सर्वाधिक म्हणजेच ८५.३ आहे. बहुतेक मागणी विदेशी व्यावसायिकांकडून आहे, जे यूएईला आधार बनवून इतर पर्याय शोधत आहेत. हे श्रीमंत लोक यूएईला एक प्लॅटफॉर्मसारखा वापर करू इच्छितात.



**दुसरे नागरिकत्व एस्टेट प्लॅनिंगचा भाग**

भारताचा वेल्थ मोबिलिटी स्कोअर ५६.५ आहे. हे संरचनात्मक आव्हानांच्या श्रेणीत येते. याची सर्वात मोठी कारणे भांडवलावर निवडक लोकांचे नियंत्रण आणि करांबाबतचे जटिल नियम आहेत. श्रीमंत भारतीय कुटुंबांसाठी दुसरे निवासस्थान किंवा नागरिकत्व आता 'अ स्टेट प्लॅनिंग' आणि 'टॅक्स स्ट्रक्चरिंग'सारख्या निर्णयांचा भाग बनत आहे. शिक्षण, व्यवसाय विस्तार आणि सक्सेशन प्लॅनिंग यांचा यात समावेश आहे.

**युरोपः स्पेन, पोर्तुगालमधील कठोरतेमुळे ग्रीसला फायदा**

गुंतवणूक-नागरिकत्व अर्जांपैकी जवळपास अर्धे पोर्तुगाल, इटली, नेदरलँड्स, सायप्रस यांसारख्या युरोपीय देशांसाठी आहेत. स्पेनचा गोल्डन व्हिसा बंद झाल्यामुळे, पोर्तुगालचा रिअल इस्टेट मार्ग हटल्यामुळे ग्रीसला थेट फायदा होत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भाजपा नेत्यासह तिघांना जिवंत जाळले

## छत्तीसगडमधील थरारक घटना, वाळू प्रकरणातून हत्या

**रायपूर, १८ जून**

रेती उपशाच्या जुन्या वादातून भाजपा नेत्यासह तिघांवर पेट्रोल टाकून जिवंत जाळल्याची थरारक घटना छत्तीसगडच्या कोरिया जिल्ह्यात समोर आली. फॉर्च्युनर कारला ट्रकच्या साहाय्याने कोंडीत पकडून, त्यावर पेट्रोल ओतून पेटवून देण्यात आली. या आगीत भाजपा नेते आणि माजी जनपद पंचायत अध्यक्ष भारत सिंह (उर्फ लल्ला सिंह) यांच्यासह तिघांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मृत भारत सिंह यांच्या कुटुंबीयांनी रेती उपशाच्या जुन्या वादातून ही घटना घडल्याचा आरोप केला. भारत सिंह तडजोड करण्यासाठी गेले होते, मात्र आधीच सापळा रचण्यात आला. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत याप्रकरणात चार आरोपींना अटक केली तर, इतरांचा शोध सुरु आहे. दरम्यान, या घटनेमुळे कोरिया जिल्ह्यात तणावाचे वातावरण असून, मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरेशा चौबे यांनी सांगितले की, रेती उपशाचा वाद मिटवण्यासाठी भारत सिंह कारने आरोपींची भेट घेण्यासाठी जात असताना, छिंगुरा परिसरात त्यांचे वाहन अडवण्यात आले. आरोपींनी कारवर पेट्रोल टाकून आग लावली. यात सिंह यांच्यासह तिघांचा होरपळून जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी आहे, त्याच्यावर उपचार सुरू आहे. भारत सिंह यांना रेती उपशाचे कंत्राट मिळाले होते. पण, यानंतर सोनहत, कैलासपूर, तेलीमुडा, बेलिया आणि छिंगुरा परिसरात रेती वाहतूक आणि अवैध वसुलीवरून वाद सुरू झाला. पैशांचे व्यवहार आणि रेतीच्या वर्चस्वावरून दोन्ही गटांतील वाद वाढला आणि त्याचे रूपांतर संघर्षात झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# चक्रमादित्याची चंचल जिव्हा

काही अपवाद वगळले तर अमेरिकेला लाभलेली राष्ट्राध्यक्षांची परंपरा त्या देशाने मिरवावी अशीच आहे. जॉर्ज वॉशिंग्टन ते डोनाल्ड ट्रम्प या मालिकेत आतापर्यंत ४७ राष्ट्राध्यक्ष झाले. ट्रम्प महाशय ४५ वे राष्ट्राध्यक्ष होतेच. ४७ वे राष्ट्राध्यक्षही तेच आहेत. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष हा राष्ट्रप्रमुख, शासनप्रमुख असतो. संघराज्याच्या कार्यपालिकेचे आणि लष्कराचे नियंत्रण राष्ट्राध्यक्षाच्या हाती असते. विसाव्या शतकाच्या आरंभापासून अमेरिका आणि जगाच्या राजकीय पटलावर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला फार महत्त्व आले. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष त्या देशापुरता प्रमुख न राहता एका जागतिक महासत्तेचा प्रमुख म्हणून पाहिला जाऊ लागला. कर्तबगार, विद्वान आणि सभ्य राष्ट्राध्यक्षांची परंपरा आणि अर्थकारण, शिक्षण, संशोधनासाठी अमेरिकेला जगात फार मोठे वजन आहे, हे नाकारता येत नाही. परंतु, वर्तमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जणू ही परंपराच निकालात काढण्याचे ठरविलेले दिसते. कधी ते भारताला मित्र म्हणतात, कधी शत्रू म्हणतात. कधी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करतात, कधी ते आपले मित्र आहेत, असे म्हणतात. जागतिक पटलावर विविध देशांबद्दल, विविध मुद्यांबद्दलही त्यांची वक्तव्ये कधीच सुसंगत नसतात. काल आपण काय बोललो होतो आणि आज काय बोलतो आहोत, याचा ताळमेळही नसतो. माझ्यासाठी अमेरिका प्रथम आहे, असे त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षाने म्हणणे व तसे वागणे अयोग्य नाही. परंतु, हा देश महाशक्ती बनविण्यात आपले काहीच योगदान नसताना त्या देशाची परंपरा, प्रतिष्ठा आणि ताकद हे सारे पणाला लावणे गैरच. पण, ट्रम्प यांना टीकाटिप्पणीचे काहीच वाटत नसावे. एवढ्या मोठ्या पदावर एवढा मोठा चक्रमादित्य बसावा हा अमेरिकेच्या भाळी आलेला पीडा-योग म्हटला पाहिजे.

सगळी माणसे सारखी नसतात. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्षही माणूसच असतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राध्यक्ष वेगळ्या स्वभावाचा असणे स्वाभाविकच आहे. मात्र, प्रेसिडेन्शियल डेकोरम नावाची एक चीज अमेरिकेच्या सत्ता वर्तुळात कायम चर्चेला असते. तिचा अर्थ असा की, वैयक्तिक राग-लोभ, लहरी, स्वार्थ यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्राध्यक्षांचे सार्वजनिक वर्तन आणि व्यवहार हा सभ्यच असला पाहिजे. पण, ट्रम्प यांना सभ्यतेच्या संकेतांशी जणू काहीही देणेघेणे नाही. भारताला ऑपरेशन सिंदूर थांबविण्यास मीच सांगितले इथपासून ते भारतावर हल्ला झाला तर मीच धावून येईन, इथपर्यंतच्या पुड्या हा चक्रमादित्य सोडत असतो. एका बाजूला चीनशी संधान बांधून भारताची अडवणूक करतो. भारताच्या व्यापारी जहाजांवर अमेरिकेचा हल्ला होतो तेव्हा खलाशांच्या बाबतीत असे घडतच असते, असे ट्रम्प म्हणत असतात. स्वतःच्या मानसिक स्थितीवरच्या प्रश्नावरही ते अद्वातद्वा बोलतात. धादांत खोटी वक्तव्ये, धादांत खोटे दावे करण्यात ते पटाईत आहेत. अशा माणसामुळे अमेरिकेचे जे नुकसान होतेय, ते होतेच आहे. शिवाय, वर्तमान जगातील अस्थिरतेच्या मुळाशी डोनाल्ड ट्रम्प यांचा लहरी स्वभाव आहे. पूर्वीच्या बहुतांशी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी किमान आपल्या शब्दांचा आणि पदाच्या प्रतिष्ठेचा काही तरी विचार केला. त्यांच्या धोरणांबद्दल मतभेद असू शकतात, त्यांच्या निर्णयांवर टीका होऊ शकते; पण त्यांनी आपल्या देशाच्या संस्थांवर, न्यायव्यवस्थेवर, माध्यमांवर किंवा मित्रराष्ट्रांवर सातत्याने संशयाचे सावट निर्माण केले नाही. ट्रम्प यांच्या बाबतीत मात्र परिस्थिती वेगळी आहे. त्यांच्या प्रत्येक वक्तव्यामुळे नवा गोंधळ निर्माण होतो. त्यांनी केलेले विधान हे अमेरिकेचे अधिकृत धोरण आहे, की केवळ त्यांची वैयक्तिक प्रतिक्रिया, याचा उलगडा करण्यासाठी त्यांच्या प्रशासनालाच स्पष्टीकरणे द्यावी लागतात. ही स्थिती एका महासत्तेच्या राष्ट्राध्यक्षाला शोभणारी नाही.

राजकारणात मतभेद असतात, विरोधक असतात. तशीच स्थिती जगातही असते. सारेच एकमेकांचे मित्र नसतात आणि शत्रूही नसतात. लोकशाहीवादी जागतिक व्यवस्थेत अलिखित संकेत असा आहे की, राष्ट्रहिताच्या आणि जागतिक स्थितीच्या (ग्लोबल ऑर्डर) प्रश्नांवर काही प्रमाणात तरी सातत्य असावे. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात अनेक दशकांपासून काही मूलभूत मुद्दे कायम होते. ट्रम्प यांनी या मुद्यांनाच हादरे दिले. नाटोबद्दल एक भूमिका, युरोपबद्दल दुसरी भूमिका, चीनबद्दल तिसरी भूमिका आणि भारताबद्दल भलतीच भूमिका! त्यातील कोणती भूमिका किती काळ टिकेल, याची खात्री कुणालाच नसते. त्यामुळे अमेरिकेची मित्रराष्ट्रेही संभ्रमात पडतात आणि त्याचे कारण असते त्यांच्या चंचल जिव्हेच्या तऱ्हा! ट्रम्प यांची शैली ही मुळात राजकारण्यापेक्षा व्यावसायिक सौदेबाजाची आहे. ते व्यावसायिक आहेतच. त्यांनी जबाबदारीच्या पदाच्या संदर्भात व्यावसायिक भूमिका घेऊ नये, अशी अपेक्षा आहे. प्रत्येक प्रश्नाकडे ते व्यवहार म्हणून पाहतात. प्रत्येक संबंध नफा-तोट्याच्या तराजूत मोजतात. जागतिक राजकारण केवळ व्यवहारांवर चालत नाही. त्यात विश्वास, सातत्य, प्रतिमा आणि नैतिक नेतृत्व यांनाही महत्त्व असते. अमेरिका जगात प्रभावशाली बनला तो केवळ त्याच्या लष्करी ताकदीमुळे नव्हे, तर तेथील संस्थांमुळे, विद्यापीठांमुळे, संशोधनामुळे, नवोन्मेषामुळे आणि लोकशाही मूल्यांमुळे. ट्रम्प यांच्या वर्तनामुळे याच अधिष्ठानाला तडा जात असल्याची चिंता अनेक अभ्यासक व्यक्त करतात. ट्रम्प यांच्याबद्दलची टीका केवळ राजकीय विरोधातून होत नाही. त्यांच्या वक्तव्यांमधील विसंगती, तथ्यांकडे होणारे दुर्लक्ष आणि संस्थात्मक व्यवहाराबद्दलचा अविश्वास यामुळेच ती होते. एखाद्या राष्ट्राध्यक्षाने आपल्या विरोधकांवर टीका करणे समजू शकते. पण न्यायालये, निवडणूक प्रक्रिया, विद्यापीठे, पत्रकार आणि अगदी स्वतःच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवरही सतत संशय व्यक्त करणे विचित्र वाटते. भारताच्या दृष्टीने पाहिले तरी ट्रम्प हे कोडेच आहेत. एका बाजूला ते भारताचे कौतुक करतात, पंतप्रधान मोदी यांच्याशी मैत्रीचे संबंध असल्याचे सांगतात; तर दुसऱ्या बाजूला व्यापार, शुल्क, स्थलांतर किंवा आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे एक वाक्यही बाजारपेठा आणि जागतिक व्यवस्था अस्थिर करणारे ठरते. अशा परिस्थितीत ट्रम्प यांच्याकडून संयमित भाषा, विचारपूर्वक प्रतिक्रिया आणि जबाबदार संवाद ही अपेक्षा अवास्तव नाही. परंतु, ट्रम्प यांच्या बाबतीत अनेकदा याच्या नेमके उलट चित्र दिसते. सामाजिक माध्यमांवरील त्यांच्या प्रतिक्रिया, पत्रकार परिषदांतील त्यांची भाषा आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांवरील त्यांचे हल्ले एखाद्या राष्ट्राध्यक्षापेक्षा प्रचारसभेत भाषण देत असलेल्या उमेदवारासारखे वाटतात. कोणत्याही राष्ट्राचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या स्वभावात गांभीर्य आणि स्थैर्य अपेक्षित असते. ट्रम्प यांच्या नेतृत्वाबद्दलचा सर्वांत मोठा आक्षेप हाच आहे की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनिश्चितता आणि चंचलता ही अमेरिकेसारख्या महासत्तेसाठी आणि जगासाठीही धोक्याची ठरू शकते. जग आधीच युद्धे, आर्थिक संकटे, दहशतवाद, हवामान बदल आणि भू-राजकीय संघर्षांनी त्रस्त आहे. अशा वेळी जगाला स्थिर चित्त असलेल्या नेत्यांची गरज आहे. अमेरिका हा जागतिक व्यवस्थेतील महत्त्वाचा स्तंभ आहे. त्या स्तंभाच्या शिखरावर बसलेल्या व्यक्तीच्या प्रत्येक शब्दाला वजन असते. व्यक्ती कितीही लोकप्रिय असो, ती तिच्या पदापेक्षा मोठी नसते. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षीय परंपरेच्या तुलनेत पाहिले तर ट्रम्प यांची कारकीर्द अनेकदा अपवादापेक्षा अपघातासारखी अधिक भासते. जगातील सर्वांत शक्तिशाली खुर्चीवर बसलेल्या या चक्रमादित्याच्या प्रत्येक नव्या वक्तव्याकडे जग आश्चर्य, कुतूहल आणि काळजीने पाहत असते. अमेरिका आणि आंतरराष्ट्रीय समुदायाच्या हाती सध्या तरी तेवढेच आहे. ■

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# कर शून्य असला तरी ज्येष्ठ नागरिकांनी आयकर रिटर्न का भरावा?

आयकर रिटर्न भरण्याची अंतिम तारीख जवळ आली की करसल्लागार, चार्टर्ड अकाऊंटंट आणि वकिलांकडे एक प्रश्न हमखास विचारला जातो. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या मनात हा प्रश्न अधिक असतो.

''माझे उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी आहे. पेन्शन आणि बँकेच्या व्याजावर माझा उदरनिर्वाह चालतो. उपलब्ध सवलती आणि वजावटी घेतल्यानंतर माझा कर शून्य येतो. मात्र यावर्षी मी एक प्लॉट विकला, काही शेअर्स विकले किंवा म्युच्युअल फंडातून पैसे काढले. अशा परिस्थितीत मला आयकर रिटर्न भरायची खरंच गरज आहे का?''

कायद्याच्या भाषेत या प्रश्नाचे उत्तर कदाचित काही परिस्थितींमध्ये 'नाही' असे असू शकते. परंतु व्यवहाराच्या भाषेत, आणि भविष्यातील सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहिले तर उत्तर बहुतांश वेळा 'होय, नक्कीच' असेच असते. कारण आयकर रिटर्न हा केवळ कर भरण्यासाठी नसतो. तो आपल्या आर्थिक व्यवहारांचा अधिकृत इतिहास असतो.

**निवृत्तीनंतरचे आयुष्य आणि एक मोठा आर्थिक व्यवहार**

आपल्या आसपास अनेक ज्येष्ठ नागरिक आहेत ज्यांचे नियमित उत्पन्न फारसे नसते. महिन्याची पेन्शन, काही बँक ठेवीवरील व्याज आणि थोडीफार बचत यावर त्यांचा संसार चालत असतो. अशा व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न अनेकदा करमुक्त मर्यादेच्या आसपास किंवा त्याखाली असते.

**पण आयुष्यातील एखाद्या टप्प्यावर ते-**

• जुना प्लॉट विकतात • गावाकडची जमीन विकतात • वारसाहक्काने मिळालेली मालमत्ता विकतात • शेअर्स किंवा म्युच्युअल फंडातून गुंतवणूक काढतात आणि अचानक त्यांच्या खात्यात लाखो रुपयांची रक्कम जमा होते. याच ठिकाणी अनेकांचा गैरसमज सुरू होतो. त्यांना वाटते, 'ही तर माझी स्वतःची मालमत्ता होती. ती विकून मला पैसे मिळाले. माझे नियमित उत्पन्न तर कमीच आहे. मग आयकर रिटर्न कशाला?' परंतु करकायद्याच्या दृष्टीने ही घटना एक महत्त्वाचा आर्थिक व्यवहार असतो.

**सरकारला तुमचा व्यवहार आधीच माहिती असतो**

पूर्वीच्या काळात मालमत्ता विकली किंवा आर्थिक व्यवहार केला तर त्याची माहिती आयकर विभागापर्यंत पोहोचेलच असे नव्हते. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.

**आजच्या डिजिटल व्यवस्थेत -**

- मालमत्ता विक्रीची माहिती नोंदणी कार्यालयातून
- शेअर व्यवहारांची माहिती ब्रोकरकडून
- म्युच्युअल फंड व्यवहारांची माहिती संबंधित संस्थांकडून
- बँक व्यवहारांची माहिती विविध अहवालांद्वारे




आयकर विभागाकडे पोहोचत असते. म्हणूनच आजचा प्रश्न असा नाही की ''विभागाला व्यवहार कळेल का?'' प्रश्न असा आहे की ''त्या व्यवहारामागील खरी करगणना विभागाला कशी कळणार?''

**विक्रीची रक्कम आणि नफा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत**

समजा एखाद्या ज्येष्ठ नागरिकाने ६० लाख रुपयांना एक प्लॉट विकला. अनेकांना वाटते की ६० लाख रुपये मिळाले म्हणजे ६० लाखांचा नफा झाला. पण प्रत्यक्षात तसे नसते. तो प्लॉट २५-३० वर्षांपूर्वी खरेदी केलेला असू शकतो. त्यासाठी खर्च केलेला असतो. त्यावर कंपाऊंड, विकासकामे किंवा इतर सुधारणा केलेल्या असतात. इंडेक्सेशनचा लाभ मिळू शकतो. नवीन घर खरेदी करून करसवलत घेतलेली असू शकते. म्हणून ६० लाखांची विक्री म्हणजे ६० लाखांचा नफा नव्हे. ही संपूर्ण गणना आयकर रिटर्नमध्ये नोंदविली जाते. रिटर्न न भरल्यास विभागाला व्यवहार दिसेल, पण त्यामागील सत्य परिस्थिती दिसणार नाही.

**''कर शून्य'' म्हणजे ''व्यवहार नाही'' असे होत नाही**

हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. समजा एखाद्या ज्येष्ठ नागरिकाला भांडवली नफा झाला. पण त्यांनी नवीन घर घेतले आणि त्यांना कलम ५४ अंतर्गत सूट मिळाली. किंवा उपलब्ध करसवलतींमुळे अंतिम कर शून्य आला. याचा अर्थ असा नाही की व्यवहार घडलेलाच नाही. व्यवहार झाला आहे. भांडवली नफा झाला आहे. त्यावर कायदेशीर सूट मिळाली आहे. ही सर्व माहिती अधिकृतरीत्या दाखविण्याचे माध्यम म्हणजे आयकर रिटर्न.

**भविष्यात एखादा प्रश्न निर्माण झाला तर?**

आपण अनेकदा विचार करतो की आज सर्व काही व्यवस्थित आहे. मग एवढी कागदपत्रे का ठेवायची? पण आयुष्यातील अनुभव वेगळेच सांगतात. कधी बँकेचे काम निघते. कधी मुलांना मालमत्तेचे हस्तांतरण करायचे असते. कधी वारसा हक्काचा प्रश्न निर्माण होतो. कधी एखाद्या व्यवहाराबाबत वर्षानुवर्षांनंतर माहिती मागवली जाते. अशा वेळी अनेकांना आठवतही नाही की मालमत्ता कितीला विकली, खर्च किती होता किंवा सूट कशी घेतली होती. मात्र त्या वर्षीचा आयकर रिटर्न सर्व प्रश्नांची उत्तरे देतो. तो एक अधिकृत दस्तावेज म्हणून उभा राहतो.

**भांडवली तोटा झाला असेल तर?**

सर्वच व्यवहारांमध्ये नफा होत नाही. काही वेळा शेअर्समध्ये तोटा होतो. म्युच्युअल फंडातून नुकसान होते. किंवा मालमत्ता अपेक्षित किमतीला विकली जात नाही. अशा वेळी झालेला तोटा पुढील वर्षांत करबचतीसाठी उपयोगी पडू शकतो. परंतु त्यासाठी वेळेत रिटर्न भरणे आवश्यक असते. रिटर्न न भरल्यास भविष्यात लाखो रुपयांच्या करबचतीची संधी कायमची निघून जाऊ शकते.

**नोटीसची भीती नसावी, पण तयारी असावी**

आयकर विभाग प्रत्येक व्यवहारावर नोटीस पाठवतो असे नाही. तसेच प्रत्येक रिटर्न न भरणाऱ्या व्यक्तीवर कारवाई होते असेही नाही. परंतु आजची करप्रणाली डेटा ॲनालिटिक्सवर आधारित आहे. मोठे व्यवहार दिसतात. त्यांची पडताळणी होते.

आणि आवश्यक वाटल्यास माहिती मागवली जाते. रिटर्न भरलेला असेल तर बहुतांश वेळा व्यवहाराची माहिती आधीच उपलब्ध असते. म्हणून भविष्यातील अनावश्यक त्रास टाळण्यासाठी रिटर्न हा एक प्रकारचा सुरक्षा कवच ठरतो.

**'माझी नोंद व्यवस्थित आहे'**

आयुष्यभर कष्ट करून उभी केलेली संपत्ती विकताना किंवा तिचे नियोजन करताना केवळ कर किती लागतो याकडे पाहणे पुरेसे नाही. त्या व्यवहाराची नोंद व्यवस्थित आहे का? भविष्यात त्याचा पुरावा उपलब्ध राहील का?

माझ्या मुलांना किंवा वारसांना पुढे अडचण येणार नाही ना? या प्रश्नांचाही विचार करावा लागतो. आयकर रिटर्न हा त्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा दस्तावेज आहे.

**निष्कर्ष** : ज्येष्ठ नागरिकांचा अंतिम कर शून्य असू शकतो. त्यांचे नियमित उत्पन्न करपात्र मर्यादेपेक्षा कमी असू शकते. उपलब्ध सवलतींमुळे त्यांना एक रुपयाही कर भरावा लागत नसेल. तरीही जर वर्षभरात-

• जमीन, प्लॉट, घर, शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा इतर कोणतीही भांडवली मालमत्ता विकली असेल, तर आयकर रिटर्न भरणे हा केवळ कायदेशीर औपचारिकतेचा विषय नाही. तो आर्थिक शिस्तीचा, भविष्यातील सुरक्षिततेचा आणि स्वतःच्या व्यवहारांची अधिकृत नोंद ठेवण्याचा विषय आहे.

म्हणूनच प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाने एक गोष्ट लक्षात ठेवावी- ''कर भरावा लागत नसला तरी भांडवली व्यवहार झाला असेल, तर आयकर रिटर्न भरणे हे शहाणपणाचे पाऊल आहे.'' ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# सदा सुखी कोण आहे?

राजकारण हा असा खेळ आहे की इथे माणसाची झोप उडते. निवडणुका जिंकल्या तरीही झोप उडते आणि हरल्या तरीही! सत्ता मिळाली तर टिकवण्याची चिंता, गेली तर परत मिळवण्याची चिंता. पक्ष मोठा झाला तर आमदार-खासदार सांभाळण्याची कसरत, पक्ष फुटण्याची वेळ आली तर कार्यकर्ते टिकवण्याची धडपड. एकंदरीत राजकारणात सुखी माणूस शोधायला निघालात तर तो सापडणे जवळजवळ अशक्यच! पण, राज्याच्या राजकारणात गेल्या काही वर्षांत एक व्यक्ती अशी आहे, त्यांच्याकडे पाहून वाटतं की ही व्यक्ती निवांत आहे. ती म्हणजे राज ठाकरे!

आज महाराष्ट्रात रात्री कोण कुठल्या पक्षात गेला, कोणत्या आमदाराने नाराजी व्यक्त केली, कोणत्या खासदाराने दिल्ली गाठली याचा अंदाज घ्यावा लागतो. अशा वातावरणात राज ठाकरे मात्र वेगळ्याच विश्वात वावरतात. त्यांना ना खासदार फुटण्याची चिंता, ना आमदार फुटण्याची भीती! त्यामुळे या बाबतीत त्यांच्यावर कोणताही मानसिक ताण नाही. काही गमावण्याचे भय नाही! या गोष्टी आजच आठवण्याचं कारण म्हणजे गेल्या चार दिवसांपासून हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव, विद्यमान उबाठा प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे उरले सुरले खासदारही शिंदेंच्या शिवसेनेत जात असल्याचे वारे वाहू लागले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांची झोप निश्चित उडाली असेलही. पण, हवा भरायला संजय राऊत असल्याने उद्धव ठाकरे सकाळपर्यंत थोडे निवांत असतील. पण, खासदार गेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर उद्धव ठाकरे अस्वस्थ झाले असणार. तो अवस्थपणा राज ठाकरेंना नाही! ते तसेही बोलायला अघळपघळ आणि रोखठोक आहेत. त्यांना 'टायमिंग' साधता येते. मुळात ते त्यांचा निर्णय स्वतः घेतात. लोकसभा, विधानसभा, महानगर पालिका निवडणुकांचा सुगंध दरवळताच ते बाहेर निघतात. त्यांना पटेल ते बोलतात, स्वतःची भूमिका वेळप्रसंगी बदलत असतात. पण, त्या बदलत्या भूमिकेवरही ते त्यावेळी ठाम असतात. त्यामुळे त्यांना गमावण्याची चिंता नसते. त्यांची राज्याच्या विकासाची ब्लू प्रिंट कायम तयार असते. स्वतःचे महत्त्व कायम ठेवण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नाही. त्यामुळे राजकारणातील बड्या नेत्यांमध्ये त्यांचे नाव असले तरी ते आज निवांत आहेत. त्यांचे कोणी फुटले असा डाग त्यांना लागला नाही. राजकारणात कोणाला समजावून सांगायचे, कोणाला मंत्रिपदाचे आश्वासन द्यायचे, कोणाची नाराजी दूर करायची असते. पण, राज ठाकरे यांना ते करावेच लागत नाही.

राज ठाकरे यांचे सध्या एक बरे आहे. भाषण करा, व्यंगचित्र काढा, एखादा दौरा करा, सत्ताधाऱ्यांना (न मागता) मार्गदर्शन करत राज्याच्या प्रश्नांवर बोला आणि निवांत व्हा. सकाळी जो नेता एका पक्षात होता, तो सायंकाळी दुसऱ्या पक्षात दिसतो. पण, या सगळ्या गोंधळात राज ठाकरे यांची भूमिका प्रेक्षकासारखी आहे. याचा अर्थ ते 'राजकारण' करत नाहीत असा नाही. पण, सत्तेच्या गणितांमध्ये अडकून पडलेल्या इतर नेत्यांच्या तुलनेत ते अधिक निवांत दिसतात. लोकशाहीत नेत्यांवर टीका होते अन् कौतुक होते, व्यंगचित्रे काढली जातात, मिम्स तयार होतात. हे सगळे लोकशाहीचे सौंदर्य आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याची परिस्थिती गुंतागुंतीची झाली आहे. महाराष्ट्रात सगळेच कोणत्या ना कोणत्या चिंतेत आहेत. पण, राज ठाकरे निवांत आहेत. ■

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**प्रतापराव जाधव**

# योगशास्त्राची जागतिक प्रदक्षिणा

जगाच्या इतिहासाकडे नजर टाकली तर, काही विचार, कल्पना प्रादेशिक सीमा ओलांडून पलीकडे गेलेल्या आणि त्यांनी समाजात परिवर्तन घडवलेले आपल्याला दिसेल. आणि योगशास्त्र हे भारताच्या प्राचीन परंपरेपैकी एक असलेले शास्त्र, ज्याचा प्रवास प्राचीन दस्तावेजापासून ते जागतिक ओळख मिळण्यापर्यंत झाला आहे.

योग हा शब्द- मूळ संस्कृत धातू 'युज'पासून निर्माण झाला आहे, ज्याचा अर्थ 'जोडणे' किंवा 'एकरूप करणे' असा होतो. योग ही एक सर्वसमावेशक तात्त्विक विचारप्रणाली आणि व्यावहारिक साधना आहे, ज्याचा उद्देश व्यक्तीच्या आत्म्याचे (जीवात्मा) वैश्विक चेतनेशी (परमात्मा) ऐक्य साधणे हा आहे. योगशास्त्राचे मूळ ऋग्वेदात (इसवी सन पूर्व १५००-१२००) सापडते. त्यात, तप (संयम व स्वयंशिस्त) आणि ध्यान (ध्यानधारणा) या दोन गोष्टींचा संदर्भ आहे. याच संकल्पना पुढे उपनिषदांमध्ये अधिक विस्तृत स्वरूपात आढळतात, ज्यातून योगशास्त्र विषयक अनेक तत्त्वज्ञानाचा पाया रचला गेला. मात्र, महर्षी पतंजली यांनी लिहिलेली योगसूत्रे (इसवी सन पूर्व २००-४००), यातून योगशास्त्राला एक निश्चित आणि सुव्यवस्थित चौकट मिळाली. - अष्टांग योग किंवा आठ अंगांचा मार्ग. - यात यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी यांचा समावेश आहे.

पतंजलीच्या पलीकडे, भगवद्गीतेत योगशास्त्राला जीवन जगण्यासाठीचे एक तत्त्वज्ञान म्हणून विशद करण्यात आले आहे. कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर, भगवान कृष्ण आणि अर्जुन यांच्यातील संवादातून आपल्याला मानवाची कर्तव्ये, जीवनाचे उद्दिष्ट आणि आध्यात्मिक विकास अशा सर्वांविषयीचे ज्ञान आणि नवी दृष्टी मिळते. भगवद्गीतेत आपल्याला जीवन जगण्याचे आणि मोक्षप्राप्तीचे अनेक मार्ग सांगितले आहेत. त्यातील एक म्हणजे कर्मयोग (निष्काम कर्माचा मार्ग), ज्ञानयोग (ज्ञानाचा मार्ग), भक्तियोग (समर्पणाचा मार्ग) हे तीन मोक्षप्राप्तीचे राजमार्ग आहेत. आणि म्हणूनच भारत केवळ योगशास्त्राची जननी नाही, तर ती अशी एक जिवंत आणि प्रवाही संस्कृती आहे, ज्यातून गेल्या हजारो वर्षांत, या संस्कृतीच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि तत्त्वज्ञानाच्या ताण्याबाण्यातून योगाचा विकास होत गेला आहे.

तथापि, वसाहतवादी प्रभावाच्या काळात भारतीय समाजातील सुशिक्षित घटकांपैकी काही जण पाश्चात्त्य विचारसरणीच्या प्रभावाखाली आले आणि योगासह सर्वच पारंपरिक ज्ञानप्रणालींकडे बदलत्या आधुनिक जगात कमी महत्त्वाच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. अशा महत्त्वाच्या काळात स्वामी विवेकानंद यांचा एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून उदय झाला आणि त्यांनी लोकांना योगाचे महत्त्व पुन्हा जाणवून दिले. आपल्या शिकवणीद्वारे तसेच जागतिक धर्मपरिषदेतील ऐतिहासिक भाषणाद्वारे त्यांनी भारताच्या आध्यात्मिक वारशाकडे जगाचे लक्ष वेधले आणि योगाच्या चिरंतन ज्ञानाबद्दल नव्याने आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी वेदांत आणि योगाचे विचार जगातील विविध भागांतील लोकांपर्यंत पोहोचवले आणि योग हा केवळ धार्मिक साधना नसून वैयक्तिक विकास, अंतःशांती आणि आत्मोन्नतीचा मार्ग असल्याचे स्पष्ट केले. परदेशात त्यांना मिळालेल्या सन्मान आणि गौरवामुळे भारतीयांमध्ये त्यांच्या स्वतःच्या प्राचीन परंपरा, संस्कृती आणि ज्ञानसंपदेबद्दल पुन्हा आत्मविश्वास व अभिमान निर्माण झाला. शिकागोमधील त्यांच्या व्याख्यानांद्वारे आणि त्यानंतर संपूर्ण अमेरिका आणि युरोपमधील प्रवासांदरम्यान स्वामी विवेकानंद यांनी पाश्चात्त्य जगाला राजयोग (मनावर नियंत्रण ठेवण्याचा राजमार्ग), ज्ञानयोग (विवेक आणि ज्ञानाचा योगमार्ग), कर्मयोग (निःस्वार्थ सेवेचा योगमार्ग) आणि भक्तियोग (भक्तीचा योगमार्ग) या संकल्पनांची ओळख करून दिली. त्यांचे राजयोग (१८९६) हे पुस्तक, पतंजलींच्या योगसूत्रावर आधारित होते, ते पुस्तक म्हणजे, योगतत्त्वज्ञानाची पाश्चात्त्य वाचकांना सर्वांत आधी अणि प्रभावी ओळख करून देणारा महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. राजयोगावरील आपल्या व्याख्यानांमध्ये स्वामी विवेकानंदांनी योगाला मानवी चेतनेच्या अंतर्गत आयामांचा शोध घेण्यासाठीची एक शास्त्रशुद्ध आणि अनुभवाधिष्ठित साधना म्हणून मांडले. त्यांच्या मते, भारताने मानवजातीला दिलेले सर्वांत मोठे योगदान म्हणजे त्याचे आध्यात्मिक ज्ञान असून, योग हा त्या ज्ञानाचा सर्वाधिक गहन आणि चिरंतन आविष्कार आहे. त्यांच्या विचारांनी त्या काळातील अनेक नामवंत बुद्धिजीवी, अभ्यासक आणि विचारवंतांचे लक्ष वेधून घेतले. परिणामी, भारतीय तत्त्वज्ञानाबद्दल पाश्चात्त्य जगात व्यापक रस निर्माण झाला आणि भारतीय आध्यात्मिक परंपरेविषयी अधिक सखोल अभ्यास व संवादाला चालना मिळाली.

स्वामी विवेकानंद यांनी पाश्चात्त्य देशांत जे कार्य केले, त्यामुळे प्रत्यक्षात भारतात योगसाधना पुनरुज्जीवित करण्यासाठी होत असलेल्या कामाला गती मिळाली होती. खरे तर त्यांचे हे काम तितकेच महत्त्वाचे होते. मात्र त्याबद्दल कदाचित फारशी चर्चा होत नाही. स्वामी विवेकानंद जेव्हा १८९७ मध्ये भारतात परतले, तेव्हा ते रिकाम्या हाताने परतले नव्हते. पाश्चात्त्य देशांमध्ये मिळालेल्या प्रतिसादामुळे अधिक दृढ झालेला एक नवा आत्मविश्वास तसेच भारताच्या आध्यात्मिक वारशाबद्दलचा नव्याने जागृत झालेला अभिमान ते आपल्यासोबत घेऊन आले होते.

१८९७ मध्ये भारतात परतल्यानंतर विवेकानंदांनी देशभरात व्याख्याने दिली आणि लोकांना भारतीय आध्यात्मिक परंपरांचा पुन्हा शोध घेण्याची प्रेरणा दिली. १ मे १८९७ रोजी स्वामी विवेकानंदांनी हावडा इथल्या बेलूर मठात रामकृष्ण मिशनची स्थापना केली. हे ठिकाण हुगळी नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेले आहे. तिथून काही अंतरावरच दक्षिणेश्वर इथे रामकृष्णांनी आपल्या आयुष्याची अखेरची वर्षे व्यतीत केली होती. बंगालमध्ये हुगळी नदीच्या काठावर वसलेली ही संस्था एका महत्त्वाच्या चळवळीचे जागतिक मुख्यालय बनली. या चळवळीच्या माध्यमातून 'शिव ज्ञाने जीव सेवा' म्हणजेच सेवा हीच ईश्वराची पूजा आहे हा वेदांताचा आदर्शवादी विचार तसेच योग तत्त्वज्ञानाचा व्यावहारिक उपयोग याबद्दलचा प्रचार-प्रसार केला गेला.

रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारख्या आध्यात्मिक साधनेचा पाया रचणाऱ्यांची भूमी असूनही, बदलत्या काळासोबत बंगालमध्ये योग साधनेचे सार्वजनिक अस्तित्व हळूहळू कमी होत गेले. बदलती जीवनशैली, आधुनिक प्राधान्यक्रम आणि सामाजिक बदलांमुळे हळूहळू योग साधनेचे अस्तित्व सार्वजनिक जीवनाच्या केंद्रापासून दूर होत गेले. असे असले तरी, आध्यात्मिक संस्था आणि समर्पित साधकांच्या माध्यमातून त्याची मुळे सदैव जिवंत राहिली.

स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी केलेल्या भाषणाची सुरुवात, अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो... या अजरामर आदरयुक्त शब्दांनी केली होती. जागतिक धर्मपरिषदेतील आपल्या या ऐतिहासिक भाषणातून जगाला भारताच्या आध्यात्मिक ज्ञानाची ओळख त्यांनी करून दिली होती. आज, पश्चिम बंगालमधील माझ्या बंधू आणि भगिनींनो, तुमच्या स्वतःच्या घरात योगसाधनेचे हे पुनरागमन पाहा- शिकागोच्या जागतिक व्यासपीठापासून ते थेट हुगळी नदीच्या किनाऱ्यापर्यंत - हे शब्द एक गहिरे भावनिक बंध निर्माण करतात आणि स्वामी विवेकानंदांनी जगाला भारताच्या आध्यात्मिक ज्ञानाची ओळख करून दिली, त्या ऐतिहासिक क्षणाचे स्मरण करून देतात. त्यांचा हा संदेश भारतातून जगात पोहोचला आणि त्याद्वारे योग साधना, सलोखा आणि आंतरिक शांततेची मूल्येही सर्वदूर पोहोचली.

आज हुगळीच्या किनाऱ्यावर जे परत आले आहे त्याला खरे तर प्रत्यक्षात योग साधना परत आली असल्याचे म्हणता येणार नाही, कारण योगसाधना भारतातून कधी लोप पावली नव्हतीच. त्याउलट जे परत आले आहे ते, योगसाधनेला नव्याने मिळालेली जागतिक मान्यता आणि आदर आहे. या योगसाधनेचा प्रारंभ भारताच्या प्राचीन ऋषिमुनींपासून झाला होता आणि त्याला विवेकानंदांच्या जागतिक संदेशामुळे एक नवी अभिव्यक्ती लाभली होती.

आज हीच योगसाधना पुन्हा एकदा नव्याने अधिक सक्षम, अधिक मान्यताप्राप्त आणि पुनर्स्थापित होऊन बंगालमधील हुगळीच्या किनाऱ्यावर परतली आहे. इथला बेलूर मठ आजच्या घडीलाही या प्रवासाचे एक जिवंत स्मारक म्हणून उभे आहे. आज संपूर्ण जगभरात योगसाधनेचा सराव केला जात आहे आणि जग योगसाधनेची एक कालातीत सांस्कृतिक वारसा म्हणून दखल घेऊ लागले आहे. अशा वेळेस योगसाधनेच्या या जागतिक वाटचालीचा मुख्य केंद्रबिंदू स्वामी विवेकानंदांचे ऐतिहासिक कार्यच होते याचे स्मरण आपण करायलाच हवे.

आज कोलकाता इथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याच्या निमित्ताने, योगसाधनेचे आपल्या मूळ भूमीत झालेले हे एक सुंदर पुनरागमन वाटते आहे. याच भूमीतून योगसाधनेच्या संदेशाने जागतिक व्यासपीठापर्यंतचा आपला प्रवास सुरू केला होता. हुगळीचा हा किनारा आज महासागर ओलांडणाऱ्या आणि आज अधिक स्वीकारार्हता आणि आदरासह पुन्हा मायदेशी परतलेल्या परंपरेचा उत्सव साजरा करत असलेले लोक पुन्हा एकदा एकत्र येत असल्याचा साक्षीदार बनत आहे. शिकागो ते हुगळी हा प्रवास केवळ योगसाधनेचा सराव करण्यापुरता मर्यादित असलेला प्रवास नाही, तर हा प्रवास आजही संतुलन, करुणाभाव, आत्म-जागरूकता आणि आंतरिक सुसंवादाच्या माध्यमातून संपूर्ण मानवतेला परस्परांशी जोडून ठेवणाऱ्या एका विचाराचा आणि एका भावनेचा प्रवास आहे. ■

(लेखक केंद्रीय आयुष मंत्रालय (स्वतंत्र प्रभार) तसेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाचे राज्यमंत्री आहेत.)

## वाचक पत्र

### एकसंध राष्ट्रनिर्माणासाठी आयुष्य वाहिलेले श्रीगुरुजी



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक पूजनीय माधव सदाशिव गोळवलकर श्रीगुरुजी यांचा आज स्मृतिदिन. स्वातंत्र्योत्तर भारताच्या राष्ट्रीय जीवनाला दिशा देणाऱ्या या थोर विचारवंताने संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले. ज्येष्ठ पत्रकार अरविंद विठ्ठल कुलकर्णी यांनी श्रीगुरुजींचे वर्णन करताना त्यांना ''विश्वामित्रांच्या प्रतिभेने आणि तपश्चर्येने हिंदू समाजाची नवी सृष्टी घडविणारा संन्यासी'' असे म्हटले आहे. श्रीगुरुजी हे केवळ संघटक नव्हते, तर समाज, राष्ट्र आणि संस्कृती यांचा सखोल अभ्यास करणारे दूरदर्शी विचारवंत होते. राजधानी दिल्लीहून प्रकाशित होणाऱ्या 'मदरलॅण्ड' या नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी राष्ट्रशक्तीचे मूलभूत सूत्र स्पष्ट केले. राष्ट्र एकसंध राहण्यासाठी एकविधता नव्हे, तर समरसता आवश्यक आहे, असे ते ठामपणे सांगतात. सर्व जण एकसारखे असणे ही भारताची संकल्पना नाही; विविधता स्वीकारून एकतेने नांदणे हीच आपल्या राष्ट्राची खरी ताकद आहे.

समाजजीवनाविषयी बोलताना श्रीगुरुजी म्हणतात की, शास्त्राइतकीच समाजमान्य रूढींचीही ताकद असते. 'शास्त्रात् रूढिर्बलीसी' या उक्तीनुसार स्थानिक समाजाने स्वीकारलेल्या परंपरा आणि रीतीरिवाज समाज टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. राष्ट्रीय एकतेबाबत त्यांची भूमिका अत्यंत स्पष्ट होती. विविधता ही राष्ट्राच्या एकतेला साहाय्यकारी ठरली पाहिजे; ती विघटनाचे कारण बनता कामा नये. निसर्गालाच एकविधता मान्य नाही; मात्र विविधता राष्ट्रविनाशाकडे नेणारी नसावी, हा त्यांचा ठाम विचार होता. पू. गोळवलकर गुरुजींचे विचार आजही तितकेच कालसुसंगत आहेत. समरसता, राष्ट्रनिष्ठा आणि निःस्वार्थ सेवा या मूल्यांची आठवण करून देणाऱ्या त्यांच्या पुण्यस्मरण दिनी प्रत्येक भारतीयाला आत्मचिंतनाची संधी देणारा आहे. ■

**रमा देशमुख**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## प्रशाला क्र.१ कॅम्प येथे प्रवेशोत्सव उत्साहात

**सोलापूर, ता. १८ जुन-**

सोलापूर महानगरपालिका संचलित प्रशाला क्र. १ कॅम्प येथे प्रवेशोत्सव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महेश देवकर, नगरसेवक नरसिंह असादे, नगरसेविका श्वेता खरात तसेच नगरसेविका सौ. कदम उपस्थित होत्या. कार्यक्रमात शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष मंगला मोरे व उपाध्यक्ष जोगदंड यांच्या हस्ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश तसेच पाठ्यपुस्तक मंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. यावेळी सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले व त्यांना शिक्षणाबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्ते बाळकृष्ण मोरे, गजानन हंचाटे, मुख्याध्यापिका सौ. हंचाटे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. रंडाळे यांनी केले, पी. ए. खरबस यांनी आभार मानले.

## 'आय.एम.एस. चषक' १७ वर्षाखालील जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. १८ जून -**

सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने तसेच सोलापुर चेस अकॅडमी व चॅम्प चेस स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षाखालील गटाच्या जिल्हास्तरीय खुली व मुलींच्या निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार २१ जुन रोजी सकाळी १० वाजता इंडियन मॉडेल स्कूल, जुळे सोलापूर येथे केले आहे. प्रथम दोन मुले व मुलींची निवड मुंबई येथे होणाऱ्या राज्य बुद्धीबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. या स्पर्धेत १.१.२००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना रु. १०००, मेडल व आय. एम. एस. चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे मो.क्र. ८८८८०४५३४४ यांच्याकडे संपर्क साधावा असे सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, इंडियन मॉडेल्स स्कूलचे संस्थापक सचिव अमोल जोशी व श्री. साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी आंतरराष्ट्रीय पंच व मार्गदर्शक सुमुख गायकवाड व अतुल कुलकर्णी यांनी यांनी कळविले आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.

## मंगळवेढ्यात २८जूनला जिल्हा स्केटिंग स्पर्धा

**मंगळवेढा, दि १८ जून -**

स्केटिंगसारख्या आधुनिक क्रीडा प्रकाराला ग्रामीण भागात अधिक प्रोत्साहन मिळण्यासाठी साप्ताहिक रणयुग टाईम्स व श्री सिद्धेश्वर स्केटिंग क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ओपन जिल्हा स्केटिंग स्पर्धा २०२६चे आयोजन रविवार २८ जून रोजी आप्पा श्री लॉन्स, मंगळवेढा येथे केले आहे. इच्छुक स्पर्धकांनी स्केटिंग प्रशिक्षक नितीन शिंदे (७२१९५४२०१४) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन स्केटिंग प्रशिक्षक् नितीन शिंदे व पत्रकार प्रमोद बिनवडे यांनी केले आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडल**
**मानव संसाधन व्यवस्थापन**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता नामांकित व अनुभवी विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. द्वि-पाकीट पद्धत निविदा क्रमांक : SUR/TD/T2026/01 कामाचे नाव : टीआरडी कामांच्या उभारणीसाठी शिफ्ट बेसिसवर मनुष्यबळ पुरवणे, ज्यामध्ये तीन (३) कुशल तंत्रज्ञ आणि तीन (३) अकुशल कर्मचारी समाविष्ट आहेत. (पुन्हा-आमंत्रण). अंदाजित खर्च : ६३,०५,३८९.२० बयाणा रक्कम / बिड सुरक्षा : १,२६,१००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी : २४ महिने. ऑफरची वैधता : ९० दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: १४.०७.२०२६ रोजी १५:०० वाजता (दुपारी ३:०० वाजता).

**व.मं.वि.अ. (क.वि.)**

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे 31

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**रेल्वे स्थानकांवरील स्टॉल्ससाठी ई-लिलाव**

विभागीय वाणिज्य कार्यालय, केटरिंग विभाग, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता सक्षम व नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक : SUR-MPS-2026-8 आणि SUR-CATG-26-03 १. वाडी आणि बार्शी टाऊन स्थानक ( स्टॉल) लिलाव कॅटलॉग लॉट क्रमांक :(अ. क्र. १) MPS-SUR-WADI-MPS-5-25-1 (अ. क्र. २) MPS-SUR-BTW-MPS-6-24-1, लिलाव सुरू आणि बंद होण्याची तारीख व वेळ: सुरू: ३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता बंद: ३०.०६.२०२६ रोजी सकाळी १०:४० वाजता स्थानकांची नावे व काम: वाडी आणि बार्शी टाऊन स्थानकांवरील एमपीएस स्टॉल्सचा ई-लिलाव. २. केम आणि ढालगाव स्थानक (चहाचा स्टॉल) लिलाव कॅटलॉग लॉट क्रमांक : (अ. क्र. ३) Catg-SUR-KEM-GMU-11-23-1, (अ. क्र. ४) Catg-SUR-DLGN-SMU-70-25-1 लिलाव सुरू आणि बंद होण्याची तारीख व वेळ: सुरू: ०३.०७.२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता बंद: ०३.०७.२०२६ रोजी दुपारी १२:४० वाजता स्थानकांची नावे व काम: केम आणि ढालगाव स्थानकांवरील चहाच्या स्टॉल्सचा ई-लिलाव. लिलावाची पद्धत :- लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदेचा कालावधी : वार्षिक परवाना शुल्क आणि ४ थ्या व ५ व्या वर्षासाठी १०% दरवाढीसह ५ वर्षे. महत्त्वाची सूचना: संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेळोवेळी या वेबसाइटला भेट द्यावी, जेणेकरून या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रक त्यांच्या निदर्शनास येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**स. वा. व्य./खानपान/सोलापूर**

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा. 29

# दास्ताने व सलीम खान संघांची विजयी सलामी

**सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनची लिटिल चॅम्प स्पर्धा : रुद्र धोत्रे, आदित्य चटके सामनावीर**



रूद्र धोत्रे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जून-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या लिटिल चॅम्प स्पर्धेत दास्ताने व सलीम खान संघांने विजयी सलामी दिली.

असोसिएशनतर्फे १२ वर्षांखालील मुलांसाठी पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या 'लिटिल चॅम्प' क्रिकेट टूर्नामेंटचा जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर दिमाखात शुभारंभ झाला. पहिल्या सामन्यापूर्वी दोन्ही संघांच्या खेळाडूंनी आणि पालकांनी एकत्र येऊन राष्ट्रगीत म्हटले. सोलापूरचा युवा खेळाडू यश बोरामणी याच्या हस्ते नाणेफेक करून सामन्याला सुरुवात करण्यात आली. यावेळी जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सू उपस्थित होते.



या स्पर्धेतील सकाळच्या सत्रात उमेश दस्ताने ११ विरुद्ध खुदूस खान ११ यांच्यात सामना झाला. प्रथम फलंदाजी करताना दस्ताने ११ संघाने ३० षटकांत २ बाद १७३ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात खुदूस खान संघाला २० षटकांत सर्वबाद ८३ धावाच करता आल्या. दस्ताने ११ संघाने ९० धावांनी दणदणीत विजय मिळवला.

संघाच्या या विजयात अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या रुद्र धोत्रे याने २ चेंडूत नाबाद ६ धावा केल्या आणि गोलंदाजीत ४ षटकांत १ मेडन टाकत अवघ्या ६ धावा देऊन ३ महत्त्वाचे बळी घेतले. त्याला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुपारच्या सत्रात झालेल्या दुसऱ्या सामन्यात सलीम खान संघाने श्रीनिवास शिवल संघाचा ५ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रीनिवास शिवल संघाचा डाव १९.२ षटकांत ७२ धावांवर संपुष्टात आला. ७३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सलीम खान संघाने १३.२ षटकांत ५ बाद ७३ धावा करत विजय नोंदवला.



आदित्य चटके

सलीम खान संघाच्या आदित्य चाटके याने भेदक गोलंदाजी करत ३.२ षटकांत १ मेडन ओव्हर टाकून अवघ्या ७ धावा देत ४ बळी घेतले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला सामनावीर घोषित करण्यात आले.

## वृक्षारोपण काळाजी गरज

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**
**विद्युतीकरण कार्य**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, खालील कामांकरिता नामांकित व परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. द्वि-पाकीट पद्धत निविदा क्रमांक : SUR/TD/T/2026/14 R कामाचे नाव : १) सोलापूर विभागातील अनवायर्ड पिट लाईन्स/सायडिंग्जचे विद्युतीकरण करणे. २) सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर सेक्शनमधील किमी ३८७/३-४ वरील -४० आणि किमी ३९१/८-९ वरील -४२ च्या बदल्यात प्रस्तावित २ लेन आरओबी (- रेल्वे ओव्हर ब्रीज) च्या बांधकामाशी संबंधित इलेक्ट्रिकल भागाचे काम. (पुन्हा-आमंत्रण). अंदाजित खर्च : २,१४,९०,३५७.५६/- बयाणा रक्कम : ४,२९,८००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी : १२ महिने. ऑफरची वैधता : ६० दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: १५.०७.२०२६ रोजी १५:०० वाजता (दुपारी ३:०० वाजता).

**व.मं.वि.अ. (क.वि.)**

तुमची जनावरे रेल्वे रुळांपासून दूर ठेवा. 30

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १३२ यासी नविन सर्व्हे नं. १३० यापैकी सुर्या नगर मधील प्लॉट नं. ९० याचे क्षेत्र ५६.४२ चौ.मीटर अथवा ६०७.०० चौ.फुट इतकी आहे.

यासी चतुःसीमा :-
पुर्वेस :- ७.५ मीटर रुंदीचा रस्ता — दक्षिणेस :- प्लॉट नं. ८९
पश्चिमेस :- सर्व्हे नं. १३० पैकी शिल्लक जागा — उत्तरेस :- प्लॉट नं. ९१
येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह.

ही प्लॉट जागा श्री. मुरली राजु गज्जम, रा. शास्त्री नगर, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री व भरवसा दिला आहे. तरीही नमुद प्लॉट जागेवर कोणाचीही कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचीही, कोणतीही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशील ठरल्यानुसार खरेदीखत करुन घेतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि.१८/०६/२०२६

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड.राजरतन द.श्रीराम**
**ऑ.१६२८, कुचन नगर, सोलापूर -५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

### जाहीर नोटीसीस उत्तर

दिनांक ३१/०५/२०२६ रोजीचे दैनिक तरुण भारत सोलापूर जिल्हा आवृत्ती या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीस या नोटीस उत्तराने कळविण्यात येते की,

मौजे कुर्डू, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर ५७५/१ क्षेत्र ०२ हे. ०६ आर, पो.ख. ०० हे. ०९ आर, एकूण ०२ हे. १५ आर यापैकी ०० हे. ८० आर मधले क्षेत्र यासी चतुःसिमा पूर्वेस :- गट नंबर ५७६, पश्चिमेस :- गट नंबर ६४१, दक्षिणेस :- गट नंबर ५७५ पैकी, उत्तरेस :- गट नंबर ५७५ पैकी ही मिळकत श्री. दादाराव गोरख माने यांच्या मालकीची असून सदरची मिळकत ही खरेदी करण्याचे ठरवून खरेदीपूर्व जाहीर नोटीस ॲड. एस. व्ही. इंगळे रा. कुर्डू, ता. माढा, जि. सोलापूर यांचेमार्फत प्रसिद्ध केलेली होती.

तथापि वर नमूद मिळकत गट नंबर ५७५/१ क्षेत्र ०२ हे. ०६ आर, पो.ख. ०० हे. ०९ आर, एकूण ०२ हे. १५ आर ही मिळकत आमचे अशील व श्री. दादाराव गोरख माने यांचे एकत्र कुटुंबाची असून सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क, हिस्सा असून आमचे अशील व श्री. दादाराव गोरख माने यांचे दरम्यान कौटुंबिक कलह निर्माण झालेले असल्याने आमचे अशिलांनी माढा येथील फौजदारी न्यायालयात पी. डब्ल्यु. डी. व्ही. अर्ज नंबर २१/२०२६ चे प्रकरण दाखल केलेले असून सदर प्रकरणामध्ये आमचे अशिलांनी वर नमूद मिळकतीचे हस्तांतरणास मनाई मिळणेकरीता अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज मे. कोर्टात सुनावणीकामी प्रलंबित आहे. असे असताना सदर वर नमूद मिळकतीबाबत दादाराव गोरख माने हे सदरची मिळकत मे. न्यायालयात प्रकरण प्रलंबित असताना देखील विक्री हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहेत व त्याअनुषंगाने खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली होती व आहे ही बाब बेकायदेशीर अशी आहे.

तरी या जाहीर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत माढा येथील मे. फौजदारी न्यायालयात दाखल पी. डब्ल्यु. डी. व्ही. अर्ज नंबर २१/२०२६ या प्रकरणी मनाईचा अर्ज दाखल केलेला असल्याने वर नमूद मिळकतीबाबत कोणीही खरेदीखत, गहाण, दान, बक्षीसपत्र, लीज, लीन, भाडेकरार, बटईपत्र, नोटरी दस्त या अथवा तत्सम स्वरुपाचा जमीन हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार करू नये. याउपरही कोणीही तसा व्यवहार केलेस तो आमचे अशिलांवर व त्यांचे वर नमूद मिळकतीमधील कायदेशीर हक्कांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून हे जाहीर नोटीसीस उत्तर दिले असे.

तारीख १८/०६/२०२६

**(सही)**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. कल्याण दगडू वाळुजकर**
**एम.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट**
**रा. छोरीया टाउनशिप कुर्डूवाडी,**
**ता. माढा, जि. सोलापूर**
**मो. नं. ९०११५९०३३३**

### जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः जि. सोलापूर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु. पल. हद्दीतील गट .नं. १२९९/२ या पैकी प्लॉट नंबर २१ पैकी पश्चिम बाजूच्या प्लॉटचे क्षेत्रफळ ९६.०० चौ.मी. अशी जागा यासी चतुःसिमा पुर्वस नागनाथ पारसे चौरे यांची जागा, दक्षिणेस १५ फुटी रोड, पश्चिमेस - कोकाटे यांची जागा व उत्तरेस येळकर यांची जागा येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह याचे पाणी व वागणुक दक्षिण बाजुने जाते व आहे वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री नगिना अशोक हनुमंते यांचे मालकीची आहे.

श्री सतीश अशोक हनुमंते, रा. बार्शी, ता. बार्शी यांनी बँक ऑफ इंडिया बँकेतील कॅश क्रेडिट कर्ज खाते टेकओव्हर करणेसाठी व वाढीव खेळत्या भांडवलासाठी कर्ज आमचे अशिल सांगली अर्बन को- ऑप. बँक लि. सांगली. शाखा - बार्शी या बँकेकडे मागणी केली. व त्यांना रक्कम रूपये १५,००,०००/- (पंधरा लाख चे मात्र) चे कर्ज मंजुर झाले आहे .सदर कर्जास सौ नगिना अशोक हनुमंते या जमीनदार असून त्यांनी कर्जाची जामीनकी स्वीकारली आहे म्हणून वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेला निर्वाळा विद्यमान मालक सो नगिना अशोक हनुमंते यांनी दिलेला आहे. मिळकत ही कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत खरेदीखत ,कर्जबोजाचे, बक्षिस वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासुन (८) आठ दिवसाचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेद निजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणीही तक्रार चालणार नाही .कोणाचीही फसगत होवु नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे.

ता. १८/०६/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. प्रसाद जा. कुलकर्णी,**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी**

### जाहीर प्रसिद्धीकरण

ॲड. अमोल व्यं. देशपांडे

**सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि. कि. अर्ज कं. ५५/२०२६
निशाण क्र. ७

१) श्रीमती स्वाती तुकाराम गुरव, वय - ४० वर्षे,
व्यवसाय - शेती, रा. गुरव वस्ती, चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीजवळ मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
२) वैष्णवी तुकाराम गुरव, वय - १९ वर्षे, — **-- अर्जदार**
धंदा - शेती, रा. सदर.
३) योगीराज तुकाराम गुरव, वय - ८ वर्षे,
व्यवसाय - शिक्षण, रा. सदर. अज्ञान,
तर्फे इष्ट मित्र - श्रीमती स्वाती तुकाराम गुरव,
रा. सदर.

**विरुद्ध**

कोणीही नाही — **-- सामनेवाला**

ज्याअर्थी तुकाराम पंढरीनाथ गुरव यांचे दि. ०१/०७/२०२५ रोजी निधन झाले असून त्यास अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. तुकाराम पंढरीनाथ गुरव याचे मृत्यूनंतर त्याचे वारस म्हणून त्यास शासनाकडून देय असलेली रक्कम मिळविण्यासाठी आपले नावे वारसप्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार यांचे हक्कात सदरचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून अर्जदार यास रीतसर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दि. १७/६/२६

**(सही)**
**लिपिक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर सोलापूर**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ- शास्त्री नगर अ झोपडपट्टी, सोलापूर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ३७७ ही मिळकत घरजागा आहे. सदरची मिळकत आमचे अशील १) बुऱ्हाण मौलाना शेख ऊर्फ जज्जाल, २) अमीर मौलाना शेख ऊर्फ जज्जाल यांचे वडिल व फातिमा शुकुर शेख ऊर्फ जज्जाल यांचे सासरे पै.मौलाना हुसेनसाब हुसेनसाब शेख ऊर्फ जज्जाल यांचे नांवावर असून त्यांचे दि.१६/०१/२००० रोजी सोलापूर येथे मृत्यू झालेला आहे व तसेच आमचे अशील नं. १ व ३ यांचे आई व आमचे अशील नं.२ यांचे सासू रजियाबी मौलाना शेख ऊर्फ जज्जाल यांचेही दि.०९/०८/२०१२ रोजी सोलापूर येथे मृत्यू झालेला आहे व तसेच आमचे अशील फातिमा शुकुर शेख ऊर्फ जज्जाल यांचे पती पै.शुकुर मौलाना शेख ऊर्फ जज्जाल यांचेही दि.२४/०९/२०१६ रोजी मृत्यू झालेला आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिलाचे वडिल पै.मौलाना हुसेनसाब शेख ऊर्फ जज्जाल यांचे नांवे घर नं.३७७ शास्त्रीनगर अ, सोलापूर येथे १५ × १५ फुटाचे एक पत्राशेड खोली आहे.

सदरहू घरजागेत आमचे अशील १) बुऱ्हाण मौलाना शेख ऊर्फ जज्जाल, २) अमीर मौलाना शेख ऊर्फ जज्जाल व फातिमा शुकुर शेख ऊर्फ जज्जाल हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरूपी मयताचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं. ३७७ शास्त्रीनगर अ झोपडपट्टी या मिळकतीवरील मयताचे नांव कमी करून आमचे अशील १) बुऱ्हाण मौलाना शेख ऊर्फ जज्जाल, २) अमीर मौलाना शेख ऊर्फ जज्जाल व फातिमा शुकुर शेख ऊर्फ जज्जाल यांचे तिंघांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशील म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख- १८/०६/२०२६

**(सही)**
**ढेकणे एस.एम.**
**ॲडव्होकेट**
**रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि.सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल एसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसातील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

**ताबा सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१**

**परिशिष्ठ IV प्रमाणे**

| अ. क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) संदीपकुमार नामदेव राऊत (कर्जदार)<br>रा : सोहम हाईट, छत्रपती कॉलनी, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१<br>२) मोईज हुसेनी बोहरी (जामीनदार)<br>रा : बुरहानी विला, मनगिरे मला, मंगळवार पेठ, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१५००००००७ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०१/२०२६ अखेर | एकूण रक्कम रुपये ३३,९७,२९४/- (रु. तेहतीस लाख सत्याण्णव हजार दोनशे चौऱ्याण्णव) अधिक दि. ०१/०२/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २७/०२/२०२६ व १२/०३/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०६/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर पैकी तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील बार्शी म्युनिसिपल हद्दीतील मिळकत याचा गट नं.६५०/२, याचे क्षेत्र ५८ आर ८० चौ.मी. या जागेवर बांधण्यात आलेल्या ''सोहम हाईट्स'' या बिल्डींग मधील फ्लॅट नं. ४०४, याचे क्षेत्र ८०५ चौ. फु., यांसी चतुःसिमा येणेप्रमाणे : पूर्वेस लिफ्ट व पॅसेज ची जागा, पश्चिमेस डक्ट व फ्लॅट नं. ४०६ ची जागा, उत्तरेस डक्ट व फ्लॅट नं. ४०३ ची जागा, दक्षिणेस सदर नंबर पैकी मोकळी जागा |
| २ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) मयत रामचंद्र लक्ष्मणराव बबलादकर (कर्जदार) यांचे कायदेशीर वारसदार -<br>अ) स्मिता रामचंद्र बबलादकर, ब) स्वप्नील रामचंद्र बबलादकर<br>दोघे रा. : फ्लॅट नं. ३०४, अ विंग, मुक्ताई अपार्टमेंट, आशिष गार्डन जवळ, पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८<br>२) मनोज लक्ष्मण देशमुख (जामीनदार)<br>रा. : छत्रपती कॉलनी, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि.सोलापूर ४१३ ४०१.<br>३) भूषण भुजंगराव कदम (जामीनदार)<br>रा. : ५० ब, आनंदी निवास, माळे गल्ली, के. व्ही. नगर, बार्शी, जि. सोलापूर ४१३४११ |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१५००००००३ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०१/२०२६ अखेर | एकूण रु. ३४,७४,९०७/- (रु. चौतीस लाख चौऱ्याहत्तर हजार नऊशे सात फक्त) अधिक दिनांक ०१/०२/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २७/०२/२०२६ व १२/०३/२०२६ रोजी दैनिक बिझनेस स्टँडर्ड |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०६/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. बार्शी, जि. सोलापूर पैकी बार्शी नगर पालिका हद्दीतील मिळकत यांसी गट नं. ६५०/२, याचे क्षेत्र ५८ आर ८० चौ. मी. या जागेवर बांधण्यात आलेल्या 'सोहम हाईटस' या बिल्डींग मधील फ्लॅट नं. २०३, याचे क्षेत्र ८०५.०० चौ. फू., यांसी चतुर्सिमा पूर्वेस लिफ्ट व पॅसेज, पश्चिमेस डक्ट व फ्लॅट नं. २०५, उत्तरेस खुली जागा दक्षिणेस - डक्ट व फ्लॅट नं. २०४ |
| ३ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) स्मिता रामचंद्र बबलादकर (कर्जदार)<br>रा. : फ्लॅट नं. ३०४, अ विंग, मुक्ताई अपार्टमेंट, आशिष गार्डन जवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.<br>२) मयत रामचंद्र लक्ष्मणराव बबलादकर (जामीनदार) यांचे कायदेशीर वारसदार -<br>अ) स्मिता रामचंद्र बबलादकर, ब) स्वप्नील रामचंद्र बबलादकर<br>दोघे रा. : फ्लॅट नं. ३०४, अ विंग, मुक्ताई अपार्टमेंट, आशिष गार्डन जवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.<br>३) मनोज लक्ष्मण देशमुख (जामीनदार)<br>रा. : छत्रपती कॉलनी, कुर्डूवाडी रोड, बार्शी, जि.सोलापूर ४१३४०१. |
| | कर्ज खाते क्र. | ००६००३२१५००००००५ |
| | थकीत कर्ज रक्कम दि. ३१/०१/२०२६ अखेर | एकूण रु. ३०,६०,०२७/- (रु. तीस लाख साठ हजार सत्तावीस) अधिक दिनांक ०१/०२/२०२६ पासून होणारे १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | २७/०२/२०२६ व १२/०३/२०२६ रोजी दैनिक बिझनेस स्टँडर्ड |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १२/०६/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. बार्शी, जि. सोलापूर पैकी बार्शी नगर पालिका हद्दीतील येथील मिळकत यांसी गट नं. ६५०/२ याचे क्षेत्र ५८ आर ८० चौ. मी. या जागेवर बांधण्यात आलेल्या 'सोहम हाईटस' या अपार्टमेंट मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०६ याचे चटई क्षेत्र ३८८.०० चौ. फू. व बिल्ट अप क्षेत्र ४१.२५ चौ. फू., यांसी चतुर्सिमा पूर्वेस डक्ट व फ्लॅट नं. २०४, पश्चिमेस लिफ्ट व पॅसेज, उत्तरेस डक्ट व फ्लॅट नं. २०५, दक्षिणेस खुली जागा |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सूचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अशा अधिकार आणि उपायांवर पूर्वग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंवा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

**दिनांक : १२/०६/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**



## महत्त्वाचे

### आयव्हरी कोस्टच्या वाहीला कॅनडात जाण्यास मनाई



**न्यू यॉर्क :** मॅच-फिक्सिंगच्या संशयावरून चौकशी सुरू असलेला आयव्हरी कोस्टचा आक्रमक खेळाडू 'एली वाही' याला जर्मनीविरुद्ध होणाऱ्या संघाच्या पुढील विश्वचषक सामन्यासाठी कॅनडाला जाण्याची परवानगी मिळालेली नाही, अशी माहिती आयव्हरी कोस्टच्या फुटबॉल महासंघाने गुरुवारी दिली. शनिवारी टोरंटो येथे आयव्हरी कोस्टचा सामना जर्मनीशी होणार आहे. एलो वाही संघासोबत प्रवास करू शकणार नाही कारण या टप्प्यावर कॅनडाच्या हद्दीत प्रवेश करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय परवानग्या मिळवता आल्या नाहीत. सोमवारी फिलाडेल्फिया येथे झालेल्या सलामीच्या सामन्यात आयव्हरी कोस्टने इक्वेडोरचा १-० असा पराभव केला होता, तेव्हा वाहीने आक्रमक फळीत सुरुवात केली होती. संघ परत येईपर्यंत तो अमेरिकेतच थांबेल, असेही महासंघाने स्पष्ट केले. मे महिन्यात 'नीस' संघाविरुद्धच्या 'लीग १' सामन्यादरम्यान वाहीला 'येलो कार्ड' मिळेल यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर असामान्य प्रमाणात सट्टा लावला गेला होता. १७ मे रोजी 'नीस' आणि 'मेट्झ' यांच्यात झालेल्या आणि ०-० अशा बरोबरीत सुटलेल्या सामन्यादरम्यान वाहीला येलो कार्ड दाखवण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर संशयास्पद सट्टेबाजीची हालचाल दिसून आली होती. याबद्दल सट्टेबाजीच्या बाजारावर लक्ष ठेवणाऱ्या भागीदारांनी फ्रेंच लीगला सतर्क केले होते.

# घानाचा पनामावर 'स्टॉपेज टाईम'मध्ये नाट्यमय विजय

**टोरंटो, १८ जून**

फिफा २०२६ विश्वचषकाच्या 'ग्रुप एल'मध्ये पावसाळी वातावरणात टोरंटो येथे झालेल्या एका चुरशीच्या सामन्यात कालेब यिरेंकी याने निर्धारित वेळेनंतरच्या अतिरिक्त वेळेत ('स्टॉपेज टाइम'मध्ये) अगदी शेवटी केलेल्या गोलमुळे घानाने पनामावर १-० असा नाट्यमय विजय मिळविला. मध्यंतराला गोलरक्षक लॉरेन्स आती झिगी दुखापतीमुळे बाहेर जाऊनही घानाने सामन्यातील तिन्ही गुण आपल्या नावे केले.



कालेब यिरेंकी याने गोल केल्यानंतर कौतुक करताना सहकारी खेळाडू

'स्टॉपेज टाइम'च्या पाचव्या मिनिटाला घानाने मैदानाच्या स्वतःच्या भागातून वेगवान प्रति-आक्रमण रचले. ब्रँडन थॉमस-असांते डाव्या बाजूने वेगाने पुढे सरकला आणि पेनॉल्टी एरियामध्ये शिरला; त्यानंतर त्याने चेंडू यिरेंकीकडे पास केला, त्याने कोणाच्याही अडथळ्याविना चेंडूला जाळीत धाडून विजयी गोल नोंदविला.

सामन्याच्या बहुतांश वेळात गोल करण्याच्या फारशा स्पष्ट संधी निर्माण झाल्या नव्हत्या, पण या अखेरच्या क्षणी झालेल्या गोलने सामन्याचा निकाल लावला. पूर्वार्धात पनामाचा संघ अधिक आक्रमक आणि धोकादायक वाटत होता, तर विश्रांतीनंतर घानाच्या खेळात लक्षणीय सुधारणा झाली आणि त्यांनी चेंडूवरील ताबा अधिक चांगल्या प्रकारे राखला. इंग्लंड आणि क्रोएशिया यांचाही समावेश असलेल्या या गटात हा सामना दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात होता. याआधीच्या सामन्यात इंग्लंडने क्रोएशियाचा ४-२ असा पराभव केला होता, त्यामुळे 'ग्रुप एल'मधून पात्रता फेरी गाठण्याच्या शर्यतीत घानाचा हा विजय एक महत्त्वाची चालना ठरला. (वृत्तसंस्था)

### छायाचित्रकारांची जागा बदलण्याची 'फिफा'कडे मागणी

टेक्सास : विश्वचषकातील आपल्या पदार्पणाच्या सामन्यात क्रोएशियावर विजय मिळवण्यापूर्वी, राष्ट्रगीत सुरू असताना छायाचित्रकारांमुळे आपल्या संघाला पाहता न आल्याने इंग्लंडचे प्रशिक्षक थॉमस टुचेल नाराज झाले होते. त्यांनी छायाचित्रकारांची जागा बदलावी, अशी मागणी फिफाकडे केली आहे. राष्ट्रगीतादरम्यान मला माझा संघ दिसत नव्हता आणि मी या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होतो, असे टुचेल यांनी बुधवारी इंग्लंडने क्रोएशियाचा ४-२ असा पराभव केल्यानंतर सांगितले. इंग्लंडचे राष्ट्रगीत 'गॉड सेव्ह द किंग' वाजवले जात असताना, टुचेल यांनी छायाचित्रकारांना तिथून बाजूला होण्याचा इशारा केला. जेव्हा त्यांनी तसे केले नाही, तेव्हा या जर्मन प्रशिक्षकाने आपल्या सहकाऱ्यांच्या खांद्यावर हात ठेवला आणि खेळाडूंना पाहण्यासाठी त्यांना स्टेडियममधील मोठ्या स्क्रीनकडे पहावे लागले. आजचा क्षण अत्यंत खास होता, पण मी अवघ्या अर्धा मीटर अंतरावर ५० छायाचित्रकारांच्या समोर उभा होतो आणि मला एकही खेळाडू दिसत नव्हता, असे टुचेल म्हणाले.

## आजचे सामने

**अमेरिका विरुद्ध ऑस्ट्रेलिया**
**वेळ :** शुक्रवारी रात्री १२:३० वाजतापासून
**स्थळ :** लुमेन फील्ड, सिएटल

**स्कॉटलंड विरुद्ध मोरोक्को**
**वेळ :** शनिवारी पहाटे ३:३० वाजतापासून
**स्थळ :** जिलेट स्टेडियम, बॉस्टन

**ब्राझील विरुद्ध हैती**
**वेळ :** शनिवारी सकाळी ६:३० वाजतापासून
**स्थळ :** लिंकन फायनान्शियल फील्ड, फिलाडेल्फिया


**तुर्की विरुद्ध पॅराग्वे**
**वेळ :** सकाळी ९:३० वाजतापासून
**स्थळ :** लेव्हीज स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)

# विजयी पुनरागमनात डियाझची चमक

## कोलंबियाचा उझबेकिस्तानवर ३-१ ने विजय

मेक्सिको सिटी, १८ जून

आठ वर्षांच्या कालखंडानंतर कोलंबियाचा संघ फिफा विश्वचषकात परतला आहे आणि नेस्टर लोरेन्झो यांच्या मार्गदर्शनाखालील संघाने स्पर्धेत पदार्पण करणाऱ्या उझबेकिस्तानविरुद्ध वर्चस्व गाजवले. विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या उझबेकिस्तानविरुद्ध ३-१ असा विजय नोंदवित कोलंबियाने स्पर्धेत यशस्वी पुनरागमन केले. या विजयात लुईस डियाझने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



लुईस डियाझ

मेक्सिको सिटी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात बायर्न म्युनिकच्या विंगर डियाझने एक गोल केला आणि डॅनियल मुनोजच्या गोलसाठी मदत करणारा पास दिला; तसेच, बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या जॅमिंटन कॅम्पझने सामन्याच्या उत्तरार्धात गोल करत संघाचा विजय निश्चित केला.


कोलंबियाने सुरुवातीपासूनच आपली लय साधली. १७ व्या मिनिटाला त्यांना गोल करण्याची संधी मिळाली होती, परंतु जॉन एरियासचा २० यार्डांवरून मारलेला फटका गोलपोस्टच्या अगदी जवळून बाहेर गेला. ३२ व्या मिनिटाला डियाझचा फटका गोलपोस्टला लागल्याने नेस्टर लोरेन्झो यांचा संघ गोलच्या आणखी जवळ पोहोचला होता. मात्र, आठ मिनिटांनंतर त्यांनी शानदार पद्धतीने गोलचे खाते उघडले; डियाझने 'बॉक्स'मध्ये मारलेल्या चेंडूवर मुनोजने चपळाईने फिरून 'व्हॉली'द्वारे गोल केला. (वृत्तसंस्था)

# रोनाल्डोने केली घोर निराशा

## पोर्तुगाल-डीआर कोंगो लढत १-१ ने बरोबरीत

**ह्युस्टन, १८ जून**

काल विश्वविजेत्या अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीची हॅटट्रिक पाहिल्यानंतर, डीआर कोंगोविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात पोर्तुगालच्या स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डोकडून मोठ्या चमकदार कामगिरीची अपेक्षा होती, परंतु त्याने प्रेक्षकांची घोर निराशा केली. रोनाल्डोला या सामन्यात एकही गोल करता आला नाही. जोआओ नेव्हिसने सहाव्या मिनिटाला गोल करून पोर्तुगालची लाज राखली, परंतु तिकडे मध्यंतरापूर्वी योआने विसाने गोल करून डीआर कोंगोला सामन्यात बरोबरी साधण्यास मदत केली.



अल-नसरचा हा स्टार फॉरवर्ड रोनाल्डो अनेक वेळा लक्ष्यापासून दूर राहिला आणि गोलसमोर त्याच्या खेळात खरी चपळता दिसली नाही. पोर्तुगालसाठी खेळताना ख्रिस्तियानो रोनाल्डोचे प्रमुख स्पर्धांमधील अर्थात फिफा विश्वचषक/युरो स्पर्धेत सलग १० सामने गोलरहित गेले आहेतः

कोंगोविरुद्धच्या सामन्यात रोनाल्डोला सामन्याच्या ७० व्या मिनिटादरम्यान मोठी संधी होती. पोर्तुगालने डीआर काँगोची बचावफळी भेदली आणि चेंडू रोनाल्डोकडे पास केला. रोनाल्डो सिक्स-यार्ड बॉक्सच्या अगदी जवळ होता. त्याने आपल्या उजव्या पायाने चेंडूवर जोरदार प्रहार केला, पण त्याचा फटका पोस्टच्या बाहेर गेला.

नायजेरियाविरुद्धच्या पोर्तुगालच्या अंतिम सराव सामन्यातही अशीच परिस्थिती होती, ज्यात रोनाल्डोने अनेक सोप्या संधी गमावल्या.

जर रोनाल्डोचा खेळ असाच खराब होत राहिला, तर पोर्तुगालच्या प्रशिक्षकावरील दबाव वाढेल. या निकालानंतर पोर्तुगालला 'ग्रुप के' मध्ये मोठी मजल मारावी लागणार आहे. पोर्तुगाल संघ पुढील मंगळवारी ह्युस्टनमध्ये परत येईल व स्पर्धेतील आपला दुसरा सामना उझबेकिस्तानशी खेळेल.



**थियरी हेनरीची रोनाल्डोवर टीका**

आर्सेनल आणि फ्रान्सचा माजी स्ट्रायकर असलेल्या थियरी हेन्रीने पोर्तुगालचा कर्णधार ख्रिस्तियानो रोनाल्डोवर संघाच्या गरजांपेक्षा वैयक्तिक महत्त्वाकांक्षेला प्राधान्य दिल्याचा आरोप केला आहे. (वृत्तसंस्था)

# इंग्लंडचा क्रोएशियावर ४-२ ने रोमहर्षक विजय

### हॅरी केनचे पूर्वार्धात दोन गोल

**डॅलस, १८ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत येथे 'ग्रुप एल' मधील सलामीच्या सामन्यात हॅरी केनने पूर्वार्धात केलेल्या दोन गोलांच्या जोरावर इंग्लंडने अखेरीस क्रोएशियावर ४-२ अशा गोलफरकाने रोमहर्षक विजय नोंदवून आपल्या विश्वचषक मोहिमेची दमदार सुरुवात केली.



हॅरी केनने १२ व्या मिनिटाला पेनॉल्टीवर गोल केला व त्यानंतर ४२ व्या मिनिटाला गोल करून इंग्लंडला आघाडी मिळवून दिली, परंतु त्यानंतर क्रोएशियाने जोरदार मुसंडी मारीत गोलसंख्या २-२ अशी बरोबरीत आणली होती; मात्र मध्यंतरानंतर लगेचच ज्यूड बेलिंगहॅमने आणि सामना संपायला पाच मिनिटे शिल्लक असताना बदली खेळाडू मार्कस रॅशफोर्डने गोल करत थॉमस टुशेलच्या संघाचा विजय निश्चित केला.

पहिल्या सत्रात हॅरी केनने दोन गोल केल्यामुळे इंग्लंडची स्थिती मजबूत वाटत होती; यातील एका गोलसाठी मिळालेल्या पेनल्टीमुळे त्याने विश्वचषकात इंग्लंडच्या खेळाडूने सर्वाधिक गोल करण्याच्या गॅरी लिनेकरच्या विक्रमाशी बरोबरी केली. मात्र, मार्टिन बाटुरिना आणि पेटार मुसा यांच्या गोलमुळे क्रोएशियाने दोन्ही वेळा सामन्यात पुनरागमन केले आणि मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ २-२ अशा बरोबरीवर होते. मध्यंतरानंतर टुशेल यांचा संघ नव्या जिद्दीने मैदानात उतरला आणि त्यांनी सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले. ज्यूड बेलिंगहॅमने इंग्लंडला पुन्हा आघाडी मिळवून दिली आणि त्यानंतर बदली खेळाडू म्हणून आलेल्या मार्कस रॅशफोर्डने अखेरच्या क्षणी चौथा गोल करत डॅलसमध्ये संघाचा शानदार विजय निश्चित केला.

मुख्य प्रशिक्षक थॉमस टुशेल यांनी मध्यंतराच्या वेळी दिलेल्या जोशपूर्ण संदेशामुळेच संघाला उत्तरार्धात वर्चस्व गाजवणारी कामगिरी करण्यास प्रेरणा मिळाली, असे इंग्लंडचा कर्णधार हॅरी केनने सांगितले. मध्यंतरानंतर क्रोएशियाची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही, अशी झलात्को डॅलिक यांनी कबुली दिली. (वृत्तसंस्था)




# विजयासाठी न्यूझीलंडची धडपड

**साऊदम्पटन, १८ जून**

आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषकात आपले विजेतेपद राखण्याच्या मोहिमेला पुन्हा रुळावर आणण्यासाठी न्यूझीलंड संघाची धडपड सुरू आहे. शुक्रवारी साऊदम्पटन येथे न्यूझीलंडचा सामना आयर्लंडशी होणार आहे. या टी-२० विश्वचषकात दोन्ही संघांना अद्याप विजयाची चव चाखता आलेली नाही; त्यामुळे सलग तिसरा पराभव झाल्यास उपांत्य फेरी गाठण्याचा मार्ग अधिक कठीण होऊ शकतो.या प्रकारात न्यूझीलंड आणि आयर्लंड यांच्यात आतापर्यंत केवळ चार सामने झाले आहेत आणि त्या सर्व सामन्यांत गतविजेत्या न्यूझीलंडनेच विजय मिळविला आहे. मात्र, त्यांच्यातील शेवटचा टी-२० सामना आठ वर्षांपूर्वी, म्हणजेच २०१८ च्या महिला टी-२० विश्वचषकात झाला होता; त्यावेळी सोफी डिव्हाइनने अवघ्या २१ चेंडूंत अर्धशतक झळकावत आयर्लंडच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली होती.या सामन्यातही न्यूझीलंडची मदार सोफी डिव्हाइनवर आहे.



सोफी डिव्हाइन

मेली केरच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघातील इतर खेळाडूंनी तिला उत्तम साथ द्यावयास हवी.

कागदावर न्यूझीलंडचे पारडे जड असले, तरी आयर्लंडचा संघ कडवी झुंज देण्यास उत्सुक असेल. विशेष म्हणजे, महिला टी-२० विश्वचषकात १९ प्रयत्न करूनही आयर्लंडला अद्याप एकही सामना जिंकता आलेला नाही. न्यूझीलंडला प्रामुख्याने क्षेत्ररक्षणातील त्रुटींचा फटका बसला आहे; त्यांनी वेस्ट इंडीजविरुद्ध सात आणि श्रीलंकेविरुद्ध तीन झेल सोडले आहेत. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**न्यूझीलंड वि. आयर्लंड**
**स्थळ :** साऊदम्पटन
**वेळ :** रात्री ११.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्टसवर

# नीरजचा सामना श्रीलंकेच्या रुमेशशी

### दोहा डायमंड लीग आज

**दोहा, १८ जून**

शुक्रवारी येथे दोहा डायमंड लीग स्पर्धा होणार आहे. दुखापतीमुळे स्पर्धेपासून दूर राहिलेला भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्रा या स्पर्धेत सहभागी होणार आहे. यात दिग्गज प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध मैदानात उतरताना आपल्या लयीवर कोणताही परिणाम होणार नाही असा नीरजला विश्वास आहे. दोहा येथील परिचित वातावरणात होणाऱ्या या स्पर्धेत तो पुनरागमन करत आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अव्वल दर्जाच्या खेळाडूंमध्ये श्रीलंकेचा उदयोन्मुख तारा रुमेश थरंगा पाथिरागे याचाही समावेश आहे. रूपेश याने काही दिवसांपूर्वीच ९० मीटरचा टप्पा ओलांडला आहे.





दुसरीकडे, २८ वर्षीय नीरज पाठीच्या दुखापतीतून सावरत आहे; या दुखापतीमुळे त्याला गत वर्षी सप्टेंबरमधील जागतिक स्पर्धेनंतर कोणत्याही स्पर्धेत भाग घेता आलेला नाही. त्या स्पर्धेत त्याने ८४.०३ मीटरची सरासरी कामगिरी करत आठवे स्थान मिळवले होते, परंतु कतार स्पोर्ट् क्लबमधील या स्पर्धेत सुरुवातीपासूनच आपली सर्वोत्तम लय गाठण्याची त्याला आशा आहे. दोहा हे त्याच्यासाठी नेहमीच यशस्वी ठरले आहे. याच ठिकाणी, दोनदा ऑलिम्पिक पदक जिंकणाऱ्या नीरजने गेल्या वर्षी मे महिन्यात ९० मीटरचा महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला होता. त्याने ९०.२३ मीटरची कामगिरी नोंदवली होती आणि जर्मनीच्या ज्युलियन वेबर (९१.०६ मीटर) नंतर दुसरे स्थान पटकावले होते.

ही स्पर्धा मूळतः ८ मे रोजी हंगामातील पहिली स्पर्धा म्हणून आयोजित केली जाणार होती, परंतु पश्चिम आशियातील संघर्षामुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.

तुर्कीमध्ये पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर २५ मेपासून स्वित्झर्लंडमध्ये सराव करणाऱ्या नीरजचा या नऊ खेळाडूंच्या स्पर्धेत उशिरा समावेश करण्यात आला. मी दीड महिन्यापूर्वी भालाफेकचा सराव सुरू केला आणि आम्ही त्यासाठी पुरेसा वेळ घेतला. त्यानंतर मी दोहा आयोजकांकडे विचारणा केली की, स्पर्धेच्या अगदी काही दिवस आधी कळवल्यास सहभागी होणे शक्य होईल का. त्यांनी होकार दिला आणि माझ्या शेवटच्या सराव सत्रानंतर आम्ही दोहा स्पर्धेत भाग घेण्याचा निर्णय घेतला, असे नीरजने स्पर्धेपूर्वीच्या पत्रकार परिषदेत सांगितले. मी ९० मीटरचा टप्पा गाठण्याचा माझा सर्वोत्तम प्रयत्न करेन. मला खूप चांगले आणि तंदुरुस्त वाटत आहे, असे नीरज म्हणाला. (वृत्तसंस्था)

### अंतिम फेरीसाठी 'श्रीलंका अ', 'अफगाणिस्तान अ' यांच्यात चुरस

**डाम्बुला, १८ जून**

येथे आयोजित श्रीलंका तिरंगी मालिकेत 'भारत अ' संघाने अंतिम फेरीतील आपले स्थान निश्चित केले असून, आता त्यांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्याची प्रतीक्षा आहे. शुक्रवारी रंगिरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर 'श्रीलंका अ' आणि 'अफगाणिस्तान अ' यांच्यादरम्यानच्या गटातील शेवटच्या साखळी सामन्यातून भारतीय संघाचा अंतिम फेरीतील प्रतिस्पर्धी निश्चित होणार आहे.

स्पर्धेतील चुरस अजूनही कायम आहे, दोन्ही संघ अंतिम फेरी गाठण्यासाठी उत्सुक आहे, परंतु अफगाणिस्तानचा 'नेट रन रेट' खूपच कमी असल्याने, पात्र ठरण्यासाठी त्यांना मोठ्या फरकाने विजय मिळवणे आवश्यक आहे.

भारत अ संघाचे चार सामन्यात दोन विजय व दोन पराभव असून ते चार गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थनावर आहे. भारताचा नेट रन रेट ०.५१७ आहे. श्रीलंका अ संघाचा तीन सामन्यात दोन विजय व एक पराभव असून ते ४ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे, त्यांचा नेट रन रेट ०.४९४ आहे. अफगाणिस्तानचे तीन सामन्यात एक विजय व दोन पराभव आहे. त्यांचे २ गुण असून त्यांचा रन रेट -०.६०२ आहे. (वृत्तसंस्था)

# अश्मिता उपांत्यपूर्व फेरीत

### मकाऊ ओपन बॅडमिंटन

**मकाऊ, १८ जून**

येथे आयोजित मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी अनमोल खरब व अश्मिता चालिहाने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर इतर विभागांतील भारताचे आव्हान संपुष्टात आले.



जागतिक क्रमवारीत ६३ व्या स्थानावर असलेल्या अश्मिताने 'बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर'वरील आपली प्रभावी कामगिरी कायम राखत अमेरिकेच्या इशिका जयस्वालचा ३२ मिनिटांत २२-२०, २१-१५ असा पराभव केला आणि स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले. कोणतेही मानांकन नसलेल्या या भारतीय खेळाडूने याआधीच्या दोन स्पर्धांमध्ये (मलेशिया मास्टर्स आणि चायना मास्टर्स) उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. आता ती उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियाच्या किम मिन सनचा सामना करेल. आठवे मानांकन असलेल्या आणि जागतिक क्रमवारीत ५१ व्या स्थानावर असलेल्या अनमोल खरबचा मार्ग तुलनेने सोपा ठरला; कारण मलेशियाची माजी जागतिक ज्युनियर आणि युवा ऑलिम्पिक विजेती गोह जिन वेई हिने पहिल्या गेममध्ये ४-१२ अशा पिछाडीवर असताना, केवळ आठ मिनिटांच्या खेळानंतर माघार घेतली. आता ही भारतीय खेळाडू उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शी हिच्याशी झुंज देईल. महिला एकेरीतील इतर भारतीय खेळाडूंचे आव्हान मात्र अंतिम १६ खेळाडूंच्या फेरीमध्येच संपुष्टात आले. रक्षिता श्री संतोष रामराज हिला किम मिन सनकडून १५-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला, तर श्रियांशी वालीशेट्टी हिला दक्षिण कोरियाच्या किम मिन जी हिच्याकडून १६-२१, १६-२१ असा पराभव स्वीकारावा लागला. इशाराणी बरुआ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करण्याच्या अगदी जवळ पोहोचली होती, परंतु तिने दोन्ही गेम्समध्ये मिळालेल्या संधी गमावल्या आणि अखेरीस दक्षिण कोरियाच्या पार्क गा युन हिच्याकडून १९-२१, २१-२३ पराभव स्वीकारला. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### महानगरपालिकेच्या वतीने महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जून-**
सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्ताने आज सात रस्ता येथील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी माजी महापौर नलिनी चंदेले, आशिष परदेशी, अर्जुन परदेशी, अंबादास मरेडी, विरेंद्र चव्हाण, उज्वल दीक्षित,दर्शन दुबे कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जून-**
सोलापूर महानगरपालिकेचे वतीने पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या जयंती निमित्ताने सोलापूर महानगरपालिका येथील इंद्रभवन परिसरातील पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथे पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्ताने कौन्सिल हॉल येथे त्यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कुलगुरू डॉ. ईरेश स्वामी, महेंद्र वारद, आर्किटेक सुवर्णा, लुपने, माजी विरोधी पक्षनेते कावळे, मल्लिनाथ पाटील, संजय पाटील, प्रशांत लुबने, शिलवंत, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, जयप्रकाश आमनगी उपस्थित होते.



### मेलोडी मंचच्या लफ़्ज़ों का सफ़र मैफिलीला सोलापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. १८ जून -**
स्थानिक कलाकारांना हक्काचा मंच मिळवून देणाऱ्या येथील मेलोडी मंच या संस्थेला यशस्वीरित्या २ वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्धापन दिनाचे औचित्य साधून उडुपी कॅफे येथे लफ़्ज़ों का सफ़र या विशेष काव्य आणि गझल मैफिलीस येथील दर्दी रसिक प्रेक्षकांनी गर्दी करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शाही बैठकीत मंचचे परफॉर्मर्स यश क्षीरसागर, चैतन्य शेटे, मधुरा मुसळे आणि तेजस टिकोळे यांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. सुप्रसिद्ध दिग्गजांच्या शेरो-शायरी, गझला आणि कवितांच्या अप्रतिम सादरीकरणामुळे संपूर्ण उडुपी कॅफे टाळ्यांच्या गराड्यात न्हाऊन निघाला होता. मेलोडी मंचचे संस्थापक आकाश कोठडिया यांनी आपल्या उत्स्फूर्त शैलीत संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल गोल्ड अँड सिल्व्हर, मोडनिंब आणि धन मॅट्रिक्स कॅपिटल यांनी को-स्पॉन्सर्स म्हणून साथ दिली. तसेच मंचच्या २ वर्षांच्या प्रवासात वेन्यू पार्टनर्स म्हणून The Cult's Cafe, Cafe Livi'N Divine आणि Meridian Ice Cream यांचे सहकार्य लाभले. यासोबतच 'Festive Flea Exhibition' च्या माध्यमातून मोठा प्लॅटफॉर्म मिळवून देणारे धनराज बागले (MH13Be) यांचे सहकार्य लाभले.

## निधन वृत्त...

### छबुताई गायकवाड

**सांगोला, दि.१८ जून-**



कडलास (ता.सांगोला) येथील छबुताई मधुकर गायकवाड (वय-७६) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई असा परिवार आहे. त्या सेवानिवृत्त उपअभियंता मधुकर गायकवाड यांच्या पत्नी व भाजपाचे शिवाजीराव गायकवाड यांच्या जेष्ठ वहीनी होत्या.

### शिवाजी जाधव

**मंगळवेढा, दि. १८ जून-**



येथील पंढरपूर रोड गणेश मंदिराजवळील शिवाजी विठोबा जाधव (वय७५) यांचे बुधवार दि.१७ जून रोजी दुपारी ३.३० वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. आवताडे शुगरचे चिफ अकौंटंट बजीरंग जाधव व दामाजी ट्रॅव्हल्सचे मालक सतिश जाधव यांचे ते वडील होत.

# नंदेश्वर-जुनोनी मार्गालगत धोकादायक विहीर

### चिंतेचा विषय; लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १८ जून -**
नंदेश्वर-जुनोनी मार्गालगत असलेली एक जुनी विहीर सध्या ग्रामस्थांसाठी मोठा धोक्याचा विषय ठरत आहे. ही विहीर अगदी रस्त्याच्या कडेला असून तिच्या आसपास कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसल्याने अपघाताची शक्यता वाढत आहे. विशेष म्हणजे या विहिरीपासून काही अंतरावरच नंदेश्वर गावातील श्री बाळकृष्ण विद्यालय असल्यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



सध्या या परिसरातून राज्य महामार्गाचे काम सुरू आहे. विहिरीच्या अगदी कडेलाच रस्ता विकसित केला जात आहे. मात्र रस्त्याचे काम पूर्ण होण्यापूर्वी या धोकादायक विहिरीचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अलीकडेच तांदुळवाडी येथे रस्त्यालगत असलेल्या विहिरीत बुडून आठ जणांचा मृत्यू झाला होता. त्या प्रकरणात रस्ता बांधकामादरम्यान ठेकेदाराने पुरेशी सुरक्षा उपाययोजना न केल्याचा आरोप होत असून संबंधित ठेकेदारावर गुन्हाही दाखल केला आहे. या घटनेनंतर जिल्ह्यातील अशा धोकादायक विहिरींकडे ग्रामस्थांनी लक्ष वेधण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर नंदेश्वर येथील विहिरीबाबत ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. तांदुळवाडीसारखी दुर्घटना घडण्यापूर्वीच उपाययोजना करा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

विहिरीच्या एका बाजूला रस्ता असून दुसऱ्या बाजूला नंदेश्वर येथील बौद्ध बांधवांनी उभारलेले बुद्ध विहार आहे. येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांवेळी लहान मुलांची मोठी उपस्थिती असते. त्यामुळे या विहिरीमुळे त्यांच्याही जीवाला धोका निर्माण झाला आहे. याशिवाय गावालगतच वस्ती असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, या विहिरीचा सध्या गावाला कोणताही उपयोग नसून केवळ सुरक्षा कठडा किंवा भिंत बांधून हा प्रश्न सुटणार नाही. भविष्यातील मोठा धोका टाळण्यासाठी ही विहीर पूर्णपणे बुजविणे हाच एकमेव उपाय असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले आहे.

**याआधी टळली होती मोठी दुर्घटना**
विशेष म्हणजे सुमारे दोन वर्षांपूर्वी नंदेश्वरहून मंगळवेढाकडे जाणारी प्रवाशांनी भरलेली एसटी बस या विहिरीत कोसळता-कोसळता थोडक्यात बचावली होती. त्या बसमध्ये जवळपास ३० प्रवासी होते. त्या वेळी मोठी दुर्घटना टळली असली, तरी हा प्रकार ग्रामस्थांच्या स्मरणात आजही ताजा आहे.



# वस्तूंवर उत्पादन मूल्य छापा

## ग्राहक पंचायतीचे सत्याग्रह आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८ जून -**
अनियंत्रित एमआरपीमुळे ग्राहकांची सर्रास लूट केली जाते. त्यासाठी वस्तूवर उत्पादन मूल्य छापावे या मागणीसाठी देशभर आंदोलन सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून ग्राहक पंचायततर्फे पंढरपूर तहसील कार्यालयासमोरील सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.

ग्राहक पंचायततर्फे आज गल्ली ते दिल्ली असे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. प्रत्येक तहसील कार्यालय ते नवी दिल्ली येथील ऐतिहासिक जंतरमंतर मैदान येथील सत्याग्रहात पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला.

पंढरपुरातील आंदोलनात जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, उपाध्यक्ष प्रशांत माळवदे, कोषाध्यक्ष सागर शिंदे, जिल्हा सदस्य संतोष उपाध्ये, पांडुरंग अल्लापूरकर, तालुका सहसचिव आझाद अल्लापूरकर, तालुका कार्यकारिणी सदस्य मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, तेजस फडे, अमोल अभंगराव, किशोर शिंदे, शहाजी जाधव, शाम तापडिया आदी सहभागी झाले होते.

आंदोलनासाठी प्रांत सहसचिव दीपक इरकल,सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख यांचे मार्गदर्शनाखाली तालुका सचिव महेश भोसले, सुमित पारखे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान आंदोलनानंतर पंढरपूर प्रांताधिकारी सचिन इथापे व तहसीलदार सचिन लंगुटे यांना निवेदन देण्यात आले.

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत धीरज झाला 'सी.ए.'

### कोरोना काळात वडिलांचे निधन; शेती सांभाळत केला अभ्यास

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १८ जून -**



जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रम यांच्या बळावर बावी येथील धीरज मनोज पाटील यांनी चार्टर्ड अकाऊंटंट (सी.ए.) प्रतिष्ठित परीक्षा उत्तीर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

कोरोना काळात वडील मनोज राम राव पाटील यांचे अकाली निधन झाले. त्यानंतर कुटुंबावर मोठे संकट ओढवले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही धिरज यांनी खचून न जाता शिक्षणाची वाट सोडली नाही.

घरातील जबाबदाऱ्या सांभाळत आणि शेतीची कामे करत त्यांनी उपलब्ध वेळेत ऑनलाइन माध्यमातून सीए परीक्षेची तयारी केली. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि यश मिळविण्याची जिद्द यांच्या जोरावर त्यांनी 'सीए'सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण केली.

त्यांच्या या यशामागे कुटुंबियांचे पाठबळ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वडिलांच्या आठवणींनी दिलेली प्रेरणा महत्त्वाची ठरली, अशी भावना धिरज यांनी व्यक्त केली. धिरज पाटील यांचे हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून प्रतिकूल परिस्थितीतही मोठी स्वप्ने पूर्ण करता येतात, हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे.



### दि प्रोग्रेसिव्ह हायस्कूल येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जून-**
दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीज हायस्कूल सोलापूर शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम अतिशय आनंदाने साजरा करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक अ.अब्दुल गफूर सगरी हे अध्यक्षस्थान होते. पर्यवेक्षिका सादेका बारागजी, शिक्षक जुल्फिकार नदाफ, फारूक बिद्री व ग्रंथपाल जाफर बांगी उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मुख्याध्यापक अब्दुल गफूर सगरी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच गुलाबांच्या पंखळ्यांचे वर्षाव करत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन प्रवेश घेणाऱ्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देण्यात आले.यावेळी परविन मुजावर, सरदार नदाफ, एजाज शेख, निकहत शेख, मेहरून सय्यद, महेर शेख, हिना कौसर चितापुरे इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल जाफर बांगी यांनी केले.

### शहीद जवान आप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१८जून -**
शहीद जवान अप्पासाहेब काटे स्मृतीस्थळ लोकार्पण व पुण्यस्मरण सोहळा बुधवार दि.२४ जून रोजी होणार आहे. सोहळ्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (नि) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासोबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कर्मचारी बाळासाहे खराडे, कल्याण संघटक उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाध्ये करमाळा तालुक्यातील सर्व माजी सैनिक व त्यांच्या विधवा यांच्या अडीअडचणी सोडवल्या जातील. जास्तीत जास्त माजी सैनिक व विधवा यांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# महापालिका कर्मचाऱ्यांसाठी मेडिक्लेम विमा योजनेसाठी प्रक्रिया सुरू

### २० जूनपर्यंत कुटुंबियांची माहिती सादर करण्याचे खातेप्रमुखांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ जून-**
सोलापूर महानगरपालिकेच्या कायम आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांसाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता मेडिक्लेम विमा योजना राबविण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. सर्व विभागप्रमुख व खातेप्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्यासंदर्भात परिपत्रक उपायुक्त आशिष लोकरे यांनी काढले आहे.

मेडिक्लेम विमा योजना राबविण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. महापालिकेच्या परिवहन उपक्रम व शिक्षण मंडळातील सेवक वगळता इतर सर्व विभागांतील कायम, रोजंदारी, मानधन, कंत्राटी व बदली कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांची माहिती विहित नमुन्यात सादर करावी लागणार आहे. संबंधित माहिती आधार कार्डवर नमूद असलेल्या नावानुसार इंग्रजी भाषेत एक्सेल शीट व गुगल शीटमध्ये भरून सॉफ्ट कॉपी आणि हार्ड कॉपीसह दि. २० जूनपर्यंत कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालयाकडे सादर करण्याचे उपायुक्त लोकरे यांनी कळविले आहे.

आस्थापना लिपिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांकडून अद्ययावत माहिती संकलित करून कोणत्याही कर्मचाऱ्याचे अथवा त्यांच्या कुटुंबीयांचे नाव वगळले जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**मेडिक्लेमसाठी यांचा राहणार समावेश**
यासाठी पती किंवा पत्नी, आई-वडील, महिला कर्मचाऱ्यांसाठी आई-वडील किंवा सासू-सासरे यांपैकी एक पर्याय, वय वर्षे २५ पर्यंतची दोन अविवाहित अपत्ये,दुसऱ्या प्रसूतीवेळी जुळी अपत्ये असल्यास प्रथम अपत्यासह दोन्ही जुळ्या अपत्यांचा समावेश राहणार आहे.

# टेंभुर्णी-कन्हेरगाव पुलाखाली दोन गटात मारहाण

### धमक्या व रोकड काढून घेतल्याचा आरोप, टेंभुर्णी पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १८ जून-**
टेंभुर्णी येथील पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बायपास कन्हेरगाव रस्ता पुलाखाली दोन गटांमध्ये मारहाण झाली. या वादातून तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे आरोप करत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

टेंभुर्णी पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. १६ जून रोजी सकाळी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास कन्हेरगाव ब्रिज परिसरात ही घटना घडली. पहिल्या फिर्यादीनुसार, झिरपे वस्ती (टेंभुर्णी) येथील मंगेश देशमुख (वय २६) यांनी तक्रारीत म्हटले आहे की, सकाळी झालेल्या भांडणानंतर आपापसातील वाद मिटवून घेण्यासाठी फोनद्वारे बोलावण्यात आले. त्यानुसार ते कन्हेरगाव ब्रिजखाली गेले असता तेथे उपस्थित व्यक्तींनी शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.



तसेच खिशातील सुमारे २० हजार रुपये काढून घेतले. पोलिसांकडे तक्रार दिल्यास जिवंत ठेवणार नसल्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या तक्रारीवरून टेंभुर्णी येथील लखन बाकले तसेच वेणेगाव (ता. माढा) येथील तुषार जाधव व नितीन कदम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोना केशव झोळ करीत आहेत.

दरम्यान, याच घटनेप्रकरणी दुसऱ्या बाजूनेही स्वतंत्र तक्रार दाखल केली आहे. वेणेगाव येथील तुषार जाधव (वय २५) यांच्या फिर्यादीनुसार, ते आपल्या काही सहकाऱ्यांसह टेंभुर्णी परिसरात थांबले असताना काही व्यक्तींनी त्यांना कन्हेरगाव ब्रिज परिसरात नेले. त्यानंतर सकाळी झालेल्या वादाच्या कारणावरून शिवीगाळ करून गज, काठी, दगड तसेच दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप केला आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार मारहाणीत डोके, पाठ आणि पायावर दुखापत झाली. पुढे आमच्या नादी लागल्यास पिस्तुलाने गोळ्या घालण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

या प्रकरणी रणजित अटकळे, रत्नदीप अटकळे, रितेश देशमुख, निलेश देशमुख, शैलेश देशमुख, समाधान देशमुख व नागेश मुळे (सर्व रा. टेंभुर्णी) यांच्या विरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोहेकॉ जाधव हे करीत आहेत.



### अधिक मासानिमित्त संतसंग व नामगजर उत्साहात

**सोलापूर, दि. १८ जून-**
जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने अधिक मासानिमित्त जुने विठ्ठल मंदिर जोशी गल्ली येथे संतसंग व नामगजर कार्यक्रम संपन्न झाला. या पवित्र सोहळ्यास सोलापूर शहर व जिल्ह्यातील असंख्य भक्त-शिष्य, बालगोपाळ तसेच भाविक संख्येने उपस्थित राहिले. सर्वांनी संतसंग व गणी गण गणात बोते या मंत्राचा नाम गजराचा गजर घेत आध्यात्मिक आनंद अनुभवला. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सविता परांडे, संजीवनी माने, सागर माने, सविता जाधव, जिल्हा धर्मक्षेत्र प्रमुख श्रीशा सगनाळे, संग्राम सेना ट्रेनर विजय गाडे, दिगंबर अवताडे, ऐश्वर्या उत्तरकर, सचिव विद्या शेंडगे, विनायक कांबळे, अमर दुधाळ, दादासाहेब नागटिळक उपस्थित राहून सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, तुषार कांबळे, अर्जुन उत्तरकर, शुभम क्षीरसागर, निखिल मेटे, नरसिंग सगनाळे, रामानंद संप्रदाय सेवा समितीच्या सर्व पदाधिकारी व भक्त शिष्य परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# बार्शीत १२ भटक्या कुत्र्यांचा संशयास्पद मृत्यू

## चोरीच्या उद्देशाने कुत्र्यांना संपविल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१८ जून-**

बार्शी शहरातील सुभाष नगर (पाण्याच्या टाकीजवळ) परिसरात तब्बल १२ भटक्या कुत्र्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अज्ञात समाजकंटकांनी जाणीवपूर्वक विषबाधा करून या कुत्र्यांना ठार मारल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून, यामागे परिसरात चोरी अथवा इतर गैरकृत्य करण्याचा डाव असू शकतो, असा गंभीर संशय व्यक्त केला जात आहे.

बुधवार, दि. १७ जूनच्या रात्री उशिराच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी चिकनमधून विषारी पदार्थ देऊन कुत्र्यांना विषबाधा केल्याचा संशय आहे. या घटनेत ६ प्रौढ कुत्री आणि ६ लहान पिल्ले अशा एकूण १२ भटक्या कुत्र्यांचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी सकाळी परिसरातील नागरिकांना कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ, रस्त्याच्या कडेला, वाहनांखाली कुत्र्यांचे मृतदेह आढळून आले, असे प्रशांत मोहिते यांच्यासह अन्य नागरिकांनी सांगितले.

### कुत्रीच करत होती वस्तीचे रक्षण

आमच्या परिसरात कोणताही कायमस्वरुपी सुरक्षारक्षक नसून रात्रीच्या वेळी २० ते २५ दुचाकी वाहने रस्त्यावर उभी असतात. भटकी कुत्री रात्रीच्या वेळी अनोळखी व्यक्तींवर भुंकून वस्तीला सावध करत असल्याने ती एकप्रकारे परिसराचे संरक्षण करत होती. याच कारणामुळे चोरी अथवा अन्य गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी अडथळा ठरणाऱ्या या कुत्र्यांना विष देऊन मारण्यात आल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### सखोल तपास करावी, दोषींना अटक करावी

एकाच वेळी १२ कुत्र्यांचा मृत्यू झाल्याने प्राणीप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृत कुत्र्यांचे शवविच्छेदन करून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करावे, दोषींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी केली आहे.

### प्राणी छळ प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा

सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून संशयितांचा शोध घ्यावा, रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात 'प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, १९६०' तसेच संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# आमच्या अदृश्य शक्तीची ताकद निकालाच्या दिवशी दिसेल

## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दावा केल्याने निकालाची उत्सुकता





**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ जून-**

अकलूजआमच्या अदृश्य शक्तीची ताकद निकालाच्या दिवशी दिसेल, असा दावा खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी केला

विधान परिषदेच्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी अकलूज येथील मतदान केंद्रावर गुरुवारी उत्साहात व शांततेत मतदान पार पडले. माळशिरस तालुक्यातील एकूण ९७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावत १०० टक्के मतदानाची नोंद झाली.

उपविभागीय अधिकारी कार्यालयात तहसीलदार सुरेश शेजूळ यांच्या अध्यक्षतेखाली मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी मतदानाची गती मंद असली तरी दुपारपर्यंत सर्व मतदारांनी मतदान पूर्ण केले. अकलूज नगर परिषद, माळशिरस, नातेपुते व श्रीपूर-महाळुंग नगरपंचायत सदस्य तसेच जिल्हा परिषद सदस्यांनी मतदानात सहभाग घेतला.

दिवसभर विविध राजकीय गटांच्या मतदारांनी टप्प्याटप्प्याने मतदान केले. अकलूज नगर परिषदेच्या सदस्यांनी उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मतदान केले, तर आमदार उत्तमराव जानकर गट आणि भाजपचे मतदारही स्वतंत्रपणे मतदानासाठी दाखल झाले. यावेळी मतदान केंद्रावर भेट दिल्यानंतर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विरोधकांवर टीका करत, आमच्या अदृश्य शक्तीची ताकद निकालाच्या दिवशी दिसेल, असा दावा केला. हर हर महादेव ची घोषणा देत आम्ही शंभू महादेवाचा आशीर्वाद घेऊन मैदानात उतरलो आहे विरोधकांनी आत्तापासूनच धास्ती घेतली आहे आमचा विजय निश्चित असून वसंत नाना देशमुख नक्की गुलात उधळतील, असेही ते म्हणाले.

## महत्वाचे...



### सोलापूरचे चित्रकार डॉ.डग्लस जॉन, रामचंद्र खरटमल यांचा अयोध्यानगरीत कलाविष्कार

**सोलापूर, दि. १८ जून-**

अ.भा. कलर्स ऑफ अयोध्या या कला शिबिरात सोलापूरचे ज्येष्ठ चित्रकारद्वार डॉ.डग्लस जॉन, रामचंद्र खरटमल यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत अयोध्या, प्रभू श्रीराम आणि भारतीय सांस्कृतिक वारसा आदी कलाकृती सादर केल्या. डॉ.डग्लस जॉन यांनी सुमारे दोन दशकांपूर्वी त्यांनी पाहिलेल्या अयोध्येचे चित्र रेखाटले. अयोध्या ही केवळ धार्मिक नगरी नसून तिचे अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक पैलू आहेत. चित्रकार रामचंद्र खरटमल यांनी एका चित्रातून अयोध्या आणि कोरिया यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचे चित्रण तर दुसऱ्या कलाकृतीत प्रभू श्रीरामांच्या अयोध्या नगरीचे वास्तववादी दर्शन घडवले.

### संत निरंकारी मिशनच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

**सोलापूर, दि. १८ जून-**

मानव एकता दिनानिमित्त सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज, निरंकारी राजपिता रमितजी यांच्या कृपाशीर्वादाने संत निरंकारी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवार, दि.२१ जून २०२२४ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत कुमठा नाका परिसरातील अंत्रोळीकर नगर येथील संत निरंकारी सत्संग भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. तरी सोलापुरकरांनी या शिबीरात सहभाग होऊन रक्तदान करावे, असे आवाहन क्षेत्रिय प्रभारी इंद्रपालसिंह नागपालजी यांनी एका पत्रकान्वये केले आहे.

### घरगुती तक्रारीत कीटकनाशक पिऊन वृध्दाची आत्महत्या

**सोलापूर, दि.१८ जून-**

घरगुती तक्रारीत एका वृध्दाने कीटकनाशक पिऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी गावात घडली. दाऊद आमीन नदाफ (वय-६९) असे त्या वृध्दाचे नाव आहे. बुधवारी संध्याकाळच्या सुमारास घरगुती तक्रार झाल्याने त्या रागाच्या भरात त्यांनी कीटकनाशक औषध पिले होते. त्याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना कुंभारी येथील अश्विनी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारार्थ पत्नी मैमुना नदाफ यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### मतदानासाठी सहा केंद्रांवर व्यवस्था

**सोलापूर, दि.१८ जून-**

सोलापूर जिल्ह्यात कुर्डूवाडी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा आणि अकलूज येथे मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींचे एकूण ६०० हून अधिक मतदार या निवडणुकीत मतदानासाठी पात्र होते.

# जनमेजयराजे भोसले यांची पोद्दार इंटरनॅशनल स्कुलला भेट

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १८ जून-**

येथील जेऊर रस्त्यावर नव्याने सुरुवात झालेल्या पोद्दार इंटरनॅशनल स्कूलला श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी भेट देऊन पाहणी करुन समाधान व्यक्त केले.

दरम्यान पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे संचालक नागनाथ सुरवसे यांनी जन्ममेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांचे स्वागत केले. यांप्रसंगी अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, स्कूलच्या मुख्याध्यापिका




अंजलीताई पडवळकर, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले,कु.हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, रोहन लेंगडे, रोहित खोबरे, प्रा.सायबन्ना जाधव सर, शिवराज स्वामी, महांतेश स्वामी,असद फुलारी आदिजण उपस्थित होते.

### चारचाकी डिव्हायडरला धडकून जखमी झालेल्या चालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

चारचाकी डिव्हायडरला धडकून जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला. पोपट दत्तू सूर्यवंशी (वय-३७, रा.उंदरगाव, ता.लोहारा, जि.धाराशिव) असे मयत तरुणाचे नाव आहे. ४ जून रोजी तो चारचाकीद्वारे पुण्याहून



उंदरगावकडे येत असताना इंदापूर येथील ब्रिजवर नियंत्रण सुटल्याने चारचाकी डिव्हायडरला धडकली होती. यात तो गंभीर जखमी झाला. खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन वडील दत्तू सूर्यवंशी यांनी पुढील उपचारार्थ शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरु असताना बुधवार, दि.१७ जून रोजी त्याचा मृत्यू झाल

# 'भाजपा'चे दमदार शक्तिप्रदर्शन; महापालिका व बार्शी नगरपरिषदेतील सदस्यांची शिस्तबध्द उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी उत्तर सोलापूर तहसील कार्यालयाच्या मतदान केंद्रावर महापालिकेतील भाजप नगरसेवक व बार्शी नगरपरिषदेतील राऊत गटाच्या नगरसेवकांनी प्रचंड मोठे शक्तिप्रदर्शन करीत मतदान केले. सुरूवातीला सकाळी बार्शीकरांनी तर त्यापाठोपाठ महापालिका नगरसेवकांनी मतदानाचा हक्क बजावला.

या केंद्रावर महापालिकेतील स्वीकृतसह १११ नगरसेवकांबरोबरच बार्शी नगरपरिषदेतील ४७ नगरसेवक, जिल्हा परिषदेचे ६ सदस्य व १ पंचायत समिती सभापती, वैराग नगरपंचायतीतील १९ सदस्य, उत्तर सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेचे ३ सदस्य व १ पंचायत समिती सभापती अशा एकूण १८८ जणांचे मतदान होते. नगरसेवक दत्तात्रय नडगिरे यांचे निधन झाल्याने व रुद्रेश बोरामणी हे परदेशात असल्याने त्यांचे मतदान झाले नाही.

सकाळी सर्वप्रथम भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आणि महापौर विनायक कोंड्याल यांनी गांधी नगर येथील हेरिटेज येथे नगरसेवकांची बैठक घेतली. त्यानंतर येथेच अल्पोपहार करून सर्व नगरसेवकांनी एकत्रितरित्या शिस्तबद्ध पद्धतीने मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. आमदार देवेंद्र कोठे यांनी मतदारांचे आभार मानले. यावेळी माजी आमदार दिलीप माने उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावरील विरोधातून खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून ही निवडणूक लढविली. भाजप हा शिस्तीचा पक्ष असून कार्यकर्त्यांनी संघटितपणे मतदान केले आहे. पालकमंत्री गोरे यांनी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे अंतिम निकाल २२ जून रोजी जनतेसमोर येईल, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

# बाजार समिती यूजर चार्जेस समितीच्या सदस्यपदी दिलीप माने यांची निवड

## २५ जून रोजी होणार समितीची पहिली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून**

राज्य शासनाच्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी यूजर चार्जेस आकारणी बाबत गठीत केलेल्या समितीमध्ये पुणे महसुली विभागातील श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार दिलीपराव माने यांची सदस्य पदावर निवड करण्यात आली. या समितीची पहिली बैठक पुणे येथे २५ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे.



महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ८ दि.२८ मार्च २०२२ अन्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३१ मध्ये दुरुस्ती करून कलम १३अ नव्याने समाविष्ट करून बाजार समितीचे क्षेत्रात ज्या ठिकाणी व्यापारासाठी जागा उपलब्ध करून दिलेली आहे व त्या ठिकाणी व्यापारासाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्या ठिकाणी होत असलेल्या अनुसूचिमध्ये नसलेल्या शेतमालाचे व अकृषीक मालाचे व्यापारावर यूजर चार्जेस आकारणीबाबत शासनाने बाजार समित्यांना अधिकार प्रदान केलेला आहेत.

राज्याचे पणन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली ९ जून रोजी झालेल्या बैठकीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे यूजर चार्जेस आकारणी बाबत समिती गठीत करण्याचे ठरले त्यानुसार स्थापन झालेल्या समितीमध्ये पुणे महसुली विभागातून श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा माजी आमदार दिलीपराव माने यांची सदस्य पदावर निवड करण्यात आली. या समितीची पहिली सभा गुरुवार २५ जून २०२६ रोजी दुपारी ३ वाजता पुणे येथे पणन संचालक यांचे दालनात आयोजित केली असल्याचे पणन संचालक शरद जरे यांनी सांगितले आहे.



# बाधित मिळकतधारकांना आता ऑनलाईन मिळणार हस्तांतरणीय विकास हक्क

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

शहरातील नागरी सेवा अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. खासगी मिळकतधारकांना बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात देण्यात येणाऱ्या हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) प्रमाणपत्रांचे वितरण बीपीएमएस (Building Permission Management System) पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आले आहे.

या उपक्रमाअंतर्गत मिळकतधारक मल्लिकार्जून शिवशरण शेगावकर आणि विश्वनाथ शेगावकर यांना आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या हस्ते ऑनलाईन टीडीआर प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात संबंधित मिळकतधारकांना नियमानुसार हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान करण्यात आला आहे. हे पहिले ऑनलाईन टीडीआर प्रकरण पूर्ण करण्यासाठी उपसंचालक झगडे, सहायक संचालक शितोळे, कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांचे मार्गदर्शन लाभले. कनिष्ठ अभियंता सलमान मनियार आणि रोहित हारके यांनी तांत्रिक व प्रशासकीय स्तरावरील कार्यवाही पूर्ण केली.

### मिळकतधारकांच्या कार्यालयीन फेऱ्या कमी होतील

यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले, महापालिकेच्या सेवा अधिक पारदर्शक, वेगवान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. टीडीआर प्रक्रियेचे ऑनलाईनकरण हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. यामुळे मिळकतधारकांच्या कार्यालयीन फेऱ्या कमी होतील, प्रक्रियेला गती मिळेल आणि संपूर्ण कार्यवाही अधिक पारदर्शक होईल. भविष्यातही महापालिकेच्या विविध सेवांचे डिजिटायझेशन करून नागरिकांना अधिक सुलभ सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

# सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून महाराष्ट्र विधान परिषदेसाठी निवडणूक-२०२६

| अ. क्र. | मतदान केंद्र क्रमांक | ठिकाण | मतदान केंद्रास जोडलेले मतदार | | | सकाळी ८.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | मतदान केलेले मतदार | | | टक्केवारी | | |
| | | | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण |
| १ | ००१ | कुर्डुवाडी | ३२ | ४८ | ८० | ३२ | ४८ | ८० | १००.०० | १००.०० | १००.०० |
| २ | ००२ | उत्तर सोलापूर | ९४ | ९४ | १८८ | ९२ | ९४ | १८६ | ९७.८७ | १००.०० | ९८.९४ |
| ३ | ००३ | दक्षिण सोलापूर | ४७ | ४२ | ८९ | ४७ | ४२ | ८९ | १००.०० | १००.०० | १००,०० |
| ४ | ००४ | पंढरपूर | ५४ | ४६ | १०० | ५४ | ४६ | १०० | १००.०० | १००.०० | १००.०० |
| ५ | ००५ | मंगळवेढा | ३१ | ३१ | ६२ | ३१ | ३१ | ६२ | १००.०० | १००.०० | १००.०० |
| ६ | ००६ | अकलूज | ५० | ४७ | ९७ | ५० | ४७ | ९७ | १००.०० | १००.०० | १००.०० |
| एकूण | | | ३०८ | ३०८ | ६१६ | ३०६ | ३०८ | ६१४ | ९९.३५ | १००.०० | ९९.६८ |

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजाभवानी मंदिरास भाविकेकडून एक लाखांची देणगी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जून -**

छत्रपती संभाजीनगर येथील श्री तुळजाभवानी देवींच्या निस्सीम भक्त मालती खानापूरकर यांनी आज श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी एक लाख रुपयांची देणगी अर्पण केली.

मालती खानापूरकर या आपला मुलगा व मुलीसह आज सकाळी श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आल्या



होत्या. यावेळी त्यांनी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानकडे एक लाख रुपयांची देणगी सुपूर्द केली.

मंदिर संस्थानच्या वतीने अप्पर जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामोरे यांनी मालती खानापूरकर व त्यांच्या कुटुंबीयांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा आणि महावस्त्र भेट देऊन यथोचित सन्मान केला. या प्रसंगी मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### स्व. विमलताई पवार स्मृतीप्रित्यर्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**कळंब, १८ जून -**

कळंब तालुक्यातील जवळा खुर्द येथील पीएम श्री जि.प.प्रा. शाळेत स्व. विमलताई बाळासाहेब पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शुक्रवारी शैक्षणिक साहित्य वाटप सोहळा उत्साहात पार पडला. शिक्षणासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधार मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. स्व. विमलताईंचे चिरंजीव व्यंकट पवार यांनी संपूर्ण साहित्याचे प्रायोजन केले. कळंब पं.स.चे माजी सभापती गुणवंत पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, चित्रकला साहित्य व गणवेशाचे वाटप करण्यात आले. शाळा परिसर फुगे व रंगीबेरंगी फुलांनी सजविण्यात आला होता. साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद विशेष लक्षवेधी ठरला. या उपक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक व पालकांनी मोठा प्रतिसाद दिला. शाळेचे मुख्याध्यापक कदम यांनी पवार परिवाराच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, विद्यार्थ्यांना साहित्याबरोबरच स्वप्न पाहण्याची प्रेरणा मिळाली आहे, असे सांगितले.



### नळदुर्ग येथे महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

**नळदुर्ग, १८ जून -**

नळदुर्ग येथे दि.१७ जून रोजी राजपुत समाज संघटनेच्या वतीने हिंदू कुलसूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने माऊली नगर परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विलास येडगे, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार आणि होर्टी येथील भाजपचे महादेव पाटील यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पद्माकर घोडके, रघुनाथ नागणे, संजय जाधव, अमर भाळे, उत्तम बनजगोळे, बंडप्पा कसेकर, सुधीरसिंह हजारी, मनीषसिंह हजारी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यालयीन अधीक्षक अजय काकडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी नगरपालिकेचे कर्मचारी व राजपुत समाज संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



### तांदुळवाडी शाळेत प्रवेशोत्सव; बैलगाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक

**कळंब, १८ जून -**

कळंब तालुक्यातील तांदुळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव क्रमांक दोन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पूजा तुषार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. इयत्ता पहिलीच्या प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची सजवलेल्या बैलगाडीतून गावातून आकर्षक मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पुष्पहार, टोपी आणि फुग्यांनी सजविण्यात आले होते. तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव व नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही सरपंच ॲड. प्रणित डिकले यांनी दिली. कार्यक्रमास पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.



### पद्मश्री शंकर बापू विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

**कळंब, १८ जून -**

कळंब तालुक्यातील हासेगाव (के) येथील पद्मश्री शंकर बापू माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती राजश्रीताई वरपे होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक परमेश्वर पालकर यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार दत्तात्रय कोल्हे यांनी मानले.

## स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत ९९.४९ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जून -**



उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक विधानपरिषद निवडणुकीसाठी बुधवारी (दि. १८ जून) सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेदरम्यान शांततापूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत एकूण ९८८ मतदारांपैकी तब्बल ९८३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत ९९.४९ टक्के मतदानाची विक्रमी नोंद केली.

निवडणुकीसाठी धाराशिव, लातूर आणि बीड या तीन जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य मतदार म्हणून पात्र होते. मतदानासाठी तीनही जिल्ह्यांमध्ये एकूण २९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये धाराशिव जिल्ह्यात ८, लातूर जिल्ह्यात १० आणि बीड जिल्ह्यात ११ मतदान केंद्रांचा समावेश होता. सर्व मतदान केंद्रे संबंधित तहसील कार्यालयांमध्ये स्थापन करण्यात आली होती. मतदान प्रक्रियेदरम्यान बहुतांश केंद्रांवर शंभर टक्के मतदानाची नोंद झाली.

मात्र लातूर तहसील महसूल हॉल येथे ८८ पैकी ८३ मतदारांनी मतदान केले असून पाच मतदार गैरहजर राहिल्याची नोंद झाली. यामुळे एकूण मतदानाचा टक्का ९९.४९ इतका राहिला. एकूण मतदान करणाऱ्या ९८३ मतदारांमध्ये ४९० महिला व ४९३ पुरुष मतदारांचा समावेश होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविला.




मतदारसंख्येच्या जिल्हानिहाय आकडेवारीनुसार, धाराशिव जिल्हा परिषदेचे ६३ सदस्य मतदार असून त्यामध्ये २७ पुरुष व ३६ महिला सदस्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील दोन नगरपंचायती व आठ नगरपालिकांमधील एकूण २५४ मतदारांमध्ये १३७ पुरुष व ११७ महिला सदस्य आहेत.लातूर जिल्हा परिषदेचे ६९ सदस्य मतदार असून त्यामध्ये ३२ पुरुष व ३७ महिला सदस्य आहेत.

तसेच पाच नगरपंचायती, चार नगरपालिका आणि लातूर महानगरपालिकेतील एकूण ३०२ मतदारांमध्ये १५७ पुरुष व १४५ महिला सदस्यांचा समावेश आहे. यामध्ये लातूर महानगरपालिकेचे ७७ मतदार असून त्यात ४१ पुरुष व ३६ महिला सदस्य आहेत.बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती व सहा नगरपालिकांमधील एकूण ३०४ मतदारांमध्ये १५० पुरुष व १५४ महिला सदस्यांचा समावेश आहे.

अत्यंत चुरशीची ठरत असलेल्या या निवडणुकीत विक्रमी मतदान झाल्याने निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असून मतमोजणीनंतरच मतदारांचा कौल स्पष्ट होणार आहे.


## भुममध्ये कत्तलीसाठी बांधलेल्या ९ गोवंशीय जनावरांची सुटका

### एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ जून -**

भुम येथील हाडळ परिसरात कत्तलीच्या उद्देशाने निर्दयपणे बांधून ठेवण्यात आलेल्या ९ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून सुटका केली. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार हाडळ परिसरातील एका शेतात छापा टाकण्यात आला. यावेळी चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता



आखूड दोरीने बांधलेली ५ जर्सी गायी, २ कालवडी, १ गिर गाय आणि १ खिल्लार अशा एकूण ९ जनावरांची सुटका करण्यात आली. या जनावरांची अंदाजे किंमत १ लाख २० हजार रुपये असून त्यांना भुम पोलीस ठाण्यात आणण्यात आले. या प्रकरणी मुस्तफा कुरेशी (रा. भुम) याच्याविरुद्ध भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## व्हीआयपी पास वाटप प्रकरणाची चौकशीचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जून -**

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील व्हीआयपी आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठीच्या दर्शन पासचे नियमबाह्य पद्धतीने वाटप करून संस्थानचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

माहिती अधिकार सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी



संबंधित तक्रार व पुरावे सादर करून या प्रकरणाचा पाठपुरावा केला होता. या तक्रारीची दखल घेत मंदिर व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांनी लेखाधिकारी यांना संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश दिले आहेत.

नियमबाह्य पास वाटपामुळे मंदिर संस्थानला आर्थिक फटका बसल्याचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## तेरखेडची १३ कोटींची जलयोजना रखडली; ठेकेदार तयार, मग अडथळा नेमका कुठे?

**दोन वर्षांपासून काम संथ; अधिकारी सांगतात स्थानिकांचा विरोध...**

**तर ठेकेदारांचे काम सुरू करण्याची तयारी असल्याचा दावा...**

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.१८ जून -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा गावासाठी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेली सुमारे १३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना गेल्या दोन वर्षांपासून रखडल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेची कामे काही ठिकाणी झाली असली तरी अद्याप पूर्णत्वास गेलेली नाहीत. योजनेअंतर्गत गावातील विविध भागांमध्ये पाईपलाईन टाकण्यात आली, रस्ते खोदण्यात आले, तर कडकनाथवाडी येथील साठवण तलाव क्रमांक २ मधून तेरखेडा गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी मुख्य जलवाहिनीचे कामही सुरू करण्यात आले होते. मात्र मागील दोन वर्षांपासून या कामाची गती मंदावली असून काही भागांमध्ये काम पूर्णपणे थांबल्याचे दिसून येत आहे.



याबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू असताना संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी, कडकनाथवाडी परिसरातील काही स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे कामात अडथळे निर्माण झाले आहेत.

त्यामुळे काही काळ काम बंद ठेवावे लागले. संबंधित प्रश्न मार्गी लागल्यानंतर काम पुन्हा सुरू करण्यात येईल, असे सांगितले.

दरम्यान, संबंधित ठेकेदारांशी संपर्क साधला असता त्यांनी वेगळी भूमिका मांडली. निधी असो किंवा नसो, आम्ही काम करण्यास तयार आहोत. आमच्याकडून कोणतीही अडचण नाही.

संबंधित स्तरावरील प्रश्न सुटल्यास काम तात्काळ सुरू करता येईल, असे ठेकेदारांनी सांगितले. अधिकारी आणि ठेकेदार यांच्या विधानांमुळे योजनेच्या रखडलेल्या कामाबाबत नेमकी अडचण कोणती, याबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. दोन वर्षांचा कालावधी उलटूनही योजना पूर्ण झाली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कोट्यवधी रुपयांची योजना मंजूर होऊन काम सुरू झाले, परंतु आजही अनेक नागरिक स्वच्छ व नियमित पाणीपुरवठ्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे रखडलेल्या कामाचा तिढा सोडवून योजना तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अधिकारी स्थानिक विरोधाचे कारण सांगत आहेत, तर ठेकेदार काम करण्यास तयार असल्याचा दावा करत आहेत.

अशा परिस्थितीत दोन वर्षांपासून रखडलेल्या १३ कोटींच्या जलयोजनेचा मार्ग मोकळा नेमका कधी होणार आणि तेरखेडकरांच्या घराघरात स्वच्छ पिण्याचे पाणी कधी पोहोचणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहे.

## रुग्णालयातील कॉट न सोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**धाराशिव, दि.१८ जून -**

येथील शासकीय रुग्णालयातील उपचार पूर्ण होऊनही आपत्कालीन कक्षातील कॉट रिकामा न केल्याने आणि शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दत्ता ताकपिरे (रा. धाराशिव) हे २८ मार्च पासून शासकीय रुग्णालयातील आपत्कालीन कक्ष क्र.२ मध्ये उपचार घेत होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचार पूर्ण झाल्यानंतर त्यांना डिस्चार्ज दिला होता. मात्र, सुट्टी मिळूनही त्यांनी कॉट रिकामा केला नसल्याने शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाल्याची तक्रार करण्यात आली.

## एनसीएमसी कार्ड नोंदणीतील गैरसोय दूर करण्याची मागणी

**ॲड. अजित गुंड पाटील यांचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जून -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत सवलतीच्या प्रवासाचा लाभ घेणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच इतर सवलतधारक प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड हे १ ऑगस्टपासून बंधनकारक करण्यात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात कार्ड नोंदणी प्रक्रियेदरम्यान नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचा मुद्दा पुढे आला आहे.



या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी रुपामाता फाऊंडेशनचे सचिव ॲड. अजित गुंड पाटील यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना त्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, एनसीएमसी कार्ड नोंदणीसाठी जिल्ह्यातील उपलब्ध केंद्रांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, केंद्रांची संख्या अपुरी पडत आहे. १ ऑगस्टपूर्वी सर्व पात्र सवलतधारक प्रवाशांकडे एनसीएमसी कार्ड उपलब्ध होणे आवश्यक असल्याने नोंदणी प्रक्रियेला अधिक गती देण्याची गरज असल्याचे ॲड. गुंड पाटील यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ॲड. अजित गुंड पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## परंड्याच्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखाधिकारी चौधरी यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ जून -**

परंडा येथील महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखेत शाखा अधिकारी म्हणून श्री चौधरी आणि लिपिक म्हणून हजारे मॅडम यांनी नुकताच पदभार स्वीकारला. यानिमित्त रामेश्वर सद्गुरू सहकारी संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले.

समाज गौरव पुरस्कर्ते व सामाजिक कार्यकर्ते सुनील भाऊ पवार भोत्रेकर यांनी दोघांचे स्वागत करत नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी आनंद विभुते, ज्ञानेश्वर काकाडे, आनंद बनसोडे व संदीप बनसोडे उपस्थित होते.

श्री चौधरी यांची बँकिंग क्षेत्रात कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळख असून त्यांनी विविध शाखांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून खातेदारांना उत्कृष्ट सेवा व विश्वासार्ह सुविधा उपलब्ध करून देण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कळंबमध्ये अवैध हातभट्ट्यांवर पहाटेच धाड; १.०४ लाखांचा मुद्देमाल नष्ट




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ जून -**

कळंब शहरात पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करत अवैध गावठी दारू निर्मिती करणाऱ्या हातभट्ट्यांवर पहाटेच धाड टाकली. या कारवाईत पाच अड्ड्यांवर छापे मारून एकूण पाच गुन्हे दाखल करण्यात आले.

कारवाईदरम्यान आरोपींकडून १२० लिटर गावठी दारू, २ हजार ६०० लिटर गुळमिश्रित रसायन तसेच इतर साहित्य असा एकूण १ लाख ४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला.

ही संयुक्त कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पाकनि. शकील शेख व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पोनि. हरीभाऊ लांडे यांच्या पथकाने केली.

## पोपट सुर्यवंशी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ जून -**

लोहारा तालुक्यातील उंडरगाव येथील पोपट (उर्फ) विजय दत्तात्रय सुर्यवंशी यांचे अपघाती निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



उंडरगाव येथील रहिवासी पोपट दत्तात्रय सुर्यवंशी (वय ३५) यांचे १७ जून रोजी रात्री उपचारा दरम्यान निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, आजी, आजोबा असा परिवार असुन अनेकांच्या उपस्थितीत उंडरगाव येथील स्मशानभूमीत १८ रोजी सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

## निकिता कांबळे यांना वनस्पतीशास्त्र विषयात पीएचडी पदवी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जून -**

नळदुर्ग येथील निकिता राजेश कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून वनस्पतीशास्त्र विषयात पीएचडी पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ. उद्धव भाले यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले.



निकिता कांबळे यांनी स्टडीज ऑन अरबसकुलार मायकोरायझल फनजाय असोसिएटेड विथ वाइल्ड लीफी व्हेजिटेबल फ्रॉम अमेरन्थेसी फॅमिली या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांचे संशोधन शेतीमधील पीक उत्पादन वाढीसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले जात आहे.

त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून अभिनंदन होत असून बालाघाट शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

# कपड्याच्या दुकानासाठी 10 लाखांची मागणी; अंबाजोगाईत विवाहितेचा छळ

## सासरच्या चौघांवर गुन्हा दाखल !

**अंबाजोगाई :** लग्नात १५ लाख रुपये खर्च करूनही “मनासारखा मानपान दिला नाही" म्हणून आणि कपड्याचे दुकान टाकण्यासाठी माहेरहून १० लाख रुपये घेऊन ये, या मागणीसाठी मुस्लिम विवाहितेचा अमानुष छळ केल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाईत उघडकीस आली आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या ४ जणांवर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

*संसार वाचवण्याचे सर्व प्रयत्न अपयशी हे प्रकरण गेल्या ६ महिन्यांपासून सुरू होते. पीडित महिला सिमा आक्रम शेख (वय २२) हिचा संसार तुटण्यापासून वाचवण्यासाठी तिचे कायदेशीर सल्लागार ॲड. पुरुषोत्तम दहिवाडे यांनी मोठे प्रयत्न केले होते त्यांच्याच सल्ल्याने होते. त्यांच्याच सल्ल्याने हा वाद सामोपचाराने मिटावा म्हणून 'भरोसा सेल' मध्येही मध्यस्थी करण्यात आली. मात्र, सासरच्या मंडळींचा कमालीचा आडमुठेपणा (हटधर्मी) आणि क्रूरतेमुळे समेटाचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. १० लाख रुपये आणण्यास नकार दिला म्हणून पती आक्रम याने

पीडितेला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच सासू-सासऱ्यांनी "पैसे आणले नाही तर तलाक देऊन मुलाचे दुसरे लग्न लावून देऊ” अशी धमकी दिली. अखेर २९ मे २०२६ रोजी विवाहितेची अब्रू वेशीवर टांगून तिला घरातून हाकलून देण्यात आले.

पीडितेच्या तक्रारीवरून पती आक्रम आस्लम शेख, सासू रुक्कय्या आस्लम शेख, सासरे अस्लम शेख आणि आस्लम शेख आणि दीर मुकरम अस्लम शेख (सर्व रा. गुरुवार पेठ अंबाजोगाई यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ११५ (२),३(५), ३५१(२), ३५२ आणि ८५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुक्मीन खंडू पाचपिंडे करत आहेत. समाजात अशा हुंडापिसाट प्रवृत्तीमुळे आणखी कोणत्या मुलीचे आयुष्य उद्धस्त होऊ नये, म्हणून नराधमांवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

# नरेंद्र मोदींनी देशात 12 वर्षांत रामराज्याची संकल्पना साकारली — शंकर देशमुख

**बीड, प्रतिनिधी :** बीड येथील सोमेश्वर महादेव मंदिरात सुरू असलेल्या शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज रामायण पारायणाच्या पावन प्रसंगी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची सलग १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल भगवान श्रीरामचंद्रांचे विशेष पूजन व महाआरती करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदी यांच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि राष्ट्रसेवेच्या संकल्पांना अधिक बळ प्राप्त व्हावे, अशी प्रार्थना श्रीराम चरणी करण्यात आली.



यावेळी बोलताना भारतीय जनता पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारताने विकास, सुशासन, राष्ट्रीय सुरक्षा, गरीब कल्याण आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती साधली आहे. प्रभू श्रीरामांच्या आदर्शांवर आधारित रामराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मोदी यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.”

देशमुख म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, पीएम किसान सन्मान निधी, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांमुळे कोट्यवधी गरीब, शेतकरी, महिला आणि वंचित घटकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडले आहे. तर दुसरीकडे राम मंदिर उभारणी, काशी विश्वनाथ धाम, महाकाल लोक आणि भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी घेतलेले निर्णय हे देशाच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ देणारे ठरले आहेत.

“जागतिक पातळीवर भारताचा सन्मान वाढविणे, आत्मनिर्भर भारताचा पाया मजबूत करणे, पायाभूत सुविधांचा विक्रमी विकास, डिजिटल क्रांती आणि जनतेला केंद्रस्थानी ठेवून राबविलेल्या योजनांमुळे मोदी यांचे नेतृत्व देशासाठी प्रेरणादायी ठरले आहे,” असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी उपस्थित भाविकांसमोर मोदी यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध जनकल्याणकारी, विकासाभिमुख आणि राष्ट्रहिताच्या उपक्रमांचा आढावा सादर करण्यात आला. तसेच प्रभू श्रीरामांची कृपा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारत राष्ट्रावर सदैव राहो, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

याप्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथआण्णा शिराळे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, ज्येष्ठ नेते प्रा. देविदास नागरगोजे, पत्रकार प्रमोद पुसरेकर, राजेंद्र चरखा यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# हिवरा पहाडी हायसकुलचे दोन विद्यार्थी अचानक बेपत्ता



**बीड. प्रतीनिधी :** बीड तालुक्यातील हिवरापहाडी हायसकुल या शाळेचे ईतता दहावीच्या वर्गात शिक्षण घेणारे दोन विद्यार्थी बुधवारी शाळेला चाललोय म्हणून घराबाहेर पडली ति रात्री परत आलीच नाही घरच्यांनी इतर चोहिकडे शोधून पता लागला नाही म्हणु मुले हारवलयाची तक्रार पिंपळनेर पोलिस ठाण्यात पालकांनी दिली आहे या बदल अधिक माहिती अशी की बीड तालुक्यातील हिवरा पहाडी हायस्कूल मध्ये इतता दहावी घ्या वर्गात शिक्षण घेत आसणारया दोन विद्यार्थी बुधवारी सकाळी शाळेत जातोय असे सांगून घराबाहेर पडली परंतु हि विद्यार्थी संध्याकाळ पर्यंत परत आलीच नाही म्हणून घरच्यांनी शोधाशोध घेतला परंतु पत्ताच लागला नसल्याने रितेश जालिंदर आगलावे व विनायक भगवान आगलावे रा हिवरा पहाडी हे दोन विद्यार्थी बेपत्ता असल्याची तक्रार पालकांनी पिंपळनेर पोलिस ठाण्यात दिली आहे

# सीए परिक्षेत कु.स्नेहल खटोडचे यश

**बीड :** जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर शहरातील वै.आसाराम खटोड यांची नात कु. स्नेहल शोभा आनंद खटोड हिने वर्ष २०२५-२६ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, अवघ्या तीन महिन्यांपूर्वीच स्नेहलची लहान बहीण कु. सेजल आनंद खटोड हिने देखील पहिल्याच प्रयत्नात 'सीए' परीक्षेत यश मिळवले होते. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक झाले.

स्नेहल आणि सेजल या दोन्ही भगिनींनी इयत्ता पहिलीपासून ते थेट पदवीपर्यंत आणि त्यानंतर सीएच्या अंतिम टप्प्यापर्यंतचे सर्व शिक्षण कोणत्याही खाजगी शिकवणी वर्गाशिवाय पूर्ण केले. केवळ 'स्वयं अध्ययन', नियमित सराव आणि वेळेचे नियोजन यांच्या बळावर त्यांनी हे उत्तुंग शिखर सर केले. दोन्ही मुलींनी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'सीए' परीक्षेत मिळवलेल्या या यशाबद्दल बीड शहरातील रतनलाल नहार तसेच गौतम खटोड व सर्व खटोड परिवारासह तिचे नातेवाईक, मित्रपरिवारासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी दोन्ही भगिनींचे अभिनंदन केले आहे.

# बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची नांदेडला बदली

बीड — बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या बदलीचे आदेश शासनाने बुधवारी जारी केले. शहरात सध्या सुरू असलेल्या अतिक्रमण हटाओ मोहिमेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या अचानक बदलीची बीड शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

शैलेश फडसे यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी म्हणून पदभार स्वीकारला तेव्हा नगरपालिकेतील लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपलेला होता. त्यामुळे काही काळ नगरपालिकेचा संपूर्ण कारभार प्रशासनाच्या माध्यमातून चालत होता. या काळात मुख्याधिकाऱ्यांच्या विविध निर्णयांवर अनेकदा आक्षेप घेतले गेले होते.

मुख्याधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील समन्वयाचा अभाव देखील चर्चेचा विषय ठरला होता. त्यानंतर नगरपालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर सौ. प्रेमलता पारवे नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या. नव्या पदाधिकाऱ्यांसमोर प्रशासन समजून घेणे आणि शहरातील कामांना गती देणे हे मोठे आव्हान होते. नगरपालिकेने स्वच्छता, पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांच्या कामांना वेग दिल्यानंतर शहरातील अतिक्रमण हटाओ मोहीम हाती घेण्यात आली. नाल्यांची सफाई आणि शहरातील वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविणे गरजेचे असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, या मोहिमेच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवरून काही नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली होती. याच पार्श्वभूमीवर बुधवारी शासनाने मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या बदलीचे आदेश काढले. फडसे यांची बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदावरून सहआयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे बदली करण्यात आली आहे.

## स्वा.सावरकर महाविद्यालयात 'मन की शक्ती' ध्यान शिबिर

बीड (प्रतिनिधी) येथील सावरकर महाविद्यालयातील क्रीडा विभागाच्या वतीने दि. 15 जुन रोजी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण आरोग्य,मानसिक स्वास्थ्यासाठी "सेल्फ अवेकनिंग मिशन" अंतर्गत "मन की शक्ती" या एकदिवसीय ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात सेल्फ अवेकनिंग मिशनचे मार्गदर्शक संजीवजी मलिक (दिल्ली)यांनी उपस्थितांना ध्यान, सकारात्मक विचार,तणाव व्यवस्थापन, प्रभावी संवाद कौशल्य, भावनिक संतुलन आणि आत्मजागरूकता याविषयी मार्गदर्शन केले. विविध सकारात्मक प्रतिज्ञा ध्यान, मुद्रा, मंत्र उच्चारण या प्रक्रियांच्या माध्यमातून मानसिक शांतता,आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढविण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. यावेळी स्वा.सावरकर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ.पी. के. कुलकर्णीजी कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.याप्रसंगी कर्मचारी कल्याण मानसिक आरोग्य आणि सकारात्मक कार्य संस्कृती निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे अशी त्यांनी नमूद केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सुहासजी मोराळे, उपप्राचार्य द्वय डॉ. लक्ष्मीकांतजी बाहेगव्हाणकर, डॉ. रमेशजी खंडागळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी शिबिरातील मार्गदर्शन उपयुक्त व प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय उपप्रचार्य प्रो.डॉ. बाहेगव्हाणकर यांनी तर ऋणनिर्देश क्रीडा विभाग संचालक डॉ. छत्रपती पांगरकर यांनी केले.

## प्राध्यापकांनी संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज : प्रा. डॉ. महेंद्र शिरसाट

# तुलसी शैक्षणिक समूहात सेवापूर्ती गौरव समारंभ उत्साहात संपन्न

**बीड (प्रतिनिधी) :** प्राध्यापकांनी केवळ वर्गात अध्यापन करण्यापुरते मर्यादित न राहता संशोधनाकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज बनली आहे. संशोधनातूनच नवीन ज्ञानाची निर्मिती होते आणि समाजाच्या प्रगतीला दिशा मिळते, असे मत जेष्ठ प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रो. डॉ. महेंद्र शिरसाट यांनी व्यक्त केले.




तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने शनिवार, दि. १३ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या त्यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. उत्तम साळवे, प्रो. डॉ. मनोहर शिरसाट, प्रा. अर्जुन राठोड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. महेंद्र शिरसाट म्हणाले की, जीवनात तत्त्वांशी कधीही तडजोड करू नका, महामानवांचे विचार आचरणात आणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव जपा, आपण ज्या समाजातून घडतो त्या समाजासाठी काहीतरी परत देण्याची भावना प्रत्येकामध्ये असली पाहिजे. असा प्रेरणादायी संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आई-वडिलांप्रमाणे भूमिका निभावावी, असे ते म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. मनोहर शिरसाट म्हणाले की, प्रा. डॉ. महेंद्र शिरसाठ यांनी आयुष्यभर तत्त्वांना कधीही सोडले नाही. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्यांनी अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक विकासाचे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ अनेक विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनाही झाला असून ते शिक्षण क्षेत्रातील प्रेरणेचे महत्त्वपूर्ण स्रोत आहेत.

प्रो. डॉ. उत्तम साळवे यांनी आपल्या भाषणात डॉ. शिरसाट यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे.

## श्री.संत नामदेव नगर (पूर्व) येथील श्री साई गणेश मंदिरात श्रीमद, भागवत कथेचे आयोजन

**बीड,(प्रतिनिधी,) :** श्री. संत नामदेव नगर येथील, श्री गणेश साई मंदिर मध्ये श्रीमद्भागवत कथेचे आयोजन दिनांक,22जून 2026सोमवार ते28जून2026शनिवार या सप्ताहामध्ये करण्यात आले असून ह.भ.प.कृष्णा महाराज नंदकुमार महाराज रामदासी यांच्या मधुर वाणीतून आपण कथामृत श्रवण करणार आहोत.तरी सर्व श्रोत्यांनी कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे,श्री रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळ आणि श्री संत जनाबाई महिला भजनी मंडळ यांनी आवाहन केले आहे.

दिनांक 22जून रोजी सोमवारी सकाळी ठीक साडे आठ वाजता शोभा यात्रा,कलश पूजन आणि श्रीमद् भागवत ग्रंथ मिरवणुकीचे आयोजन संत नामदेव नगर मध्ये करण्यात आले असून त्याच वेळी,श्री कृष्णा महाराज रामदासी यांच्या दर्शनाचा लाभ होणार आहे, कथेचे आयोजन दररोज दुपारी दोन ते पाच वेळेत केले आहे,सर्वांनी याचा लाभ घ्यावा असेश्री.रुक्मिणीकांत कृपा सांप्रदायिक वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री प्रभाकरराव कुलकर्णी, नूतन विद्यमान अध्यक्ष श्री सुरेश जोशी पारगावकर ,उपाध्यक्ष श्री देविदास डोळे,श्री प्रकाश मानुरकर,प्रा.डी.एस. कुलकर्णी,श्री,हरीभाऊ बुगदे ,श्री.बाळासाहेब पारगावकर,श्री मुकुंदराव खडके,श्री. कमलाकर मालेगावकर ,श्री. रामकृष्णपंतजोशी,. श्रीआर. डी.देशमुख,. श्री.राहुल कुलकर्णी सुर्डीकर, बाळासाहेब रत्नपारखी, कुमारराव देशमुख, अशोकराव ओपळकर, सुधीर,राऊतमारे, धनंजय लाखणगाव कर,श्री. अनिल टिकली,श्री किशन राव कुलकर्णी पिंपळवाडी कर,आणि संत नामदेव नगर मधील सर्व महिला पुरुष मंडळी यांनी आवाहन केले आहे....

# परळीतील युनिक क्युरियस किड्समध्ये नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात




**परली वैजनाथ (प्रतिनिधी) :-** येथील युनिक क्युरियस किड्स शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात शुक्रवार, दि. १२ जून रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी "फेरी इन द स्काय" या संकल्पनेवर आधारित आकर्षक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पूजा सचिन सारडा यांनी दिली आहे.

मुलींनी सुंदर परीचे पोशाख तर मुलांनी आकर्षक व पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. शाळेचा परिसर आकाशातील परीविश्वाप्रमाणे सजविण्यात आला होता. ढग, पंख, तारे आणि परीच्या संकल्पनेशी सुसंगत सजावटीमुळे विद्यार्थ्यांना आपण खरोखरच परींसोबत आकाशात उंच भरारी घेत आहोत, असा आनंददायी अनुभव मिळाला.

## राष्ट्रवादी (शप) शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सिकंदराबाद विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना सोपवले पत्र

# परळी रेल्वे प्रवाशांच्या आंदोलनाची खासदारांकडून दखल; रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना साकडे!

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग (बाप्पा) मनोहर सोनवणे यांनी परळी वैजनाथ रेल्वे टर्मिनसच्या विकासासाठी आणि प्रवाशांच्या दीर्घकालीन मागण्या पूर्ण करण्यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दक्षिण मध्य रेल्वे सिकंदराबाद विभागीय रेल्वे व्यवस्थापक आर. गोपालकृष्णन मार्फत पत्राद्वारे महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत.

८ जून रोजी परळी वैजनाथ येथे रेल्वे प्रवाशांनी केलेल्या 'एक दिवशीय धरणे आंदोलना'ची दखल घेत खासदारांनी हे पत्र लिहून रेल्वेमंत्र्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील, ज्येष्ठ नेते ॲड. जीवनराव देशमुख,गटनेते नितीन बागवाले,नगरसेवक कादर कुरेशी, कार्याध्यक्ष बदर भाई, श्रीनिवास राऊत, संघटक सद्दाम शेख, बाबा शेख, अरुण सपाटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर रेल्वे प्रवासी उपस्थित होते.



पत्रातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे;

* **मछलीपट्टनम-बिदर एक्सप्रेसचा परळीपर्यंत विस्तार** : २०२० मध्ये शिफारस केलेली ट्रेन क्र. १२७४९/१२७५० मछलीपट्टनम-बिदर एक्सप्रेस परळी वैजनाथपर्यंत वाढवण्याची मागणी अद्याप प्रलंबित आहे. हा विस्तार केल्यास हैदराबाद, विकाराबाद, बिदर, उदगीर, लातूर रोड आणि परळी वैजनाथ दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा होईल, तसेच हैदराबाद विमानतळाशी कनेक्टिव्हिटी सुधारेल. या विस्तारासाठी कोणत्याही इंजिन रिव्हर्सल किंवा ट्रेन नंबर बदलण्याची गरज भासणार नाही.

**कुंभमेळ्यासाठी विशेष रेल्वे गाड्या :** नाशिक येथे आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद, बिदर आणि कलबुरागी ते नाशिक रोड (परळी वैजनाथ मार्गे) अशा विशेष/अतिरिक्त रेल्वे फेऱ्या सुरू करण्यात याव्यात.

* **परळी टर्मिनसवर पिट लाईनची निर्मिती :** रेल्वे गाड्यांच्या देखभालीसाठी (Maintenance) आणि भविष्यातील रेल्वे विस्तारासाठी परळी वैजनाथ टर्मिनस येथे पिट लाईन (PIT Line) सुविधा मंजूर करून ती त्वरित उभारण्यात यावी.

खासदार बजरंग सोनवणे यांनी या मागण्या प्रवाशांच्या हिताच्या असून, रेल्वे मंत्रालयाने यावर सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी विनंती पत्रात केली आहे. या पत्राच्या प्रती रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि दक्षिण मध्य रेल्वेचे (SCR) महाव्यवस्थापक यांनाही आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

# अंबाजोगाईत आरटीओचा अजब कारभार!ATS सेंटर बंद,ऑनलाईन स्लॉट्सही लॉक; वाहन धारकांचे कोट्यवधींचे नुकसान

**अंबाजोगाई :** स्थानिक उप-प्रादेशिक परिवहन कार्यालय (RTO) अंतर्गत येणाऱ्या ६ तालुक्यांमधील हजारो व्यावसायिक वाहन धारकांवर सध्या आरटीओच्या एका चुकीच्या निर्णयामुळे आर्थिक संकट ओढवले आहे. येथील 'स्वयंचलित वाहन चाचणी केंद्र' (ATS - Automated Testing Station) अद्याप पूर्णपणे सुरू झालेले नसतानाही, परिवहन आयुक्त कार्यालयाने जुन्या पद्धतीने होणारे वाहन पासिंगचे ऑनलाईन स्लॉट्स बंद केले आहेत. त्यामुळे शेकडो वाहने जागेवरच अडकून पडली असून वाहन धारकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. या विरोधात 'वाहन मालक-चालक प्रतिनिधी संघटना, अंबाजोगाई'च्या वतीने उप-प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना नुकतेच एक जाहीर निवेदन देण्यात आले.

नेमकी समस्या काय आहे?

शासनाच्या नवीन धोरणानुसार, सर्व व्यावसायिक वाहनांचे वार्षिक योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate) आता आरटीओ ट्रॅकऐवजी खाजगी शासनमान्य 'एटीएस' (ATS) सेंटरमधून करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. अंबाजोगाई आरटीओ कार्यालयांतर्गत असे एटीएस सेंटर उभारण्यात आले असले, तरी काही तांत्रिक बाबी आणि अपूर्णतेमुळे हे सेंटर आजमितीस पूर्णपणे बंद आहे.

असे असतानाही, परिवहन आयुक्त कार्यालयाने अतिघाई करत दि. १२ जून २०२६ पासून अंबाजोगाई कार्यालयाच्या हद्दीतील वाहनांसाठी जुन्या पद्धतीने पासिंग करण्याच्या ऑनलाईन तारखा (Slots) मिळणे पूर्णपणे बंद केले आहे.

वाहन धारकांना दुहेरी भुर्दंड आणि दंड!

या तांत्रिक गोंधळामुळे गेल्या काही दिवसांपासून



अंबाजोगाई क्षेत्रातील एकाही व्यावसायिक वाहनाला फिटनेस सर्टिफिकेट मिळालेले नाही. ज्या वाहनांची मुदत संपली आहे, ती वाहने रस्त्यावर आणल्यास पोलिसांची व आरटीओची दंडात्मक कारवाई होते, त्यामुळे ही वाहने जागेवरच उभी आहेत. दुसरीकडे, सिस्टीममध्ये तारीख मिळत नसली, तरी मुदत संपल्यामुळे वाहन धारकांना दररोज ५० रुपये अतिरिक्त विलंब शुल्क (Fine) भरावा लागत आहे. प्रशासनाच्या चुकीमुळे वाहन धारकांना हा विनाकारण आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

१५० ते २०० किमी फिरून पासिंगचा सल्ला?

अंबाजोगाईचे केंद्र बंद असल्याने, येथील वाहन धारकांना शेजारच्या जिल्ह्यातील किंवा दुसऱ्या शहरातील एटीएस सेंटरवर जाऊन पासिंग करून घेण्यास सांगितले जात आहे. परंतु, येथून इतर सेंटर्सचे अंतर १५० ते २०० किलोमीटर आहे. सध्या डिझेलचे गगनाला भिडलेले भाव आणि मंदीची परिस्थिती पाहता, केवळ पासिंगसाठी एवढ्या दूर वाहन घेऊन जाणे आणि तिथे फेऱ्या मारणे परवडणारे नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया वाहन धारकांनी दिली आहे.

**तर तीव्र आंदोलन करणार:** संघटनेचा इशारा

जोपर्यंत अंबाजोगाई येथील स्थानिक एटीएस (ATS) सेंटर तांत्रिक त्रुटी दूर करून पूर्ण क्षमतेने सुरू होत नाही, तोपर्यंत पूर्वीच्याच पद्धतीने आरटीओ ट्रॅकवर वाहनांची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र देण्याच्या तारखा (Slots) तात्काळ खुल्या करण्यात याव्यात, अशी मागणी वाहन मालक-चालक प्रतिनिधी संघटनेने केली आहे. तसेच, आरटीओच्या चुकीमुळे झालेला दंडही माफ करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा न काढल्यास आरटीओ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या प्रतिनिधींनी दिला आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने ७८ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जून -**

धाराशिव येथील एसबीआय एटीएम केंद्रात मदत करण्याच्या बहाण्याने एका ज्येष्ठ नागरिकाची ७८ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र संभाजी उंबरे (वय ६५, रा. वानेवाडी, ता. जि. धाराशिव) हे मोदाणी बिल्डिंग येथील एसबीआय एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने पैसे काढून देण्याचा बहाणा करत त्यांचे एटीएम कार्ड स्वतःकडे घेतले. त्यानंतर हातचलाखीने दुसरे एटीएम कार्ड देत त्यांच्या खात्यातून ७८ हजार रुपये काढून फसवणूक केल्याचा आरोप आहे.



या प्रकरणी राजेंद्र उंबरे यांच्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात संबंधित अनोळखी व्यक्तीविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# आई श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शन व्यवस्थेत मोठे बदल; नवी प्रणाली लागू



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जून -**

श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या आणि दर्शन व्यवस्थेतील सुसूत्रता लक्षात घेऊन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने दर्शन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ही नवी दर्शन व्यवस्था गुरुवार, दि. १८ जूनपासून लागू करण्यात आली आहे.

नवीन व्यवस्थेनुसार ५०० रुपये देणगी दर्शन पासधारक तसेच रेफरल देणगी दर्शन पासधारक भाविकांना राजे शहाजी महाद्वार मार्गे मंदिरात प्रवेश दिला जाणार आहे. त्यानंतर कल्लोळ तीर्थाच्या बाजूने टोळभैरव पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या तिसऱ्या मजल्यावर प्रवेश देऊन पहिल्या मजल्यावर सोडण्यात येणार आहे.

तसेच २०० रुपये देणगी दर्शन पासधारकांना बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या पहिल्या मजल्यावरील इमर्जन्सी गेटमधून प्रवेश दिला जाणार आहे. धर्मदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्यावर प्रवेश दिला जाईल. विशेष म्हणजे, दर्शन मंडपाच्या पहिल्या मजल्यावरील भुयारी मार्गात ५०० रुपये, २०० रुपये देणगी दर्शन आणि धर्मदर्शन रांगा एकत्रित करण्यात येणार असून त्यानंतर सर्व भाविकांना एकसमान पद्धतीने श्रीदेवींच्या दर्शनासाठी सोडण्यात येईल. त्यामुळे सर्व भाविकांना एकाच ठिकाणाहून, सिंहाच्या गाभाऱ्यातून देवीचे दर्शन घेता येणार आहे.



मुखदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची रांग बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपाच्या तळमजल्यावर सोडण्यात येणार आहे. तर सिंहासन पूजा आणि अभिषेक पूजेसाठीची व्यवस्था पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे. सिंहासन पूजेची रांग दत्त मंदिर गेटमधून, तर अभिषेक पूजेची रांग छत्रपती संभाजी महाराज प्रांगणातून सोडण्यात येणार आहे.

मंदिर संस्थानच्या माहितीनुसार, पूर्वीच्या व्यवस्थेत देणगी दर्शन रांगेमुळे धर्मदर्शन रांगेतील भाविकांना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले होते. तसेच सिंहासन पूजा आणि अभिषेक पूजा सुरू असताना देणगी दर्शन रांगा काही काळ बंद ठेवाव्या लागत होत्या. नव्या व्यवस्थेमुळे या अडचणी दूर होऊन देणगी दर्शन पासधारकांना पूर्णवेळ दर्शन सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

या बदलांमुळे भाविकांना अधिक सुलभ, सुव्यवस्थित आणि समान पद्धतीने दर्शन घेता येणार असल्याचे मंदिर संस्थानने स्पष्ट केले असून सर्व भाविकांनी नव्या व्यवस्थेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मैत्री, मेहनत आणि यशाची अनोखी कहाणी; ईटच्या दोन मित्रांनी मिळवले ९९ टक्क्यांहून अधिक गुण

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ जून -**

मेहनतीला यशाची साथ आणि मैत्रीला प्रगतीची वाट या उक्तीची प्रचिती ईट येथील पृथ्वीराज प्रताप देशमुख आणि ओमराजे आप्पासाहेब चव्हाण या दोन जिवलग मित्रांनी आपल्या उल्लेखनीय यशातून घडवून आणली आहे. तेलंगणा राज्य मंडळाच्या बारावी परीक्षेत दोघांनीही ९९ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केले असून सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

या दोघांचे प्राथमिक शिक्षण ईट येथील जिल्हा परिषद प्रशालेत झाले. बालपणापासून एकाच वर्गात आणि एकाच बाकावर बसत त्यांनी शिक्षणाचा प्रवास सुरू केला. पुढे माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी धाराशिव येथील भोसले हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. दहावीच्या परीक्षेतही



दोघांनी उल्लेखनीय यश मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली.

उच्च माध्यमिक शिक्षणासाठी त्यांनी हैदराबाद येथील नामांकित नारायणा ज्युनियर कॉलेजची निवड केली. स्पर्धात्मक वातावरणात सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि ध्येयाप्रती असलेल्या निष्ठेच्या बळावर त्यांनी तेलंगणा बोर्डाच्या बारावी परीक्षेत ९९ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत यशाचा नवा टप्पा गाठला.

विशेष म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या एमएच-सीईटी परीक्षेत पृथ्वीराज देशमुख याने ९८.४४ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्याला पुढे कॉम्प्युटर सायन्स किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स शाखेत प्रवेश घेण्याची इच्छा आहे. तर ओमराजे चव्हाण याने एमएच-सीईटीमध्ये ९७ टक्के गुण मिळवत यशाची परंपरा कायम राखली असून तो इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अथवा कॉम्प्युटर सायन्स शाखेत शिक्षण घेण्याचा मानस व्यक्त केला आहे.

पहिलीपासून बारावीपर्यंत एकत्र शिक्षण घेत, एकमेकांना प्रेरणा देत आणि अभ्यासात साथ देत या दोघांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे ईट गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षक, पालक, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## उमरगा बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत सोन्याची चैन लंपास

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ जून -**

उमरगा बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने एका ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुरलीधर तुकाराम बडवे (वय ७२, रा. श्रीकृष्ण नगर, गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) हे २२ एप्रिल २०२६ रोजी उमरगा बसस्थानकात बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाची, सुमारे ४६ हजार ४२० रुपये किंमतीची सोन्याची चैन चोरून नेली.

या प्रकरणी मुरलीधर बडवे यांच्या फिर्यादीवरून उमरगा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


## तुळजाभवानी मंदिरातील दर्शन व्यवस्थेतील बदलास पुजारी मंडळाचा आक्षेप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने धर्मदर्शन, मुखदर्शन आणि पेड दर्शन रांगांमध्ये केलेल्या नव्या बदलांवर पुजारी मंडळाने आक्षेप नोंदवला असून या संदर्भात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष यांना मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे.

मंदिर संस्थानने दि. १७ जून रोजी परिपत्रक काढून धर्मदर्शन, मुखदर्शन आणि पेड दर्शन रांगांच्या व्यवस्थेत बदल केले होते.

मात्र, या निर्णयापूर्वी तिन्ही पुजारी मंडळांना विश्वासात घेऊन चर्चा करणे अपेक्षित असताना एकतर्फी निर्णय घेण्यात आल्याचा आरोप पुजारी मंडळाने केला आहे.



निवेदनात म्हटले आहे की, धर्मदर्शन आणि पेड दर्शन रांगा एकत्र केल्यामुळे भाविकांची गर्दी वाढून दर्शनासाठी अधिक वेळ लागत आहे. त्यामुळे पूर्वी बंद करण्यात आलेल्या पेड दर्शन रांगेच्या मार्गातून धर्मदर्शन रांग सुरू करून भाविकांना अधिक सुलभ दर्शन व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

असे केल्यास भाविकांना कमी वेळेत आणि सुलभ पद्धतीने दर्शन घेता येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच भविष्यात दर्शन व्यवस्थेबाबत कोणताही निर्णय घेताना तिन्ही पुजारी मंडळांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे यांच्यासह अनेक पुजाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## लातूरमध्ये २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन; नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जून -**

जिल्ह्यात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात येणार असून, लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी गुरुवारी घेतला.

बैठकीस उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. सुधीर बनशेळकीकर तसेच योग क्षेत्राशी संबंधित विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.



यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची अधिकृत संकल्पना 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' अशी निश्चित करण्यात आली आहे. त्यानिमित्ताने २१ जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ७:४५ या वेळेत जिल्हाभर सामूहिक योगाभ्यासाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमात विद्यार्थी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले. तसेच जिल्हास्तरीय कार्यक्रमासाठी संबंधित यंत्रणांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या दक्षतेने पार पाडण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## पार्डी-तेरखेडा व बावी-तेरखेडा नवीन विद्युत वाहिन्या मंजूर करा : विकी चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ जून -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा व परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी तेरखेडा जिल्हा परिषद मतदारसंघाचे सदस्य विकी चव्हाण यांनी महावितरणच्या धाराशिव मंडळाकडे निवेदन सादर केले आहे. तेरखेडा येथील ३३ के.व्ही. सबस्टेशनसाठी पार्डी-तेरखेडा तसेच बावी-तेरखेडा या नवीन पर्यायी ३३ के.व्ही. विद्युत वाहिन्या तातडीने मंजूर करून कार्यान्वित करण्यात याव्यात, अशी त्यांनी मागणी केली आहे.

महावितरणचे अधीक्षक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात विकी चव्हाण यांनी नमूद केले आहे की, तेरखेडा हे वाशी तालुक्यातील औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून येथे मोठ्या प्रमाणात फटका उद्योग तसेच विविध लघुउद्योग कार्यरत आहेत.



त्यामुळे उद्योगांसह शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अखंड व दर्जेदार वीजपुरवठा अत्यावश्यक बनला आहे.

सध्या कळंब-तेरखेडा ही जुनी ३३ के.व्ही. विद्युत वाहिनी कार्यरत असून पावसाळ्यात वारंवार तार तुटणे, विद्युत खांब पडणे, फ्युज जाणे तसेच तांत्रिक बिघाडाच्या घटना घडत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

त्यामुळे तेरखेडा, नांदगाव, वडजी, इंदापूर, बावी, खामकरवाडी, सटवाईवाडी, कडकनाथवाडी आदी गावांतील वीजपुरवठा विस्कळीत होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

तेरखेडा येथील ३३ के.व्ही. सबस्टेशनवर अवलंबून असलेल्या हजारो ग्राहकांच्या हिताचा विचार करून पार्डी-तेरखेडा व बावी-तेरखेडा या नवीन पर्यायी विद्युत वाहिन्या उभारल्यास कळंब-तेरखेडा वाहिनीवरील ताण कमी होऊन वीजपुरवठा अधिक सक्षम आणि विश्वासार्ह होईल. तसेच भविष्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासही मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

महावितरण प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन पार्डी-तेरखेडा आणि बावी-तेरखेडा या नवीन ३३ के.व्ही. विद्युत वाहिन्यांना तातडीने प्रशासकीय मान्यता देऊन कामाला सुरुवात करावी, अशी मागणी विकी चव्हाण यांनी केली आहे.

दरम्यान, या मागणीमुळे तेरखेडा व परिसरातील नागरिक, शेतकरी आणि उद्योजकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## ईट कृषी मंडळ कार्यालय तीन वर्षांपासून कुलूपबंद

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१८ जून -**

ईट परिसरातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी असलेले कृषी मंडळ कार्यालय तब्बल तीन वर्षांपासून कुलूपबंद असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. ईटमधील कृषी मंडळ अधिकारी आहेत तरी कुठे? असा संतप्त सवाल आता परिसरातील शेतकरी उपस्थित करत आहेत.

ईटसह परिसरातील सुमारे १८ ते २० गावांतील शेतकऱ्यांसाठी कृषी मंडळ कार्यालय महत्त्वाचे केंद्र मानले जाते. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन, पीकविमा, नैसर्गिक आपत्ती पंचनामे, विविध कृषी योजनांची माहिती तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम या कार्यालयामार्फत केले जाते. मात्र गेल्या तीन वर्षांपासून कार्यालय बंद असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त...**

विशेष म्हणजे ईट मंडळाचे अधिकारी नेमके कोण आहेत, ते कधी येतात आणि त्यांचा कारभार नेमका कुठून चालतो, याची माहितीही बहुतांश शेतकऱ्यांना नसल्याची चर्चा परिसरात आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ईट येथील कृषी मंडळ कार्यालय भाडेतत्त्वावरील इमारतीत सुरू असून शासनाकडून त्यासाठी लाखो रुपये भाड्यापोटी खर्च करण्यात आले आहेत. मात्र हे कार्यालय कायम बंदच असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

सध्या खरीप हंगामाच्या पेरणीची वेळ जवळ आली असून बियाणे, खते, पीक नियोजन, हवामानातील बदल आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. मात्र अशा महत्त्वाच्या काळात कार्यालय कुलूपबंद असल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. तहान लागल्यावर विहीर खोदण्यापेक्षा पेरणीपूर्वीच कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या संपर्कात राहणे गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, शेतकरी सुखी तर देश सुखी अशी भूमिका मांडणाऱ्या शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पेरणीपूर्वी कृषी मंडळ कार्यालय नियमित सुरू करावे आणि शेतकऱ्यांना आवश्यक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

अन्यथा प्रशासनाला जाग आणण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागू शकतो, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

## नीट यूजी-२०२६ परीक्षा पारदर्शक व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१८ जून -**

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटीए) मार्फत २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणारी 'नीट यूजी-२०२६' परीक्षा पारदर्शक व सुरळीत वातावरणात पार पडावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत.

विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने आणि दक्षतेने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या.

'नीट यूजी-२०२६' परीक्षेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी परीक्षा केंद्रांवरील सुविधा, सुरक्षा व्यवस्था, आरोग्य सेवा आणि वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेतला.

यावेळी उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, तहसीलदार राजाभाऊ कदम, आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड, महेश सूर्यवंशी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात एकूण २६ परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार असून, त्यामध्ये लातूर येथील १९, अहमदपूर येथील २, उदगीर येथील २, निलंगा येथील २ आणि चाकूर तालुक्यातील चापोली येथील एका केंद्राचा समावेश आहे.

परीक्षा केंद्रांवर कोणताही गैरप्रकार होऊ नये आणि परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी 'ड्युटी मॅजिस्ट्रेट' व 'स्टेट ऑब्झर्वर' यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, आरोग्य पथकेही तैनात करण्यात येणार आहेत.

या पथकांकडे आवश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २५ जूननंतर जिल्ह्यात मान्सूनची दमदार हजेरी; बळीराजाला दिलासा

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८ जून -
यंदा लातूर जिल्ह्यात २५ जूननंतर मान्सून दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.
मान्सूनच्या आगमनासाठी पोषक हवामान तयार होत असून गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेचा सामना करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



२५ जूननंतर जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.
त्यामुळे बळीराजामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीपूर्व तयारीला वेग दिला आहे.
मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी मानली जात असून आगामी पावसावर खरीप हंगामाचे चित्र अवलंबून राहणार आहे.



### संक्षिप्त वृत्त...



#### श्रीराम विद्यालयाच्या नव्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहात शुभारंभ

रेणापूर, दि.१८ जून -
श्रीराम प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल कुटवाड हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका चंचला वलसे, उपप्राचार्य भरत धायगुडे, प्रा. जुबेरखान पठाण, ग्रंथपाल महादू गोडभरले आणि पाठ्यपुस्तक विभाग प्रमुख विलास येलाले उपस्थित होते. शाळा परिसर रंगीबेरंगी फुले, फुगे, आकर्षक फलक लेखन आणि सुंदर रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. त्यामुळे परिसरात आनंदी व उत्साही वातावरण निर्माण झाले होते. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व उत्सुकता दिसून येत होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी केले.



#### प्रा.डॉ. गोपाळ दंडिमे यांना पीएच.डी. प्रदान

औसा, दि.१८ जून -
तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा.डॉ. गोपाळ दंडिमे यांना परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट ऑफ सोलार एनर्जी हार्वेस्टिंग सिस्टीम युजिंग पीआयडी कंट्रोलर विथ वायरलेस सेन्सर नेटवर्क या विषयावरील संशोधन प्रबंधासाठी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. ओरिएंटल युनिव्हर्सिटी, इंदोर येथील प्रो.डॉ. मनिष सावले यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन विभागांतर्गत त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनामुळे सोलार एनर्जी आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेड) क्षेत्रातील सध्याच्या व भविष्यातील अनेक समस्यांवर उपाय शोधण्यास मदत होणार आहे. तसेच या क्षेत्रात संशोधन व शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे संशोधन मार्गदर्शक ठरणार असून आगामी काळात ऊर्जा संकट कमी करण्यासाठीही याचा उपयोग होणार आहे. प्रा.डॉ. गोपाळ दंडिमे यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे तसेच विभागप्रमुख प्रा. रेवणसिद्ध बुक्का, प्रा. प्रविण सावंत, प्रा. अंकुश बिडवे, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अजित लोकरे, प्रा. अब्दुल समद काझी यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला.

#### सानेगुरुजी विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

लातूर, दि.१८ जून -
लातूर येथील सानेगुरुजी माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे सचिव कालिदास माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

# मोदी सरकारच्या १२ वर्षांत देशाच्या विकासाला नवी दिशा : संभाजी पाटील निलंगेकर



तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८, जून -
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षात देशाच्या सर्वांगीण विकासाला गती देत आर्थिक, सामाजिक, पायाभूत आणि सांस्कृतिक क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणले आहे. यामुळे देशाच्या सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सकारात्मक बदल झाला असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात झालेल्या विविध निर्णयांची व कामांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर उपस्थित होते. आ. निलंगेकर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग ४,३९८ पेक्षा अधिक दिवस देशाचे नेतृत्व करत सर्वाधिक काळ कार्यरत निर्वाचित पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. सुमारे २५ कोटी नागरिकांना गरिबीरेषेबाहेर काढण्यात यश आले असून ८१ कोटी नागरिकांना मोफत अन्नधान्याचा लाभ देण्यात आला आहे. शेतकऱ्यांसाठी सन्मान योजना, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना आणि 'लखपती दीदी' योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचे काम करण्यात आले असून याचा लाभ तीन कोटी महिलांना झाला असल्याचे त्यांनी सांगितले.



लातूर जिल्ह्याच्या विकासाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, देशातील चौथा आणि महाराष्ट्रातील पहिला रेल्वे बोगी प्रकल्प लातूरमध्ये सुरू झाला असून लवकरच उत्पादन सुरू होणार आहे. २०१४ पूर्वी लातूर जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नव्हता, मात्र आता चार राष्ट्रीय महामार्ग उपलब्ध झाले असून आणखी दोन महामार्ग सुरू होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आगामी काळात केंद्र सरकारच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यासाठी विविध विकासकामांना मंजुरी मिळणार असून लवकरच पाच नवीन रेल्वेही लातूरला मिळणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.
या पत्रकार परिषदेला शहर जिल्हा सरचिटणीस प्रविण कस्तुरे, संजय गिर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रमोद गुडे आदी उपस्थित होते.

## पक्षांतरापूर्वी मतदारांचा कौल घ्यायलाच हवा!
# पक्षांतर की मतदारांच्या विश्वासाला तडा?

प्रमोद सुरवसे
लातूर, दि.१८, जून -
अलीकडे काही खासदारांच्या पक्षांतराच्या चर्चेमुळे अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्या पक्षाने एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवून त्याला उमेदवारी दिली, प्रचार-प्रसार करून जनतेपर्यंत पोहोचवले आणि निवडून आणले, त्याच पक्षाला सोडण्याचा निर्णय घेताना मतदारांच्या भावनांचाही विचार होणे गरजेचे आहे.
नवख्या उमेदवाराला बहुतेकवेळा मतदार त्याच्या वैयक्तिक प्रतिमेपेक्षा पक्ष आणि पक्ष नेतृत्वावर विश्वास ठेवून मतदान करतात. त्यामुळे निवडून आल्यानंतर पक्षांतराचा निर्णय घेताना ज्या मतदारांनी भरभरून साथ दिली, त्यांच्या विश्वासाचा विचार होणे आवश्यक आहे. पक्ष बदलताना पक्षप्रमुखांशी चर्चा होते की नाही, यापेक्षा ज्यांनी मतदान करून निवडून दिले त्या मतदारांचे मत




विचारात घेतले जाते का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण मतदारांचा विश्वास हा लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. पक्षांतरामागे अनेक कारणे असू शकतात. त्यामध्ये वैचारिक मतभेद किंवा इतर राजकीय कारणांचाही समावेश असू शकतो. मात्र लोकप्रतिनिधींनी पक्षांतर करताना आपल्या पदाचा राजीनामा देऊन पुन्हा जनतेसमोर जावे आणि नव्याने जनादेश घ्यावा, अशी अपेक्षा अनेक मतदारांच्या मनात असते.
लोकशाहीतील विश्वास टिकवायचा असेल तर पक्षांतरापूर्वी जनतेच्या मतालाही महत्त्व दिले गेले पाहिजे.

#### नीट-यूजी परीक्षेसाठी लातूरमध्ये विशेष नियंत्रण कक्ष

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८, जून -
राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत (एनटीए) घेण्यात येणारी नीट-यूजी २०२६ परीक्षा २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे.
परीक्षेच्या समन्वयासाठी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तहसीलदार राजाभाऊ कदम यांची नियंत्रण कक्ष प्रमुख, तर शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले यांची सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
परीक्षार्थी व पालकांसाठी नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## शाळा सुरू होताच बाजारपेठेत गर्दी...
# शैक्षणिक साहित्याच्या वाढत्या दरांनी पालक चिंतेत

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८, जून -
नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच लातूर शहरासह जिल्ह्यात शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांची बाजारपेठेत मोठी गर्दी दिसून येत आहे. गणवेश, वह्या, पुस्तके, दप्तर तसेच इतर साहित्य खरेदीसाठी पालकांची लगबग सुरू झाली आहे.
यंदा कापसाच्या दरात वाढ तसेच मजुरी खर्च वाढल्यामुळे शालेय गणवेशाच्या किमतीत जवळपास १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. वाढत्या दरांमुळे सर्वसामान्य पालकांच्या आर्थिक नियोजनावर ताण पडत



असल्याचे चित्र आहे. सध्या बाजारात वह्या आणि पुस्तकांसाठी साधारण तीन ते पाच हजार रुपये, दप्तरासाठी ३५० ते १५०० रुपये, बूट व सॉक्ससाठी ५०० ते १५०० रुपये तसेच इतर शैक्षणिक साहित्याकरिता ५०० ते १००० रुपये खर्च करावे लागत आहे.
शैक्षणिक साहित्याच्या वाढत्या किंमतीमुळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मनपा प्रशासनात मोठे फेरबदल
# विविध विभागांच्या जबाबदाऱ्यांत बदल

तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८, जून -
महानगरपालिकेचे कामकाज अधिक गतिमान आणि सुसूत्र होण्यासाठी मनपा आयुक्त मानसी यांनी प्रशासकीय स्तरावर मोठे फेरबदल केले आहेत. या बदलांत अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, मुख्य लेखाधिकारी तसेच सह आयुक्त यांच्या विभागीय जबाबदाऱ्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत.
अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्याकडे ३०० चौरस मीटरपर्यंतचे ऑनलाईन बांधकाम परवाने, गुंठेवारी, पाणीपुरवठा, अमृत योजना, पर्यावरण आणि अग्निशमन विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. उपायुक्त वसुधा फड यांच्याकडे सामान्य प्रशासन,



स्वच्छता, आरोग्य, अतिक्रमण निर्मूलन तसेच घरकुल योजनेचे कामकाज देण्यात आले आहे. मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्याकडे आर्थिक विभागासह मालमत्ता आणि कर विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.
तर सह आयुक्त नंदकुमार ताप्डे यांच्याकडे लोकसेवा हक्क अधिनियम तसेच लोकशाही दिनाशी संबंधित कामकाजाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# हाळणीच्या माधव कोतवालची मुंबई पोलिस दलात भरारी

तभा वृत्तसेवा
शिरूर अनंतपाळ, दि.१८, जून -
शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हाळणी येथील सामान्य कुटुंबातील माधव नारायण कोतवाल या २३ वर्षीय युवकाने जिद्द आणि अथक परिश्रमाच्या बळावर मुंबई पोलीस भरतीत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय, थेरगाव येथे त्याचा सत्कार करण्यात आला.
शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या हस्ते माधव कोतवाल यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.



यावेळी पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांनी नवतरुणांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कठीण आणि गरीब परिस्थितीतही दृढनिश्चय, कठोर परिश्रम आणि योग्य नियोजनाच्या बळावर यश मिळवता येते. मोबाईल आणि व्यसनांपासून दूर राहून शिक्षण व ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास कोणतीही परीक्षा यशस्वीरीत्या पार करता येते, असे त्यांनी सांगितले.
ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते यांनीही माधव कोतवाल यांच्या यशाचे कौतुक करताना सांगितले की, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनत हेच यशाचे खरे सूत्र आहे. सामान्य कुटुंबातील युवकांसाठी माधव यांचा प्रवास प्रेरणादायी आहे.
माधव कोतवाल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सुरुवातीला नांदेड येथे प्रशिक्षण घेतले मात्र यश मिळाले नाही. त्यानंतर लातूर येथील प्रशांत मोरे क्लासेसमध्ये मार्गदर्शन घेत स्वतः मेहनत आणि सरावाच्या बळावर त्यांनी मुंबई पोलीस भरतीत यश संपादन केले. हे यश माझे नसून आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.
या कार्यक्रमाला ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते, उपसरपंच सुनील शिंदे, पत्रकार शंकर मिटकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# एमएचटी-सीईटी परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाची यशस्वी भरारी; ३१ विद्यार्थी उत्तीर्ण



तभा वृत्तसेवा
लातूर, दि.१८, जून -
एमएचटी-सीईटी (पीसीएम) परीक्षेच्या पहिल्या सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असून राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाविद्यालयातील ३१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश संपादन केले आहे.
या परीक्षेत सोनाली शरद पंचगल्ले हिने ९९.६४ पर्सेंटाईल गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. व्यंकटेश विजयकुमार लड्डा याने ९६.९२ पर्सेंटाईल गुणांसह द्वितीय, तर सार्थक चंद्रकांत वाडकर याने ९६.५५ पर्सेंटाईल गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.
तसेच श्रेया गजानन क्षीरसागर (९३.०४), विवेक मुकुंद भोसले (९१.०२), कृष्णा विजयकुमार किसवे (९०), सृष्टी बाहेती (८७), श्रुती खटके (८३.२६), अखिलेश काळे (८३), तन्वी आलापूरे (८१.२२), पूजा किसवे (८०.१०), अदिती पांढरे (८०) यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनीही यश संपादन केले.
या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दीपक चवने, शिक्षण सहसंचालक संजय पंचगल्ले, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, तृप्ती अंधारे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे आणि इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षणाची मागणी; आ. अभिमन्यू पवारांचा केंद्रीय शिक्षणमंत्र्यांकडे पाठपुरावा

तभा वृत्तसेवा
औसा, दि.१८, जून -
देशातील केंद्रीय विद्यालये आणि जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) विद्यार्थ्यांना नियमानुसार १० टक्के आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित मागणीचे निवेदन सादर करत ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली.
महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबांतील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक गुणवंत विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे दर्जेदार शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहत असल्याची बाब आ. पवार यांनी शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. राष्ट्रीय स्तरावर गुणवत्तापूर्ण आणि स्पर्धात्मक



शिक्षण देणाऱ्या केंद्रीय विद्यालये व जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये अशा विद्यार्थ्यांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
देशातील सर्व केंद्रीय विद्यालये आणि जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. या निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविली जाईल, असे त्यांनी सांगितले.
दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीसंदर्भात केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना शिफारसपत्र सादर केले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या मागणीकडे सकारात्मक दृष्टीने पाहत संबंधित विभागाकडून प्रस्ताव मागवून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याची माहिती आ. अभिमन्यू पवार यांनी दिली.
या विषयाची दखल घेतल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आ. अभिमन्यू पवार यांनी आभार मानले.

#### देवणी येथे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
देवणी, दि.१८, जून -
देवणी पोलीस स्टेशन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भारतचंद्र ब्लड सेंटर (लातूर) आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जून २०२६ रोजी देवणी पोलीस स्टेशन परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.
One Helmet One Life अभियानांतर्गत रक्तदान करणाऱ्या प्रत्येक दात्यास मोफत हेल्मेट भेट देण्यात आले. या उपक्रमास जिल्हा परिषद सदस्य ऑदब्बर पांचाळ आणि डीवायएसपी विशाल पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.
शिबिरात रक्तदाते व पोलीस कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.